# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## तृतीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (V)

## जनरल पेपर POL ३५१ a (Gen-३) ३५१११

## पाश्चिमात्य राजकीय विचार

## Western Political Thought

## तृतीय वर्ष कला प्रथम सत्र- V

## राज्यशास्त्र- जून २००९

## (सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)

**तृतीय वर्ष कला प्रथम सत्र- V**

**१) प्लेटो- आदर्शवादी दृष्टिकोन**

- न्याय सिद्धांत
- आदर्श राज्य संकल्पना आणि तत्त्वज्ञ राजा
- शिक्षणविषयक विचार
- साम्यवादाविषयी विचार
- मूल्यमापन व परिक्षण

**२) ॲरिस्टॉटल- वास्तवादी दृष्टिकोन**

- राज्यविषयक विचार
- राज्याचे वर्गीकरण
- नागरिकत्वाची संकल्पना आणि गुलामगिरी
- क्रांतीची कारणे व आदर्श राज्य
- मूल्यमापन  व परिक्षण

**३) मॅकिव्हली-**

- राजाला केलेला उपदेश
- साध्य आणि साधनाबाबतचे विचार
- धर्म आणि नैतिकता विषयी विचार
- राजनय
- मूल्यमापन व परिक्षण

**४) रूसो**

- सामाजिक करार सिद्धांत
- सामाजिक ईहा संकल्पना
- जबाबदार सरकार
- सार्वभौमत्व
- मूल्यमापन आणि परिक्षण

## प्रकरण- १ ले
## प्लेटो (इ.स.पूर्व ४२७ ते इ.स.पूर्व ३४७)

**प्लेटोचा जीवन परिचय-** प्लेटोचा जन्म इ.स.पूर्व ४२७ मध्ये अथेन्स मधील एका कुलीन घराण्यात झाला. त्यांच्या वडीलाचे नाव एरिस्टन आणि आईचे नांव परिक्टियनो असे होते. त्यांचे वडील राजघराणाशी संबंधित होते. त्याचा जन्म कुलीन घराण्यात झाल्यामुळे त्याला उत्तम दर्जाचे शिक्षण मिळाले. प्लेटो आठ वर्ष सॉक्रेटिसच्या सहवासात होतो. त्याने सॉक्रेटिसला आपला गुरू मानले होते. तरूणपणी त्याचे विचार खूपच क्रांतिकारी होते. सॉक्रेटिच्या क्रांतीकारी विचारामुळे त्याकाळातील राज्यकर्त्यांनी तरूणांना बिघडवणारा पाखंडी हा आरोप ठेवून त्याला स्वतःच्या हाताने विषप्राशन करण्याची शिक्षा दिली. या घटनेमुळे राजकारणात भाग घेवू इच्छीणाऱ्या प्लेटोच्या मनात राजकारणाबद्दल घृणा निर्माण झाली. या कृत्यास प्लेटो अथेन्स सत्ताधिकाऱ्यानी सत्तेच्या स्वार्थापायी केलेला खून समजत असे. सॉक्रेटिसच्या मृत्यूमुळे तो राजकारणी होण्याऐवजी तत्वचिंतक झाला. त्याचा लोकशाही वरील विश्वास कमी होऊन आदर्श राज्य निर्मितीचा विचार करू लागला. त्यासाठी विविध देशाच्या शासनपध्दतीचा अभ्यास करण्यासाठी १२ वर्ष इजिप्त, इराण, इटली, सिसिली, बाबिलेनिया इत्यादी देशांचा प्रवास करून तेथील प्रचलित शासन व्यवस्थांचा अभ्यास करत राहिला. याकाळात सिराक्यूजचा राजा डायोनोसिस याला आदर्शराजा बनविण्यासाठी खूप प्रयत्न केला पण यश आले नाही त्यामुळे तो अथेन्सला परत आला. तेथे त्याने ॲकॅडमी नावाच्या विश्वविदयालयाची स्थापना केली. तेथे ४० वर्ष अध्यापनाचे कार्य केले. प्लेटोने एकूण ३८ ग्रंथ लिहले त्यापैकी Republic, Statesman आणी the Law इ. ग्रंथ महत्वपूर्ण आहेत. रिपब्लीक ग्रंथ तारूण्यात लिहील्यामुळे आदर्शवादाचा जास्त प्रभाव दिसतो तर इतर ग्रंथ हे अनुभवातून लिहीलेले असल्यामुळे त्यात वास्तववाद दिसतो. प्लेटोवर कुलीन घराणे, ग्रीक संस्कृती व परंपरा, नगरराज्य व्यवस्था, सिराक्यूजचा अनुभव आणी सॉक्रेटिसचा प्रभाव दिसतो. राज्यशास्त्राला प्लेटोने मौलिक तत्त्वज्ञान उपलब्ध करून दिले. म्हणून त्याला राज्यशास्त्राचा पहिला विचारवंत मानला जातो. प्लेटोच्या विचारांना सैद्धांतिक कवच देणाऱ्या त्यांच्या ॲरिस्टॉटल या शिष्यास राज्यशास्त्राचे जनक मानले जाते.

**प्र.१ ला प्लेटोचा न्यायसिद्धांताचे स्पष्ट करा?**

न्याय हा प्लेटोच्या रिपब्लीक ग्रंथाचा मुख्य विषय होता. म्हणून या ग्रंथाला दुसरे नांव concerning Justic हे आहे. रिपब्लिकला पर्यायी शब्द पोलिटी Polity हा असून त्याचा अर्थ संविधान हा होतो. प्लेटोचा न्याय शब्द आजचा जस्टिस शब्दापेक्षा त्याचे स्वरूप अधिक विस्तृत आहे. प्लेटोचा न्याय हा नैतिकतेशी अधिक जवळचा आहे. कायदयाद्वारे न्यायनिवाडा एवढा मर्यादित अर्थ नाही. श्रमविभाजन व योग्य कृतीशी त्यांचा संबंध आहे. पारस्परिक व्यवहारामध्ये ज्या धर्माचे पालन आपण करतो तो धर्म म्हणजे न्याय होय. प्लेटोच्या आदर्शराज्याचा न्याय हा मुख्य आधार आहे. अथेन्समधील अधःप्रतित शासनव्यवस्थेचे चित्र बदलण्यासाठी तो आदर्शराज्याची निर्मिती करू इच्छित होता. व्यक्ती आदर्श जीवन आदर्श राज्यातच प्राप्त होऊ शकते. म्हणून त्यांने न्याय सिद्धांताची मांडणी केलेली दिसते. त्याने न्यायसिद्धांत माडण्याआधी त्याकाळात अस्तित्वात असलेल्या न्यायसिद्धांताचे खंडन केलेले आहे.

१. **परंपरावादी न्यायसिद्धात-** परंपरावादी न्यायसिध्दांत सिफॉलसने मांडला. त्यांच्यामते सत्यवचनी असणे व आपण घेतलेले ऋण फेडणे म्हणजे न्याय होय. अर्थात सत्यभाषणी, उचित कार्य व ईश्वर आणि मनुष्याचे ऋण परतफेड करण्यात न्याय होय. या विधानाचे स्पष्टीकरण करण्यापूर्वी तो निघून जातो. त्याचा मुलगा पोलिमार्कस या सिद्धाचे विश्लेषण करतो न्याय म्हणजे उचित व्यवहार होय. उचित व्यवहाराचा अर्थ शत्रूला शत्रुत्वाने व मित्राला मित्रत्वाची वागणूक देणे न्याय होय. प्लेटो वरील न्याय सिद्धाताचे खंडन करतो. न्यायाचा अर्थ परपीडा वा दुःख देणे असू शकत नाही. मित्र व शत्रू ओळखणे कठीण असते. एकाच गुन्हाबद्दल मित्र व शत्रूबरोबर पक्षपाती वर्तन करणे गैर आहे. कारण न्याय परिस्थितीसापेक्ष नसून सर्वाना सारखा असला पाहिजे. ऋण फेडणे

म्हणजे न्याय याचे देखील खंडन करतो. एखादा व्यक्ती तुमच्याकडे तलवार ठेवून गेला काही काळानंतर तो वेडा झाला आणि वेडा झाल्यावर तलवार परत मागू लागला तर त्याला तलवार देणे योग्य होणार नाही. पण या सिद्धातानुसार तलवार देणे बंधनकारक आहे.म्हणून असे अनेक दोष या सिद्धातात असल्यामुळे प्लेटो हा सिद्धात नाकारतो.

२. **क्रांतिकारी सिद्धात-** थ्रेसिमेकस या सोफिस्ट विचारवंताने हा सिद्धात मांडला. शक्तिशाली व्यक्तीचे हित न्यायात अभिप्रेत आहे. बळी तो कान पिळी हे न्यायाचे स्वरूप आहे. राज्यात शासक शक्तिशाली असून ते आपल्या हितासाठी कायदे तयार करतात ते कायदे जनतेला पाळावे लागतात कायदाभंग करणाऱ्याला शिक्षा केली जाते. शासनाचे आदेश पाळण्यातच न्याय आहे. प्लेटो वरील सिद्धाताचे खंडन करतो. शासनाचे हित म्हणजे न्याय मानले तर प्रजा केवळ साधन बनेल. तसेच शासनाची प्रत्येक आज्ञा न्याय अशू शकत नाही. समाजहिताचे भान न ठेवता केलेल्या आज्ञापालनात न्याय कसा असेल? शासनाच्या स्वार्थी आज्ञा अनैतिक असतात म्हणून शक्तिशाली व्यक्तीची इच्छा न्याय होऊ शकत नाही. थ्रेसिमेकस आपली भूमिका बदलून शासकाच्या हितासाठी कार्य करणे म्हणजे न्याय व आपल्या हितासाठी कार्य करणे म्हणजे अन्याय असे असले तरी अन्याय हा न्यायापेक्षा श्रेष्ठ असतो असे प्लेटो मानतो. न्यायाचा उद्देश उत्कृष्ट जीवनाची प्राप्ती असतो. शासन ही कला असून शासनकर्त्यांनी जनहित लक्षात ठेवून कार्य करावे असे सांगुन प्लेटो हा सिद्धात टाकाऊ मानून नाकारतो.

३. **व्यावहारिक सिद्धात-** ग्लाकनच्या मते अन्याय हा भीतीचा परिणाम आहे. न्यायाची संकल्पना कृत्रिम व परंपरागत आहे. निसर्ग अवस्थेत मानव स्वैराचारी वागत होतो. दुबलाना अत्याचार सहन करावे लागे. या अत्याचारातून सुटका करण्यासाठी त्यांनी आपआपसात करार करून कोणीही कोणावर अन्याय करू नये हे ठरले. यानुसार कायदा व न्यायाचे नियम बनविले. त्यामुळे न्याय हा बलवानांची इच्छा नसून बलहीनाची आवश्यकता आहे. न्याय हा भीती व कृत्रिम पद्धतीने निर्माण झाला हे प्लेटोला मान्य नाही. न्यायात सबल आणि दुर्बल दोघांचे हित निहीत असते. न्यायाचे पालन भीतीमुळे होत नाही तर स्वभावत:च होते कारण तो आत्म्याचा गुण आहे.

**प्लेटोची न्याय सिद्धात संकल्पना-**

प्लेटो तात्कालिक तिन्ही न्यायसिद्धाताचे खंडन करून संवाद रूपाने सॉक्रेटिसच्या तोंडून न्यायसिद्धात मांडतो. प्लेटो राज्याला व्यक्तीचे विस्तारीत रूप मानतो. न्याय म्हणजे राज्यरूपी शरीराचा आत्मा होय. व्यक्ती व समाज यांची नीती एकच असते. म्हणून न्याय हा आंतरआत्माचा गुण आहे. फॉस्टरच्या मते, ज्याला आम्ही नैतिकता संबोधिता तोच प्लेटोचा न्याय आहे. प्लेटो मानसशास्त्रीय पद्धतीने मानवी स्वभावाचे विश्लेषण करून न्याय सिद्धाताचे स्पष्टीकरण करतो. राज्यातील व्यक्ती सद्‌गुणी असतील तरच राज्य सद्‌गुणी बनले. असे सद्‌गुणी राज्य बनावे यासाठी मानवी स्वभावाचे विश्लेषण करतो. प्लेटोच्या मते, प्रत्येक व्यक्तीत वासना, साहस, विवेक इ.तीन गुण असतात. पण व्यक्तीत तिन्ही गुणाचे प्रमाण सारखे नसते. ते कमी-जास्त असते. कोणात विवेक जास्त तर कोणात साहस जास्त, ज्या व्यक्तीत जो गुण अधिक प्रमाणात असतो. त्या गुणाचा विकास होतो. बाकीचे गुण हळू-हळू नाहीसे होतात. उदा. वासना जास्त असेल तर साहस व बुद्धी कमी होईल. वासना, साहस व विवेक गुणानुसार समाजात वासनाप्रधान, साहसप्रधान,विवेकप्रधान हे तीन वर्ग निर्माण होतात. त्या तीन वर्गाना उत्पादक, सैनिक व शासक असे संबोधिले आहे. प्लेटोने गुणवत्तेनुसार प्रत्येक वर्गाचे कार्य निश्चित करून प्रत्येकाने आपले कार्य कुशलतेने करून इतराच्या कार्यात हस्तक्षेप न करणे म्हणजे न्याय होय.

***गुणवत्तेनुसार समाजातील वर्ग व त्यांचे कार्य***

| व्यक्तीचे गुण | समाजाचा वर्ग | समाजाचे कार्य |
|---|---|---|
| वासना | उत्पादक वर्ग | श्रम, शेती व व्यापार |
| साहस | सैनिक वर्ग | आक्रमणापासून संरक्षण |
| विवेक | शासक वर्ग | प्रशासन चालविणे |

वरील तक्तातील तिन्ही वर्गाना निश्चित कार्य करावे लागते. प्रत्येक वर्गातील व्यक्तीने आपल्या गुणानुसार आलेले कार्य कर्तव्य बुद्धीने पार पाडणे आणी इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे यात न्याय सामावलेला आहे. म्हणजे उत्पादकाने उत्पादन करावे, सैनिकांनी संरक्षण करावे, शासनकर्त्यांनी ज्ञानाचा उपयोग करून जनकल्याणासाठी प्रशासन करावे त्यातून राज्य न्यायी बनेल. न्याय म्हणजे स्वधर्म पालन व अहस्तक्षेपाची भूमिका होय.

**प्लेटोच्या न्याय सिद्धाताची वैशिष्टये-**

१. **कार्यविशेषीकरण-** प्रत्येक व्यक्तीत असणाऱ्या विशेष गुणानुसार आपले कुशलतापूर्वक केले पाहिजे. सातत्याने एक कार्य करीत राहिल्यामुळे कौशल्य प्राप्त होते व ते समाजात लाभदायक ठरते.

२. **अहस्तक्षेप-** एका वर्गाने एक कार्य करायचे असल्यामुळे इतराच्या कार्यात हस्तक्षेप करणे नैतिक कर्तव्य नसल्यामुळे परस्परांच्या कार्यात दखल घेणार नाही. त्यामुळे संघर्ष होणार नाही. काम योग्य रितीने पूर्ण होईल.म्हणून हा सिद्धात अहस्तक्षेपाचा सिद्धांत ठरतो.

३. **समन्वयाचा सिद्धांत-** विविध गुणावर समाजाची तीन वर्गात विभागणी झालेली आहे. प्रत्येक वर्गाचे काम भिन्न असून सुद्धा संयम व एकमेकांच्या गरजेपूर्तीतून एकता व समन्वय साधला जातो.

४. **आत्म्याचा गुण-** न्याय ही शरीर बाहय कृत्रिम वस्तू नसून आत्म्याचा व अंर्तमनाचा अधिकार आहे. त्यामुळे न्याय सृजनात्मक शक्ती आहे.

५. **व्यक्ती व समाजहित एकरूपता-** व्यक्तीचे विस्तारीत रूप म्हणजे राज्य होय. व्यक्ती संपूर्ण राज्याचा एक भाग असते. व्यक्ती विकास राज्यातच होऊ शकतो. व्यक्ती व राज्याचे हित परस्परपूरक असते कारण चांगले जीवन निर्माण करणे आदर्श राज्याचे ध्येय असते.

**न्यायसिध्दांताचे टीकात्मक परिक्षण-** प्लेटोच्या न्याय सिद्धांताच्या माध्यमातून अथेन्समधील लोकशाहीतील दोष दूर करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती व वर्गाची कर्तव्य निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु या सिद्धातात पुढील दोष आहेत.

१. **वर्ग विभाजन दोषपूर्ण-** प्लेटोच्या मते प्रत्येक व्यक्तीत तीन गुण असतात. प्रधान गुणाच्या आधारावर वर्ग विभाजन केलेले आहे. मात्र परिस्थितीनुसार व्यक्तीमध्ये एखादा गुण प्रधान असतो तर अनेक व्यक्तीकडे तिन्ही गुण दिसून येतात याकडे तो दुर्लक्ष करतो.

२. **व्यक्ती विकासात अडथळा-** एका व्यक्तीला गुणवत्तेनुसार आयुष्यभर एकच कार्य करावयाचे असल्यामुळे दुसऱ्या व्यवसायाची निवड करता येणार नाही. त्यामुळे भारतीय वर्गव्यवस्थेसारखी त्रैवर्गीय जातीव्यवस्था निर्माण होऊन स्वातंत्र्य मिळणार नाही. त्यामुळे व्यक्ती विकासास अडथळा येईल.

३. **न्यायापेक्षा नैतिकता म्हणणे योग्य -** प्रत्येक वर्गाने आपले कार्य करावे इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे ही नैतिकता आहे. या नैतिकतेला प्लेटो न्याय व आंतरआत्माचा गुण असे म्हणतो.

४. **कर्तव्यावर भर-** प्लेटो व्यक्तीला राज्यापेक्षा दुय्यम मानतो. समाज शरीरात एक अवयव म्हणून कार्य करण्यातच न्याय शोधतो. व्यक्तीना अधिकार न देता निव्वळ कर्तव्याचे वर्णन करतो.

५. **वरिष्ठ वर्गाचे वर्चस्व -** प्लेटोने राज्याची सत्ता शासक वर्गाकडे सोपविल्यामुळे एका वर्गाची हुकूमशाही निर्माण होईल. त्यांनी सत्तेचा गैरवापर केला तरी सैनिक व उत्पादक वर्गाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्यामुळे राज्यकर्त्या वर्गाला सत्तेवरून दूर करता येणार नाही. या वर्गवारीने श्रमिकांना हीन लेखले जाईल.

अशा प्रकारे प्लेटोच्या न्याय सिद्धात दोष दिसून येतात

**प्र.२ रा. प्लेटाचा शिक्षणविषयक विचार सांगा?**

प्लेटोला आदर्श राज्याची निमिर्ती करावयाची होती. आदर्शराज्याचा न्याय हा प्रमुख आधार आहे. समाजातील तीन वर्ग आपल्या कर्तव्याचे पालन तेव्हाच करतील जेव्हा त्यांना गुणवत्तेनुसार कर्तव्याचे ज्ञान होईल. हे ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी त्याने शिक्षण विषयक विचार मांडले आहेत. प्रत्येक मानवाने आपले कार्य कुशलतेने पार पाडण्यासाठी त्याच्यातील अभिजात गुणाचा विकास झाला पाहिजे. शिक्षणाने व्यक्तीला कर्तव्य करण्यासाठी प्रेरणा मिळते. बार्करच्यामते, शिक्षण मानसिक रोगाला मानसिक औषध उपचाराने दुरूस्त करण्याचा प्रयत्न म्हणजे प्लेटोचा शिक्षण सिद्धात होय. म्हणून रूसो प्लेटोचा रिपब्लिक ग्रंथाला शिक्षणशास्त्रावरील सर्वोकृष्ट ग्रंथ मानतो.

**शिक्षणाचे उद्देश-** प्लेटो शिक्षणाचे वैयक्तिक व सामाजिक असे दुहेरी उद्देश सांगतो. व्यक्तिगत उद्देशात बौद्धिक विकास, ज्ञानाजन, सत्य शोधन इ. चा समावेश करतो. सॉक्रेटिसच्या प्रभावामुळे इंद्रीयजन्य ज्ञानापेक्षा तत्वज्ञानावर अधिक भर देतो. मानवी मनातील सुप्त गुण आवरणमुक्त करून त्याला प्रकाश दाखविणे हा शिक्षणाचा खरा उद्देश आहे. शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया आहे. समाजाचा भाग म्हणून व्यक्तीमध्ये समाजाप्रती कर्तव्य भावना निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. व्यक्तीला शिक्षणामुळे समाजात उच्च प्रतिष्ठा मिळते. शिक्षण निरनिराळया वर्गात राजकिय जागृती व कर्तव्य भावना निर्माण करते.

**शिक्षण सिध्दांताची गुण वैशिष्टयै-**

**१. राज्य नियंत्रीत शिक्षण-** प्लेटो आदर्श राज्यासाठी राज्य नियंत्रित शिक्षणाची आवश्यकता सांगुन सर्वाना समान शिक्षण दिले पाहिजे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यापेक्षा व्यक्तीला राज्याची सेवा करण्याचे यंत्र बनविणारी शिक्षण व्यवस्था सांगतो.

**२. वय व शिक्षण सांगड-** प्लेटोने वय व मानसिक आधारावर शिक्षणाचे प्राथमिक व उच्च शिक्षण हे दोन टप्पे पाडले. वयाच्या सहाव्या वर्षापासून ते वयाच्या पन्नास वर्षापर्यत शिक्षणाची व्यवस्था करतो. शिक्षण जन्म भर चालणारी प्रक्रिया मानतो.

**३. स्पार्टा व अथेन्स येथील समन्वय-** अथेन्स मधील बौद्धिक शिक्षण व स्पार्टा राज्यातील शारीरिक शिक्षण याचा समन्वय केला. अथेन्स येथील व्यक्तिगत विकास व स्पार्टामधील सामाजिक कल्याण यांना आदर्श राज्यासाठी एकत्र गुंफलेले आहे.

**४. स्त्री-पुरूषांना सारखे शिक्षण-** प्लेटोने स्त्री व पुरूषासाठी एकाच शिक्षणाचा पुरस्कार केला. स्त्रियांना चार भिंतीत ठेवून कोणतेही राज्य विकसित होऊ शकत नाही. कारण राष्ट्राची अर्धी शक्ती वाया जाते. स्त्री-पुरूषांत शारीरिक भेद असून मानसिक व बौद्धिक भेद मानत नाही.

**५. उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष-** प्लेटोने शिक्षण सर्वा साठी खुले केलेले असले तरी उत्पादक वर्गासाठी कोणताच अभ्यासक्रम सांगीतलेला नाही. त्याचे संपूर्ण लक्ष सैनिक व शासक वर्गावर केंद्रीत केल्यामुळे उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष केले.

**शिक्षणाचे स्वरूप व टप्पे-** प्लेटोने शिक्षण व्यवस्थेचे वयाच्या आधारावर दोन टप्पे पाडलेले आहेत. त्यात प्राथमिक व उच्च शिक्षण हे प्रमुख टप्पे आहेत. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय चारित्र्यनिर्मिती असून उच्च शिक्षणातून बुद्धीचा आविष्कार केलेला आहे. हे शिक्षणाचे टप्पे पुढील प्रमाणे होत.

**अ) प्राथमिक शिक्षण:-**

**१. ६वर्षापर्यंत-** वयाच्या ६ वर्षापर्यंत बालकांना नीतीधर्माचे शिक्षण सरळ व सोप्या गोष्टीमधून देणे व त्यांना चांगल्या सवयी लावणे हा हेतू असावा. चांगल्या बद्दल प्रेम व वाईट गोष्टी तुच्छता वाटली पाहिजे. चांगल्या नागरिकांचा खरा पाया व चारित्र्य घडण्याची सुरूवात या टप्प्यापासूनच होत असते.

**२. ६ ते १८ वर्ष-** सुदृढ शरीरात सुदृढ मन राहते. म्हणून या वयात शारीरिक निरोगी व्हायला पाहिजे. त्याचा बौद्धिक विकास झाला पाहिजे. म्हणन व्यायाम व संगीतावर प्लेटो भर देतो. व्यायामाने शारीरिक विकास तर संगीता मुळे आत्म्याचा विकास होतो. सर्वांगीण विकासासाठी नैसर्गिक शास्त्र, आहार, औषधी यांच्या अभ्यासाची त्याने जोड दिली आहे.

**३. १८ ते २०-** या वयात संयम, शिस्त व आज्ञापालनासाठी सैनिक शिक्षण दिले जाते. त्यातून शारीरिक विकास व बलसंवर्धन साधला जाईल.

या शिक्षणानंतर एका परीक्षेचे आयोजन करण्यात येईल. जे परीक्षेत यशस्वी होतील त्यांना उच्च शिक्षण दिले जाईल. ज्यांना परीक्षेस यश मिळणार नाही त्यांचा समावेश उत्पादक वर्गात टाकले जाईल.

**ब) उच्च शिक्षण-** प्लेटोने उच्च शिक्षणाची दोन भागात विभागणी केलेली आहे.

१. **२० ते ३० वर्ष-** उच्च शिक्षणाचा पहिला टप्पा दहा वर्षाचा आहे. या वयात बौद्धिक शिक्षण देण्यासाठी गणित, तर्कशास्त्र व विज्ञानाचे जाईल. त्या सोबत सैनिक शिक्षण दिले पाहिजे. प्लेटो भूमितीच्या शिक्षणाला प्राधान्य देतो. ज्याला भूमितीचे ज्ञान नाही अशाना अकॅडमीत प्रवेश देत नसे. या अभ्यासक्रमानंतर परिक्षेचे आयोजन करून परीक्षेत यशस्वी होणाऱ्यांना उच्च शिक्षण दिले जाईल. परीक्षेत अपयशी होण्याचा समावेश सैनिक वर्गात केला जाईल.

२. **३० ते ३५ वर्ष-** हा शिक्षणाचा उच्च टप्पा असून या काळात गणित व तत्वज्ञानाचे शिक्षण दिले जाईल. प्लेटो गणित व तत्त्वज्ञानासोबत द्वंद्ववादावर भर देतो. द्वंद्ववादातून सर्वोच्च सत्य ज्ञानाची प्राप्ती होऊ शकते. हे शिक्षण पूर्ण केल्यानंतर तत्वज्ञानी बनलेल्या व्यक्ती प्रशासनाची कामे पार पाडतील. जो खरा ज्ञानी आहे त्याला प्रशासन चालविण्याचा अधिकार आहे.

३. **३५ ते ५०-** प्लेटोचा तत्वज्ञानी शासक ३५ ते ५० वर्षापर्यत वास्तविक व अनुभविक शिक्षण पंधरा वर्ष चालू ठेवेल. त्या काळात मनन व चितंन आणि नव्या शासकांना मार्गदर्शन करण्यात घालवावयाचा आहे.

अशा प्रकारे प्लेटोचा शिक्षणविषयक सिद्धात समकालीन सामाजिक व राजकीय उद्दिष्टांशी समन्वयकारी दिसतो. अथेन्स व स्पार्टातील शिक्षण समन्वयासोबत मानसशास्त्रीय आधारावर प्लेटो तर्कसंगतरीतीने हा सिद्धात मांडतो.

**प्लेटोच्या शिक्षण सिद्धाताचे परिक्षण वा दोष-** प्लेटोच्या शिक्षणविषयक सिद्धातात पुढील दोष आहेत.

**१. उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष-** प्रत्येकाच्या अतः प्रवृत्तीच्या विकास करण्यावर प्लेटो भर देतो पण शिक्षण व्यवस्थेत तो निव्वळ पालक वर्गाच्या विकासाकडे लक्ष दिले गेले. उत्पादक वर्गाच्या कौशल्यात वाढ करण्याचा कोणत्याही योजना नाहीत. उत्पादक वर्गाकडे तो दुर्लक्ष करतो.

**२. गणित व तत्वज्ञानावर अनावश्यक भर-** प्लेटो गणित व भूमिती न येणाऱ्यांना आपल्या ॲकॅडमीत प्रवेश देत नसे. त्याने शिक्षण सिद्धातात गणित व तत्वज्ञानावर अनावश्यक भर दिला. साहित्य व कलावर राज्याचे नियंत्रण लादून सांस्कृतिक विकासाकडे दुर्लक्ष तो करतो.

**३. जीवनभर सिद्धात अनुत्साहकारक-** वयाची ३५ वर्ष शिक्षणात घालविणारा तारुण्य संपल्यानंतर तो कोणते धडाडीचे काम करू शकत नाही कारण वाढत्या वयाबरोबर उत्साह कमी होतो याकडे दुर्लक्ष करतो.

४. **आदर्श शासक घडविण्यास असमर्थ-** प्लेटोने डायन व त्यानंतर डायोनेसिस यांना आदर्श राज्यकर्ता बनविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. वास्तवाकडे दुर्लक्ष करून तात्त्विक व कवि कल्पनेत प्लेटो रममाण होताना दिसतो.

५. **समान शिक्षण योग्य होणार नाही-** प्लेटो स्त्री व पुरूषांना समान शिक्षण सांगतो. मात्र पुरूषाचे शौर्य तसेच स्त्रियाची भावूकता व कलात्मकता गोष्टीत रममाण होतात याकडे तो दुर्लक्ष करतो. त्यामुळे समान शिक्षण योग्य होणार नाही.

वरिल दोष असूनही प्लेटोच्या शिक्षणाचा हेतू लक्षात घेतल्यास त्याने सामान्यापेक्षा सरस, बुद्धी असणाऱ्या पालक वर्गासाठी शिक्षणव्यवस्था सांगुन आज देखील शासककर्त्यांना विचार करण्यायोग्य शिक्षणव्यवस्था प्लेटोने सांगितले हे मान्य करावे लागते. प्लेटोच्या शिक्षणात वय व शिक्षणाची योग्य सांगड, संगीत व शास्त्र यांचा समन्वय आणि उत्तम राज्यकर्ते निर्मितीची तरतूद हे प्लेटोच्या शिक्षण सिद्धाताचे प्रमुख गुण सांगता येतील

**प्र.३ रा.प्लेटोचा साम्यवादाचा सिद्धांत स्पष्ट करा?**

प्लेटोला आदर्श राज्याची निर्मिती करावयाची होती. त्यासाठी तो मानवी स्वभावाचा विचार करून त्यात येणारे अडथळे दूर करू इच्छीत होता. आदर्श राज्यातील तीन वर्गात एकता व न्यायाची निर्मिती करण्यासाठी तो दोन व्यवस्थात सांगतो. त्यात शिक्षण व्यवस्था ही सकारात्मक व्यवस्था तर साम्यवाद ही नकारात्मक व्यवस्था होय. राज्याची सर्वश्रेष्ठ सत्ता ज्या पालकवर्गाच्या हाती असते. तो वर्ग भ्रष्ट व सत्तापिपासू होऊ नये असे त्याला वाटते. त्याच्या मते मानवी मन चंचल असून त्याला कनक व कांता याचा मोह असतो. या मोहात हा वर्ग अडकल्यास तो ध्येयापासून विचलित होईल. म्हणून त्याने साम्यवादाची कल्पना मांडली. राज्यकर्त्यांवर नियंत्रणासाठी त्याला हा पर्याय योग्य वाटतो. स्वार्थ व प्रलोभनापासून पालक वर्गाला मुक्त करणे हा प्लेटोच्य साम्यवादाचा हेतू होतो. त्यांचा साम्यवाद फक्त पालक (शासक व सैनिक) वर्गासाठी आहे. तो दोन प्रकारचा साम्यवाद सांगतो.

**अ) संपत्तीचा साम्यवाद-** आर्थिक साम्यवादाची कल्पना ग्रीकांना नवी नाही. क्रिट नगरराज्यात सामुदायिक शेती करण्याची पद्धत होती. स्पार्टामध्ये राज्यकर्तावर्गासाठी सामुदायिक भोजनालयाची पद्धत होती. प्लेटोने मनोवैज्ञानिक व राजकीय आधारावर संपत्तीचा साम्यवाद कल्पना मांडली. तुझे व माझे प्रवृत्ती माणसामध्ये स्वभाविक असते. संपत्तीचा मोह राज्यकर्त्यांना भ्रष्ट करते. दृढनिश्चयी राज्यकर्ता देखील संपत्तीच्या मोहाला बळी पडून आपल्या जबाबदाऱ्या विसरतो. म्हणून राज्यकर्त्या वर्गाला वैयक्तिक संपत्तीपासून दूर ठेवले पाहिजे. त्यांच्या गरजाची पूर्ती राज्याने केली पाहिजे. राजकीय दृष्टीने विचार केल्यास सत्ताधारी लोकांना लुबाडतात. आर्थिक व राजकीय सत्ता पालक वर्गात केंद्रीत झाल्यास हा वर्ग अधिक भ्रष्ट बनेल म्हणून राजकीय जीवनात शुद्धता निर्माण होण्यासाठी राजकीय व आर्थिक सत्तेचे विभाजन झाले पाहिजे.

प्लेटो खाजगी संपत्तीचा अधिकार उत्पादक वर्गाकडे व राजकीय अधिकार पालक वर्गाकडे हे विभाजन केले. पालक वर्ग सामुदायिक निवासस्थानात राहतील ते सोन्या चांदीला स्पर्श करणार नाहीत त्यांना वैयक्तिक उत्पादनाची साधने नसतील. सामुदायिक भोजनालयात भोजन करतील. त्यांच्या गरजा राज्यामार्फत पूर्ण केल्या जातील. त्यामुळे त्याचा निस्वार्थ जीवनाचा मार्ग मोकळा होईल. राज्य भ्रष्टाचारापासून दूर ठेवता येईल. सर्वसंग परित्याग करून पालक वर्गाला लोककल्याण साधने शक्य होईल. सामुदायिक संपत्तीचा त्याग करूनच राज्यकर्त्यांना मुक्ती मिळेल हा अध्यात्मवाद होता.

**ब) स्त्री व कुंटुंबाचा साम्यवाद-** संपत्तीसोबत स्त्रीच्या मोहात अडकल्यामुळे पालकवर्ग भ्रष्ट बनतो. आपल्या जीवनात सुखी जीवनासाठी आणि मृत्यूनंतर कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी वाटणाऱ्या चिंतेमुळे संपत्तीचा संग्रहीत करीत असतो. म्हणजे पत्नी व मुलाच्या प्रेमात अडकल्यामुळे पालक वर्गाचे अध:पतन होते व आपल्या कार्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे प्लेटो संपत्ती प्रमाणेच कुटुंब संस्थेचे उच्चाटन तो पालक वर्गापुरते करतो. प्लेटोने पालक वर्गाला कुंटुंब धारण करण्यापासून अलिप्त ठेवतो. पण त्यांच्या नैसर्गिक भावनाकडे तो दुर्लक्ष करत नाही. त्यासाठी सर्वोत्तम पुरूषांची सर्वोत्तम स्त्रीयाशी तात्पुरती भेट घडविल्यास सर्वोत्तम नागरीकांची पुढची पिढी निर्माण होईल,

अशी आशा व्यक्त करतो. या व्यवस्थेत राज्याकडून सुंदर स्त्रीयाची निवड केली जाईल. त्या स्त्रियांचा पालक वर्गाशी तात्पुरत्या स्वरूपात शारिरीक संबंध निर्माण केला जाईल. त्या संबंधातून त्या स्त्रियांना जी मुले होतील. ती राज्याच्या ताब्यात घेतली जातील. राज्य त्यांचे सार्वजनिक पद्धतीने संगोपन करेल. स्त्रियाचा तात्पुरत्या स्वरूपात राज्यकर्त्याशी संबंध असल्यामुळे मुले नक्की कोणापासून जन्माला आले हे स्त्री व पालक वर्ग दोघाना समजणार नाही. त्यामुळे पालक वर्ग सर्वांनाच आपली मुले समजून प्रेम करेल. त्यामुळे तुझे व माझे हा स्वार्थीभाव नष्ट होऊन स्वार्थी भावना राहणार नाही. अथेन्स मधील बंदिस्त स्त्रियांना मुक्त करून सृजनात्मक कार्याकडे त्यांना आकर्षित करणे हा त्याच्या स्त्री साम्यवादाचा हेतू होतो. चांगले नागरिक निर्माण करणे व स्त्री व पुरूष भेद नष्ट करणे हा प्लेटोचा साम्यवादाचा अंतिम उद्देश होतो.

प्लेटोचा दोनही प्रकारचा साम्यवाद पालक वर्गाला निःस्वार्थ, मोहमुक्त करून राज्याच्या कल्याणाची जबाबदारी पार पाडावी हे अपेक्षित करतो. कारण राज्यकर्त्या वर्गाच्या प्रामाणिकपणावर आदर्श राज्याचा डोलारा उभा असतो. म्हणून राज्यकर्त्यावर्गानी प्रामाणिक बनविण्यासाठी प्लेटो वरील दोनही प्रकारचे साम्यवाद मांडतो.

**प्लेटोच्या साम्यवादाची समिक्षा वा परिक्षण-** प्लेटोच्या साम्यवादात पुढील दोष आहेत.

१. **मर्यादित साम्यवाद-** प्लेटोने निव्वळ पालक वर्गासाठी सांगितला आहे. संपूर्ण समाजाच्या कल्याणाकरिता पालक व उत्पादक वर्ग असे विभाजन केले. उत्पादक वर्गाला वगळून एका लहान गटात साम्यवाद कसा यशस्वी होईल याचा विचार करत नाही.

२. **संपत्ती व कुटुंबाची स्वाभाविकता-** प्लेटो मानवच्या स्वाभाविक प्रवृत्तीकडे दुर्लक्ष करतो. उत्पादक वर्गास संपत्तीचा अधिकार देणे, पालक वर्गास नाकारणे योग्य होणार नाही. कारण त्यामुळे परस्परविरोधी वर्ग तयार होतील. त्यामुळे एक वर्ग दुसऱ्या वर्गाचा हेवा व तिरस्कार करेल. संपत्तीशिवाय कोणत्याही वर्गाचा विकास होणार नाही. कुटुंब संस्थामुळे राज्य स्थिर राहण्यास मदत होते याकडे दुर्लक्ष करून कुटुंब नष्ट करण्याचा सल्ला देतो. त्यामुळे समाजात अराजक निर्माण होण्याची शक्यता असते.

३. **मानवी भावनाकडे दुर्लक्ष-** प्लेटोने यांत्रिक पद्धतीने व्यक्तीला राज्याचा एक घटक मानतो. पालक वर्ग हा एक माणूस असून त्यालाही भावना आहेत याकडे दुर्लक्ष करतो. त्याला संपत्ती मिळणार नसेल तर तो कार्य कशासाठी करेल. स्थैर्य व सुरक्षेसाठी खाजगी संपत्ती उपयुक्त असते हे तो लक्षात घेत नाही.

४. **विरोधाभास-** प्लेटोला शासनकर्ते भ्रष्ट होण्याची भिती वाटते. तर सामान्य उत्पादक भ्रष्ट होणार नाहीत असे म्हणावयाचे आणि जर तत्त्वज्ञ शासक स्वनियंत्रित असेल तर त्यासाठी नकारात्मक साम्यवादाची व्यवस्था करावी हे विपरित वाटते.

५. **स्त्री व पुरूष फरक-** प्लेटोने स्त्री व पुरूष समान मानतो. शारिरीक फरकाशिवास इतर फरक अमान्य करतो पण स्त्री पुरूष केवळ यौन संबंधापुरते एकत्र येत नसून विशिष्ट ध्येयासाठी एकत्र येतात. ममता, भावुकता, वात्सल्य हे स्त्रियांचे विशेष गुण आहेत याकडे दुर्लक्ष करतो.

६. **यौवन संघर्षाची भिती-** एक स्त्री अनेकाची पत्नी व एक पुरूष अनेकाचा पती हे नाते प्लेटोच्या साम्यवादामुळे निर्माण होते. स्त्री सौदर्यामुळे सुंदर स्त्री प्राप्तीसाठी पालक वर्गात संघर्ष होईल. समाजात नीतिमूल्ये विरून जातील माता पिता भाऊ बहिण हे नाते राहणार नाही.

७. **ॲरिस्टॉटलने घेतलेले आक्षेप-** प्लेटोच्या संपत्तीच्या साम्यवादावर ॲरिस्टॉटल टीका करतो. खाजगी संपत्ती मानवी विकासास सहाय्यभूत ठरते. जीवनात स्थैर्य, प्रतिष्ठा आणि कामाची प्रेरणा संपत्तीतून निर्माण होते. खाजगी मालमत्तेतून दोन व उदारता गुणाचा विकास होता म्हणून तो संपत्तीचा साम्यवाद नाकारतो तसेच प्लेटोचा स्त्री साम्यवाद समाजात अनैतिकता निर्माण करेल त्यामुळे समाजात कोणतेच नाते शिल्लक राहणार नाही. सुंदर स्त्रियांच्या प्राप्तीसाठी संघर्ष होईल म्हणून तो हा साम्यवाद नाकारतो आणि कुटुंब ही नागरी जीवनाची पाठशाळा मानतो. स्थिर राज्यव्यवस्थेसाठी कुटुंब व संपत्तीची आवश्यकता विशद करतो.

प्लेटोच्या साम्यवादावर वरील आक्षेप घेतले जात असले तरी प्लेटोने राज्यकर्त्यावर्गातील स्वार्थ, संपत्तीचा मोह, संपत्ती संग्रह वृत्ती आणि संपत्तीमुळे केलेले जाणारे शोषण नष्ट करण्यासाठी साम्यवाद हा उपाय सुचविला मात्र त्याने सुचविलेला उपाय अत्यंत जहाल असल्यामुळे तो वास्तवतात येऊ शकला नाही. तरीही आज मर्यादित प्रमाणात संपत्तीचा साम्यवाद काही देशात दिसून येतो.

**प्र.३ रा. प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजाची संकल्पना विशद करा?**

प्लेटो रिपब्लिक ग्रंथात तत्त्वज्ञ राजाची संकल्पना मांडली आहे. राजे व राजपुत्र दोष मुक्त करण्यासाठी त्याने तत्त्वज्ञ शासकाची संकल्पना मांडली आहे. त्या काळात ग्रीक नगर राज्यामध्ये निरनिराळया शासन पद्धती होत्या. अथेन्समध्ये प्रजातंत्र, स्पार्टात सैनिकतंत्र, सिरक्युजमध्ये हुकूमशाही या सर्व शासन पद्धतीचा अभ्यास केल्यानंतर त्याला असे दिसून आले की या शासन पद्धतीत समाजहितापेक्षा व्यक्तिहिताला जास्त महत्त्व दिले जाते. बरेचसे राज्यकर्ते अन्यायी होते. या कारणामुळे जनतेमध्ये गोंधळ व अराजकतेची परिस्थिती निर्माण झाली होती. समाजात न्याय राहिला नव्हता हे सर्व दोष दूर करण्यासाठी प्लेटोने तत्त्वज्ञ राजाची संकल्पना मांडली. तो म्हणतो की, जोपर्यंत राजे तत्त्वज्ञ असणार नाहीत किंवा राजे हे तत्त्वज्ञ बनणार नाहीत, तोपर्यंत नगर राज्याचा नाश होत राहणे अटळ आहे असे सांगुन तत्त्वज्ञ शासकाची आवश्यकता विशद करतो.

**अ) प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजाची संकल्पना ज्ञानाच्या सिद्धांतावर आधारित आहे-** ज्ञानाचे तीन सिद्धांत आहे.

१. **इंद्रियजन्य ज्ञान-** गुहेत असलेल्या व्यक्तीला इंद्रियजन्य ज्ञान असते. कारण गुहेत अंधार असतो त्यामुळे व्यक्ती काहीही पाहू शकत नाही. स्पर्श करून त्याला ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे इंद्रियजन्य ज्ञान अपुरे असते उदा. अंधारात माणूस दोरीला साप समजतो.

२. **बुद्धिजन्य व तार्किक ज्ञान-** गुहेच्या तोंडाशी असलेल्या व्यक्तीला स्पष्ट दिसत नसते. तो गुहेच्या तोंडाशी असल्याने त्याला अंधुक ज्ञान असते. त्याला प्लेटो तार्किक ज्ञान असे म्हणतो. या व्यक्तीला गुहेतील व्यक्तीपेक्षा जास्त ज्ञान असते पण पूर्ण ज्ञान नसते.

३. **आत्मजन्य ज्ञान-** गुहेच्या बाहेर असलेल्या व्यक्तीला आत्मजन्य ज्ञान असते. कारण प्रकाशामुळे तो आपल्या सभोवतालीच्या व्यक्ती वा वस्तू स्पष्टपणे पाहू शकतो. ही ज्ञानाची अंतिम अवस्था प्लेटो मानतो. आत्मज्ञान असलेल्या व्यक्तीला पूर्ण ज्ञान असते. अशा व्यक्तीकडे शासकाची सूत्रे द्यावीत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शासकचे व जनतेचे कल्याण होईल हे प्लेटोला वाटते.

**ब) तत्त्वज्ञ राजाचे शासनावर नियंत्रण पाहिजे-** प्लेटोच्या मते संपूर्ण शासन ज्ञानाच्या वा बुद्धीच्या मार्गदर्शनाखाली असले पाहिजे. निसर्गाची भव्य देणगी तत्त्वज्ञ राजास लाभलेली असे व तो त्याचा सर्वोकृष्ट उपयोग करू शकतो. चातुर्य व शहापण याचे तो एक मूतिमंत प्रतीक असतो. तो सत्याचा पाठीराखा असतो. इंद्रियजन्य सुखाची त्याला ओढ नसते. तो समतोल मनाचा व स्वार्थापलीकडे गेलेला असतो. अशा पद्धतीने प्लेटो तत्त्वज्ञ राजाची उपयुक्तता विशद करून बुद्धिवान व्यक्तीकडे राज्यकारभार सोपवितो. ज्ञान ही न्यायाची कोनशिला मानतो. तत्त्वज्ञ शासकाला पूर्ण ज्ञान असल्याने समाज व व्यक्तीचा विकास घडवून आणू शकतो. कारण चांगल्या गुण व शासकाच्या अभावी जनतेला दु:ख सहन करावे लागते. तत्त्वज्ञ शासकात चांगल्या गुणाचा समन्वय झाला आहे. हे गुण समाजातील सर्व लोकामध्ये नसतात. ते गुण शिक्षण यंत्रणेतून निर्माण केले जातात. त्यासाठी तत्त्वज्ञ शासकास योग्य शिक्षण देवून योग्य परिक्षेत पास झाल्यानंतर तो सत्तेवर आला आहे. त्याला आयुष्यभर अनेक गोष्टीचे शिक्षण घ्यायचे आहे. तो मोहाला बळी पडू नये म्हणून स्त्री व संपत्ती यांच्यापासून त्याला दूर ठेवले आहे. त्यासाठी प्लेटो स्त्री व संपत्तीचा साम्यवाद शासकासाठी सांगतो.

**क) तत्त्वज्ञ राजाची भूमिका-** प्लेटोच्या मते तत्त्वज्ञ राजा हा उत्तम संस्कारित असल्याने त्यांच्यात स्वार्थ भावना नसते. तुझे आणि माझे असा कोणताही भेदभाव न करता संपूर्ण समाजासाठी तो कार्य करीत असतो. त्याला निसर्गाच्या देणग्या वा बुद्धिमत्ता प्राप्त झालेल्या असतात आणि त्यांच्यात शिक्षणातून अनेक गुण निर्माण झालेले असतात. या गुणाचा उपयोग करून तो समाजात न्याय निर्माण करू शकेल. योग्य काय आणि अयोग्य काय हे

ओळखण्याची क्षमता असल्याने योग्य मार्गाचा तो स्वीकार करू शकतो. तो दैवी गुणांनी युक्त असतो. चांगुलपणा हा तर त्याचा स्थायीभाव असतो. म्हणून त्यांच्या हाती सत्ता असणे केव्हाही श्रेयस्कर असते.

**ड) तत्त्वज्ञ राजाच्या पात्रतेचे निकष-** कोणतीही व्यक्ती तत्त्वज्ञ राजा होऊ शकत नाही. प्लेटोचा तत्त्वज्ञ राजा हा गुणवत्ता धारण केलेला आहे. राजाजवळ विशेष स्वरूपाचे ज्ञान व बुद्धिमत्ता असावी म्हणून तो ज्ञान हा सर्वश्रेष्ठ गुण मानतो. राजा बुद्धिमान असला तरी तो संस्कारित असला पाहिजे म्हणून प्लेटो शिक्षणाची आवश्यकता विशद करतो. तत्त्वज्ञ राजा हा जन्मभर विद्यार्थी असल्यामुळे त्याने सतत शिकत राहिले पाहिजे. वयाच्या पहिल्या वयापासून ३५ वर्षापर्यंत शाळेत आणि ३५ ते ५० वर्षापर्यंत व्यावहारिक शिक्षणाची तत्त्वज्ञ राजासाठी आवश्यकता सांगतो. तो स्वार्थी बनू नये म्हणून त्याला संपत्ती व कुटुंब ठेवण्याचा अधिकार नाकारतो. तत्त्वज्ञ राजाला खाजगी मालमत्ता राहणार नाही आणि त्याला विवाह करता येणार नाही ही बंधने टाकतो. संपत्ती व कुटुंब नसल्यामुळे त्यांच्या जीवनात वैयक्तिक गोष्टीला काहीही महत्त्व राहणार नाही तो सर्व जीवन समुदायाच्या विकासासाठी व्यथित करेल

**ड) कायदयापेक्षा बुद्धी श्रेष्ठ-** प्लेटो बुद्धीला कायदापेक्षा श्रेष्ठ मानतो. त्याच्यामते कायदा कठोर व अपरिवर्तनीय असतो. त्यांच्यात परिवर्तन करायला वेळ लागतो. त्यामुळे तत्त्वज्ञ शासक बुद्धिमान असल्यामुळे कायदयाची आवश्यकता राहणार नाही. प्लेटो तत्त्वज्ञ राजावर कोणतेही कायदेशीर बंधन अमान्य करून त्याला सर्वश्रेष्ठत्व प्रदान करतो.

**इ) तत्त्वज्ञ शासकावरिल बंधने-** प्लेटो तत्त्वज्ञ शासक बंधनापासून मुक्त आहे पण त्याचा अर्थ असा नाही की तो अनियंत्रित आहे. त्याला पुढील गोष्टीचे पालन करावे लागते.

१. तत्त्वज्ञ राजावर राज्यघटनेच्या मूलभूत कायदयाचा आदर करण्याची नैतिक जबाबदारी आहे.
२. राज्याची स्थापना ज्या मूलभूत तत्त्वावर झालेली आहे. ती तत्त्वे स्वतःच्या इच्छेनुसार तो बदलू शकत नाही.
३. न्यायाचा सिद्धांत, शिक्षण प्रणाली, स्त्री व संपत्तीचा साम्यवाद या संकल्पनात बदल करण्याची परवानगी तत्त्वज्ञ राजास नाही.

वरिल बंधने प्लेटोने तत्त्वज्ञ राजावर बंधने टाकली आहेत

**तत्त्वज्ञानी राजा सिद्धांत परिक्षण वा दोष-** तत्त्वज्ञ राजा सिद्धात मांडण्यामागे प्लेटोचा हेतू भव्य आणि उदात्त असला तरी या सिद्धांत पुढिल दोष दिसतात.

१. **कायदयाचे सार्वभौमत्व अमान्य-** तात्कालिक ग्रीक लोकांच्या राज्यासंबंधी संकल्पनेकडे त्याने दुर्लक्ष केले. ग्रीकाच्या मते कायदयाचे सार्वभौमत्व मान्य असलेली नागरिकांचा संघ म्हणजे राज्य होय. परंतु प्लेटोच्या राज्यात कायदयाला महत्त्व नाही. तत्त्वज्ञ राजाला अमर्याद सत्ता देतो त्यामुळे तो अनियंत्रित होऊ शकेल याकडे लक्ष देत नाही.
२. **बुद्धी हा विशेषाधिकार नाही-** प्लेटोने तत्त्वज्ञ राजासाठी बुद्धी हा गुण योग्य मानतो परंतु बुद्धी ही थोडया व्यक्तीजवळ असते. समाजातील बहुसंख्य लोकाकडे प्लेटोने दुर्लक्ष केलेले आहे. बुद्धिवानाना विशेषाधिकार देणे हे लोकशाहीच्या विरोधी आहे.
३. **अमूर्त शास्त्राच्या अध्ययनावर भर-** प्लेटोने राजाला तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित व भूमिती इ. विषयाचे ज्ञान उपलब्ध करून दिले आहे पण हे विषय व्यवहारात उपयोगी नाहीत. प्रशासनाला केवळ योग्य अयोग्य याचा विचार करावयाचा नसतो तर देश काल परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा लागतो. पण प्लेटोचा शासक फक्त अमूर्त शास्त्राच्या अध्ययन करणारा आहे.
४. **वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष-** तत्त्वज्ञ शासकाची संकल्पना लोकप्रिय होण्याची शक्यता फार कमी आहे. कारण राजकारणात चांगले व वाईट दोहाचा समावेश असल्यामुळे तो आपला वेळ जास्तीत जास्त चिंतन व मनन करण्यात घालवेल त्यामुळे वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. **कायदयाचे महत्त्व नाकारले-** प्लेटो तत्त्वज्ञ शासकांची संकल्पना मांडताना कायदयाचे महत्त्व नाकारले आहे. शासकावर कायदा आणि जनमताचे बंधन घालू इच्छीत नाही .त्यामुळे शासक अनियंत्रित होण्याची शक्यता आहे. तत्त्वज्ञ शासक चूक करू शकणार नाही ही प्लेटोची संकल्पना चुकीची आहे.

प्लेटोच्या तत्त्वज्ञ शासकाची कल्पना अतिशय महत्त्वपूर्ण व सर्वोकृष्ट असली तरी हा विचार अस्तित्वात येणे अवघड आहेत. कारण त्याचे विचार अतिशय उच्च कोटीचे आहे ते वास्तवतात येणे शक्य नाही हे नाकारता येणार नाही.

**प्र.४ था.प्लेटोचे आदर्श राज्याबद्दलची संकल्पना वा सिद्धांत स्पष्ट करा?**

सॉक्रटिस हा प्लेटोचा गुरू त्यांच्यावर चुकीचे आरोप ठेवून राज्यकर्त्यांनी त्याला मृत्यूदंड दिला. या घटनेचा प्लेटोवर परिणाम होऊन तो राज्यकर्ता बनण्याऐवजी तत्वज्ञ बनला. त्याने आपले तत्वचिंतन आदर्श राज्य व तत्त्वज्ञ राजा यासाठी उपयोगात आणले. ग्रीक नगरराज्याचे अध:पतन व भ्रष्ट प्रकारावर उपाय शोधण्याचा परिणाम म्हणजे प्लेटोची आदर्श राज्यव्यवस्था होय. प्लेटाचा आदर्श राज्य हा कल्पनाविलास नसून ग्रीक नगरराज्यातील शासनप्रणालीचे निरक्षण करून चांगल्या तत्त्वाचे एकत्रीकरण करण्यासाठी मांडलेला तो एक तात्त्विक विचार म्हणून आदर्श राज्य संकल्पनेकडे पाहिले जाते. आदर्श राज्यामध्ये कार्य विशेषीकरण व तत्त्वज्ञ शासक यावर त्याने भर दिला आहे. जोपर्यत तत्त्ववेत्ते हे राज्यकर्ते होणार नाही तोपर्यंत राज्याचे कल्याण असंभव मानतो. त्यांचा सिद्धात क्रांतिकारी वाटत असला तरी समकालीन परिस्थितीत तो सुधारणावादी आणि नगरराज्यापुरता मर्यादित आहे. त्याने रिपब्लिकन ग्रंथात आदर्श राज्याची संकल्पना मांडली आहे. ही संकल्पना पुढिल प्रमाणे होय.

**आदर्श राज्याची वैशिष्टये व आधार-**

**१. गरजापूर्ती व श्रमविभाजन-** सॉक्रटिसच्या राज्य चालविण्यासाठी राज्यकर्त्यावर्गाकडे निष्णात ज्ञान असावे या कार्यविशेषीकरणाच्या सिद्धातावर आधारलेला आहे. माणूस हा सामाजिक प्राणी आहे. आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी एकमेकांचे सहकार्य ध्यावे लागते. माणसाच्या भौतिक गरजाची पूर्तता राज्यातच होऊ शकते. उदरनिर्वाह हा मानवी जीवनाचा एकमेव उद्देश नसतो. सर्वश्रेष्ठ जीवनाची प्राप्ती राज्याकडून व्हावयास हवी. त्यासाठी आदर्श राज्य आवश्यक असते. समाज परस्पर सहकार्यावर आधारित असतो. उदा. शिंप्याला दुसऱ्याचे कपडे शिवावे लागतात कारण त्यातून परस्पराची सोय होते. या सर्वात सुसंवाद व समन्वय साधणे हे राज्याचे कार्य असते. व्यक्तीचे कार्य कौशल्य व श्रमविभागणी अभिजात गुणांवर आधारित असल्याने न्याय समाज निर्माण होऊ शकेल. परस्परांच्या गरजा भागविण्यासाठी श्रमविभागणीची आवश्यकता असते. त्यासाठी प्रत्येकाने एकच काम करणे योग्य असते. प्लेटोने मानसशास्त्रीय आधारावर श्रमविभागणीचा सिद्धांत माडला आहे. उपजत गुणांना अनुरूप प्रत्येकाने एकच काम करणे आवश्यक असते. प्लेटोच्या मते प्रत्येक व्यक्तीत तीन गुणधर्म असतात. त्यानुसार तो राज्यातील व्यक्ती तीन वर्ग करतो आणि प्रत्येक वर्गाकडे भिन्न कार्य सोपवितो. बुद्धी, साहस व वासना या गुणांवर आधारित शासक, सैनिक व उत्पादक हे तीन वर्ग करतो. उत्पादकाने उत्पादन तर सैनिकाने संरक्षण आणि शासकाने राज्यकारभार करणे ही कार्य करावे. या कार्यविशेषीकरणाचे स्पष्टीकरण करून त्याने न्यायाचा सिद्धांत मांडला व तत्त्वज्ञ शासकाला महत्त्व दिले आहे.

**२. न्यायाची संकल्पना-** प्लेटोने आदर्श राज्यात न्यायाला विशेष महत्त्व दिले आहे. त्याला न्यायाच्या आधारावर राज्य निर्माण करावयाचे होते. न्यायाशिवास राज्य टिकू शकत नाही. पण प्लेटोला अभिप्रेत न्याय हा कायदयावर आधारलेला नव्हता तर तो तिन्ही वर्गाच्या प्रामाणिकपणावर आधारलेला आहे. प्लेटोने मानसशास्त्रीय आधारावर मानवी स्वभावाचे वर्णन करून मानवात बुद्धी, वासना व साहस हे तीन गुण असतात. त्या गुणावर शासक, सैनिक व उत्पादक हे तिन वर्ग निर्माण करून प्रत्येकाने आपआपले कार्य करावे दुसऱ्या वर्गाच्या कार्यात हस्तक्षेप करू नये तरच न्यायाची स्थापना होवू शकते. न्यायातूनच राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण होईल त्यामुळे न्याय हा आदर्श राज्याचा प्लेटो पाया मानतो. डनिंगच्या मते, लोक

चारित्र्यसंपन्न असतील तर कायदा अनावश्यक ठरतो आणि लोक चारित्र्यहीन असतील तर कायदा निरूपयोगी ठरतो म्हणून त्याने आदर्श चारित्र्यावर आधारित वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३. **तत्त्वज्ञ शासकाची संकल्पना-** प्लेटो आपल्या आदर्श राज्यात राजा हा तत्त्वज्ञी असावा यावर भर देतो. प्लेटो म्हणतो की, जो पर्यंत तत्त्वज्ञानी राजा राज्य करणार नाही तोपर्यंत जनतेचे दुःख कमी होणार नाही जर शासक तत्त्वज्ञ नसेल तर जनता सुखी राहणार नाही. जनतेच्या दुःखाचे खरे कारण जनतेचे मार्गदर्शक नेते अज्ञानी असतात. अज्ञानाने ज्ञानाचा मार्ग मोकळा करण्यासाठी तत्त्वज्ञ शासकाची संकल्पना मांडतो. ज्या प्रमाणे नावेसाठी नावाडयाची गरज असते. त्याप्रमाणे राज्यासाठी तत्वज्ञ शासकाची गरज असते. केवळ ज्ञानी माणसाला शासन करण्याचा अधिकार असून साधारण माणसांनी त्याचा मार्ग मोकळा केला पाहिजे. त्याने तत्त्वज्ञ शासकासाठी शिक्षणपद्धती सांगितली. शासनाचे कार्य काही मर्यादित ज्ञानी लोकाकडे असावे. कारण ते ज्ञानी, बुद्धिवान, दैवी गुणाचे उपासक, बाहय आकर्षणापासून मुक्त, सत्य जाणणारा व न्यायप्रिय असतात. तत्त्वज्ञ शासक कार्यापासून विचलित होऊ नये म्हणून तो स्त्री व संपत्तीचा साम्यवाद सांगुन कांचन व कांतेपासून त्याना दूर ठेवतो. शासनाची सत्ता तत्त्वज्ञ राजाकडे सोपवितो. तो निरंकुश असल्यामुळे कायदा व जनमताचे कोणतेही बंधन त्यावर ठेवत नाही. नागरिकांनी त्यांच्या आज्ञा निमूटपणे पालन कराव्यात हे अपेक्षा करतो.

४. **शिक्षण व्यवस्था-** प्लेटोने आपल्या आदर्श राज्यात शिक्षण व्यवस्थेला खूपच महत्त्व दिलेले आहे. शिक्षणामुळे प्रत्येकाला आपल्या कार्य व कर्तव्याची जाणीव निर्माण होते. श्रेष्ठ नागरिक, उत्तम सैनिक व उत्कृष्ठ राज्यकर्ते निर्माण करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता मानतो. शिक्षणाचे वय व गुणानुसार उच्च व प्राथमिक शिक्षण हे दोन प्रकार सांगुन त्यात संगीत, गणित, तत्वज्ञान, तर्कशास्त्र व शारिरीक शिक्षणावर भर देता. स्त्री व पुरूष असा भेदभाव न करता सर्वाना समान शिक्षणपद्धती सांगतो. शिक्षणव्यवस्थेत परीक्षा घेऊन त्या आधारावर तीन वर्ग पाडतो. त्याला शिक्षणातून तत्त्वज्ञ शासक निर्माण करावयाचा असल्यामुळे तो उत्पादक वर्गाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतो.

५. **साम्यवाद संकल्पना-** प्लेटोने आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी साम्यवादाची संकल्पना मांडली आहे. स्त्री व संपत्ती विषयक असे दोन साम्यवाद सांगतो. तो स्त्रियांना पुरूषाप्रमाणे मानतो. चूल आणि मूल या परंपरागत कार्यातून स्त्रियांना बाहेर काढून स्त्रियांना राजकारणात भाग घ्यावा म्हणून स्त्री साम्यवादाची संकल्पना मांडतो. कनक व कांता याच्यापासून राज्यकर्ते वर्गाला दूर ठेवण्यासाठी संपत्ती व स्त्रियाचा साम्यवादाची संकल्पना मांडतो. कारण राज्यकर्ता स्त्री व संपत्तीच्या आकर्षणातून भ्रष्ट व अनीतीमान बनतो. त्यामुळे त्याला या गोष्टीपासून दूर ठेवण्यासाठी साम्यवादाची योजना मांडतो.

६. **कला व साहित्यावर नियंत्रण-** आदर्श राज्यात कला व साहित्यावर राज्याचे संपूर्ण नियंत्रण राहिल. त्यांच्यामते कला व साहित्यांवर नियंत्रण ठेवण्याचे मुख्य कारण म्हणजे तरूणाच्या भावनाना आवाहन करणारे साहित्य त्यांच्या हातात पडले तर ते तरूण क्रांती करून उठतील त्यामुळे तरूणांच्या हातात साहित्य पडू नये अशी व्यवस्था तो करतो. तरूणांची मते सुधारण्यासाठी राज्याच्या संमतीने थोडेफार साहित्य प्रकाशित करण्यास तो परवानगी देतो.

**आदर्श राज्य सिद्धांताचे परिक्षण वा दोष-** प्लेटोच्या आदर्श राज्याची संकल्पना सैद्धांतिकदृष्टया उच्च कोटीची व मौलिक वाटत असली तरी व्यवहारात आणणे अशक्य असल्याने या संकल्पनेवर पुढील टीका केल्या जातात.

१. **वर्ग विभाजन अस्वाभाविकता-** प्लेटोने मानवी स्वभावाच्या आधारावर समाजाचे तीन वर्गात विभाजन केलेले आहे. पण हे विभाजन अस्वाभाविक आहे. कारण एका माणसांत तीनपेक्षा जास्त गुण असू शकतात. तसेच परिस्थितीनुसार गुणात बदल होत असतो याकडे दुर्लक्ष करून एकदा वर्ग निर्माण करून उत्पादक वर्गाच्या विकासाला संधी देत नाही. असमान असे तीन वर्ग निर्माण करतो.

२. **न्यायकल्पनेत दोष-** एका वर्गाला आयुष्यभर एकच काम करावयाचे असल्यामुळे व्यक्ती विकासाला वाव राहणार नाही. व्यवसाय बदलण्याची संधी नसल्यामुळे मानवी जीवनात विभिन्नता व स्पर्धा निर्माण होणार नाही त्यामुळे व्यक्ती विकासाला वाव राहणार नाही. तो केवळ कर्तव्यावर भर देऊन अधिकाराकडे दुर्लक्ष करतो.

३. **शिक्षणव्यवस्था एकांगी ठरते-** तो सर्वासाठी सक्तीचे व समान शिक्षण व्यवस्था सांगतो. पण शिक्षणाचे दोन टप्प्यात विभाजन करून सैनिक व शासक यांच्या उच्च शिक्षणावर भर देऊन उत्पादक वर्गाची उपेक्षा करतो. त्यांच्यात विशेष योग्यता निर्माण करण्याची संधी देत नाही. उत्पादक वर्गात विशेष कसब निर्माण करणारी शिक्षण पद्धती सांगत नसल्यामुळे ही व्यवस्था फक्त पालक वर्गाचा विचार करणारी असल्यामुळे एकांगी वाटते.

४. **अव्यवहार्य साम्यवाद-** प्लेटोने पालक वर्गापुरता साम्यवाद सांगितला आणि उत्पादक वर्गास वगळले म्हणून त्यांचा अर्ध साम्यवाद आहे. साम्यवादाच्या एका प्रकारात संपत्तीची मालकी राज्यकर्त्यांना देत नाही. राज्यकर्त्या वर्गाला कुटुंब ठेवण्याचा अधिकार देत नाही. ही गोष्ट मानवी स्वभावाच्या विरूद्ध आहे. त्यामुळे त्यांची साम्यवादाची कल्पना अव्यवहार्य आहे.

५. **तत्त्वज्ञ राजाची अनियंत्रित सत्ता अयोग्य-** प्लेटोने तत्त्वज्ञ राजात अनेक गुण सांगितले आहेत. शिक्षण व साम्यावादातून त्याला घडविण्याचा प्रयत्न तो करतो. परंतु तो देखील माणूस असल्याने प्रलोभनापासून किती दूर राहू शकेल याबाबत शंका आहे. आजपर्यंत तत्त्वज्ञ राजाचे इतिहासात उदाहरण नाही तो तत्त्वज्ञ राजावर कोणतेही नियंत्रण लादत नाही. त्यामळे तो अनियंत्रित बनेल याकडे दुर्लक्ष करतो. त्यांचा हा सिद्धांत लोकशाही विरोधी आहे.

६. **कायदयाचा अनादर-** प्लेटो आदर्श राज्यात कायदयाची गरज नाही असे तो सांगतो. पण कायदयाशिवाय राज्याची कल्पना करता येत नाही. कारण व्यक्ती ही लहरी असते. लहरीपणावर दिलेला न्याय हा अस्थायी असतो.

प्लेटोच्या आदर्श राज्यावर वरील टीका होत असली तरी त्या कल्पनेचे महत्त्व नाकारता येत नाही. त्यांच्या विचारातील काही तत्त्वे शाश्वत स्वरूपाची आहेत. राज्यकर्त्यांना शिक्षण, चारित्र्य, गुणवत्तेला महत्त्व, स्त्री व पुरूष समान शिक्षण, इत्यादी कल्पना आधुनिक राज्यकर्त्यांना प्रेरणा देऊ शकतात. आदर्श राज्य कल्पना अस्तित्वात आणणे कठीण काम असले तरी अशक्य मात्र नाही. राज्यकर्त्यांचा सत्ता लोभ, स्वार्थ, अज्ञान, भ्रष्ट आचरण राज्याच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरतात. त्यावर योग्य उपाय प्लेटोने सुचविलेले होते त्यात काळाप्रमाणे बदल करण्याची फक्त गरज आहे.

**प्र.५वा प्लेटोची उपआदर्श राज्यांची संकल्पना स्पष्ट करा?**

प्लेटोने रिपब्लिक ग्रंथात आदर्श राज्याची संकल्पना मांडली पण आदर्श राज्य प्रत्यक्ष व्यवहारात अस्तित्वात येऊ शकत नाही हे प्लेटोच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी The Laws ग्रंथात उपआदर्श किंवा दुसरे आदर्श राज्याचे व्यवहारवादी भूमिकेतून वर्णन केले. रिपब्लिक मधील आदर्शवादी भूमिकेच्या त्याग करून अनुभववादी दृष्टीने दि लॉज चे लेखन केले. सिराक्युज राजा डायोनोसिस याला आदर्श तत्त्वज्ञ राजा बनविण्याचा प्रयोग अपयशी ठरल्यामुळे तत्त्वज्ञ शासक निर्माण होणे अशक्य आहे. ही जाणीव निर्माण झाल्यामुळे त्याने तत्त्वज्ञ शासकांची कल्पना सोडून कायदयावर आधारित मिश्र राज्यघटना असलेले उपआदर्शाची संकल्पना मांडलेली आहे. रिपब्लिक मध्ये निवडक तत्त्वज्ञ राजाकडे अमर्यात सत्ता सोपविणारा प्लेटो दुसऱ्या आदर्श राज्यात कायदावर आधारित राज्य निर्मितीचा प्रयत्न करतांना दिसतो.

**उपआदर्श राज्याचे स्वरूप व वैशिष्टये-** प्लेटोच्या उपआदर्श राज्याची वैशिष्टये सांगितली जातात.

१. **मिश्र राज्यघटना-** प्लेटोच्या उपआदर्श राज्यात मिश्र राज्यघटना स्वीकारतो. मिश्र राज्यघटनेत राजेशाहीतील बुद्धी आणि लोकशाहीतील स्वातंत्र्य याचा समन्वय केला. परस्पर विरोधी प्रवृत्तीचा आणि व्यवस्थेचा संयोग करून त्यामधुन केवळ चांगल्या गुणांचा आविष्कार असेल आणि जे अधिकाराचे विभाजन करून तणाव

संपुष्टात आणतील अशी व्यवस्था तो करू इच्छीत होता. मिश्र राज्यघटनेचे दोन उद्देश सांगतो.एक प्रासंगिक होता ज्यात स्पार्टा नगरराज्याचे पतन सैनिक तंत्रात मानतो.अज्ञानामुळे शासक अत्याचारीपणे वागतात.तर लोकशाहीत स्वातंत्र्याचा अतिरेक होतो.म्हणुन दोन्ही दोषाचे निराकरण करण्यासाठी शक्तीचे बुध्दीबरोबर आणि स्वातंत्र्याचे व्यवस्थेसोबत संबंध ठेवून मध्यमार्गाने करता येईल.यासाठी मिश्र राज्यघटना आवश्यक आहे.सेबाईनच्या मते प्लेटोचे मिश्रराज्य राजेशाही व्यवस्थेतील बुध्दी आणि लोकशाही व्यवस्थेतील स्वातंत्र्य यांचा समन्वय आहे.

२. **राज्याची लोकसंख्या व भौगालिक स्थिती-** प्लेटोच्या उपआदर्श राज्याची लोकसंख्या ५०४० असावी. लोकसंख्या स्थिर राहण्यासाठी राज्याने लोकसंख्या नियंत्रणासाठी कायदे करावेत. उपआदर्श राज्याची जमीन सुपिक असावी. जमिन चारही बाजूने सुरक्षित असावी. राज्य चारही बाजूने नैसर्गिकरीत्या सुरक्षित असावे म्हणजे संरक्षणाचा अधिक खर्च येणार नाही. समुद्रकिनारा राज्याला लगत नसावा. कारण व्यापाराच्या निमित्ताने शत्रू आक्रमण केव्हा होईल हे सांगता येत नाही. त्याकरिता समुद्रकिनाऱ्यावर पहारा ठेवणे भाग पडते आणि त्याचा राज्याच्या कोषावर ताण पडतो. या ठिकाणीही तो आदर्शवादातून पूर्णपणे बाहेर पडलेला दिसत नाही.

३. **सामाजिक व्यवस्था-** प्लेटोच्या उपआदर्श राज्यात समाजाचे विभाजन संपत्तीच्या आधारावर चार वर्गात करतो. जीवनास आवश्यक संपत्ती, त्याच्या दुप्पट संपत्ती, पहिल्या वर्गाच्या तिप्पट व चारपट संपत्ती असलेले चार वर्ग करतो. यासाठी तो पूर्वीचा साम्यवादाचा त्याग करून संपत्तीच्या आधारावर वर्ग करतो आणि राज्यकर्त्यांना कुटुंब निर्माण करण्याचा अधिकार देतो. स्त्रियांना पुरूषांना शिक्षण घेण्याचा, सामाजिक व राजकीय कार्यात बरोबरीने भाग घेण्याचा अधिकार देतो. उपआदर्शराज्यात संपत्तीच्या साम्यवादाच्या संकल्पनेचा त्याग करून संपत्तीच्या आधारावर वर्ग विभाजन करतो.

४. **आर्थिक व्यवस्था-** प्लेटोने राज्याच्या नागरिकांत शेतीचे समान वाटप करून शेती खरेदी विक्रीचा अधिकार नाकारतो. वारसा हक्काने शेती पुढिल पिढीस दिली जाईल. संपत्तीच्या अधिकारास मान्यता देतो. प्रतिष्ठेनुसार चारही वर्गाना संपत्ती वाढवण्याचा अधिकार देतो. मर्यादापेक्षा जास्त संपत्ती राज्याकडे जमा करावी. उत्पादनाची वैयक्तिक मालकी परंतु सार्वजनिक उपभोग तो निर्माण करू इच्छीत होतो. गुलामासाठी शेती, नागरिक नसलेल्या स्वतंत्र व्यक्तीसाठी व्यापार, नागरिकासाठी राज्यकारभार आणि श्रम व उत्पादनाची कामे परकियांसाठी राखीव ठेवतो.

५. **धार्मिक व शैक्षणिक व्यवस्था-** शिक्षण राज्य नियंत्रित असावे. स्त्री पुरूषांना समान शिक्षण द्यावे. शिक्षणात संगीत व गणिताला स्थान देतो. शिक्षणाचा उद्देश नागरी गुण निर्माण करण्याचा व कायदयाविषयी नागरिकांमध्ये श्रद्धा निर्माण करणे हा हेतू होता. प्लेटो हा धर्माला वैयक्तिक न मानता संस्थात्मक स्वरूप देवू इच्छीत होता. धर्मावर शिक्षणाप्रमाणे राज्याचे नियंत्रण असावे. धार्मिक उत्सव व्यक्तिगतरित्या साजरे न करता सार्वजनिकरित्या साजरे करावेत. सार्वजनिक पुरोहिताकडून धार्मिक उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करावेत. स्त्रिया विनाकारण धार्मिक कार्यात अडकून पडू नये हा उद्देश होता. तसेच प्रत्येकाचा व्यक्तिगत धर्म असल्यास राज्याच्या निष्ठेपासून त्यांना अलग करेल म्हणून प्लेटो धर्म नैतिक व्यवहाराशी संबंधित असल्याने सार्वजनिक धर्मपालनाला महत्त्व देतो.

६. **राज्याची शासनव्यवस्था-** उपआदर्श राज्यात एक मुख्य संस्था महासभा असेल; त्यात सर्व नागरिक सभासद असतील. महासभेचे कार्य म्हणजे राज्यातील इतर संस्थाची निवड करणे. कायदा दुरूस्ती व न्याय देणे असेल. ही सभा वर्षातून एकदा बोलविली जाईल. महासभा सभासदानी निवडलेले ३७ सदस्याचे सल्लागार मंडळ असेल. मंडळाचे सदस्याचे वय ५०ते ७० दरम्यान असावे. राज्यकर्त्याना सल्ला देण्याचे कार्य मंडळाला करावे लागेल. याशिवाय प्रशासनाचे कार्य व्यवस्थितरीत्या पूर्ण करण्यासाठी एक प्रशासकिय परिषद असेल तिचे ३६० सदस्य असतील. प्लेटोने संपत्तीच्या आधारावर जे चार वर्ग निर्माण केले. त्या वर्गाना समान प्रतिनिधी

असेल. प्रत्येक वर्गाला ९० प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार असतो. परिषदेचे मुख्य कार्य म्हणजे राज्याची प्रशासनाची व्यवस्था करणे हे असेल.

७. **न्यायव्यवस्था-** न्यायादाने कार्य करण्यासाठी चार प्रकारच्या न्यायालयाची व्यवस्था केलेली आहे. स्थानिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी स्थानिक न्यायालय असेल. संपूर्ण राज्यातील वैयक्तिक दाव्याचा विचार करण्यासाठी निर्वाचित न्यायाधीशाचे न्यायालय असेल. त्या न्यायाधीशाची नियुक्ती प्रशासकिय अधिकारी करतील. क्षेत्रीय न्यायालय हे विशिष्ट क्षेत्रातील व्यक्तीच्या संघर्षावर न्याय देतील आणि शेवटी उच्चन्यायालय जे संपूर्ण जनतेचे मिळून बनलेले असेल. महासभा हेच उच्च न्यायालय म्हणून कार्य करेल. राज्याचे सर्व दावे येथे अंतिम न्यायादानासाठी येथे येतील. न्यायविभागाचा शिक्षणमंत्री प्रमुख असेल. पंतप्रधानाने शिक्षणखाते स्वतःकडे ठेवावे.

८. **दहा सदस्यांचे सर्वोच्च मंडळ-** मिश्र राज्याच्या घटनेत दहा सदस्यांचे एक मंडळ असेल. या मंडळात सल्लागार मंडळातील ३७ पैकी वयोवृद्ध धर्मगुरू व शिक्षणप्रमुख मिळून दहा सदस्य असतील. या मंडळाचे सर्व संस्था व कायदे या सर्वांवर नियंत्रण असेल. असे करून प्लेटोने कायदयाचे श्रेष्ठत्व अमान्य करीत दहाजणाच्या मंडळाला तत्वज्ञ शासकाचे सर्वोच्च स्थान दिले आहे.

**उपआदर्श राज्याचे टिकात्मक परिक्षण-**

१. प्लेटोने उपआदर्श राज्याची लोकसंख्या ५०४० असावी. त्यासाठी त्याने आकडेमोड करून संख्येचे समान भाग पाडून १ ते ७ चा गुणाकार व ८ ते १० चा गुणाकार ५०४० येतो म्हणून योग्य आहे. राज्याच्या संख्येत वाढ वा घट होणार नाही याची काळजी घ्यावी हे सर्व काल्पनिक व अव्यवहार्य वाटते.

२. राज्याची भूमी समुद्रकिनाऱ्यालगत दूर व चारही संरक्षित असावी असे सांगतो. व्यापाराच्या निमित्ताने शत्रू आक्रमणाची त्याला भिती वाटते. व्यापाराशिवाय कोणतीही प्रगती शक्य असेल हे लक्षात घेत नाही.

३. रिपब्लिकच्या आदर्शवादातून वास्तवात येण्यासाठी दि लॉज लिहून त्यात कायदयाला श्रेष्ठत्व देणारा प्लेटो दहा लोकांचे मंडळ निर्माण करून पुन्हा तत्त्वज्ञ शासकाकडे वळतो.

४. संपत्तीच्या वाटणीतून समाजात असमान चार वर्ग निर्माण करून आर्थिक साम्यवादाची झलक काही प्रमाणात शिल्लक ठेवतो.

५. नगरराज्यांपुरता उपआदर्श राज्याचा विचार करतो. आधुनिक काळात राष्ट्रराज्य व वाढती लोकसंख्या हा विचार मान्य होणार नाही.

अशा प्रकारे प्लेटोच्या उपआदर्श राज्यात अनेक दोष असले तरी लोकसंख्या नियंत्रण, स्त्रियांना समान दर्जा, कायदयाचे सर्वश्रेष्ठत्व इ.गोष्टीच्या महत्त्वाच्या आहेत. प्लेटोने भविष्यकाळातील राज्याला मार्गदर्शक ठरतील अशी शाश्वत तत्वे सांगितली आहेत.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. प्लेटोने लिहीलेल्या ग्रंथाची नांवे लिहा.

प्लेटोने Republic,Statesman आणी The Law इ. ग्रंथ लिहीले आहेत.

२. प्लेटोने सांगितलेले साम्यवादाचे दोन प्रकार कोणते?

उत्तर- प्लेटोने संपत्तीचा साम्यवाद आणि कुटुंब वा स्त्रियाबद्दलचा साम्यवाद हे दोन प्रकारचे साम्यवाद सांगितलेले आहेत.

३. प्लेटोच्या शिक्षण सिद्धातातील प्रमुख दोन टप्पे लिहा.

उत्तर- प्लेटोने शिक्षण सिद्धांत प्राथमिक शिक्षण ० ते २० वर्ष आणि उच्च शिक्षण २० ते ३५ वर्ष हे शिक्षणाचे प्रमुख दोन टप्पे आहेत.

४. प्लेटोच्या मते न्याय म्हणजे काय?

उत्तर- प्रत्येक वर्गाने आपआपले कार्य करावे आणि इतरांच्या कार्यात अहस्तक्षेप म्हणजे न्याय होय ही प्लेटोच्या न्याय संकल्पनेचा अर्थ सांगतो येतो.

५. प्लेटोने समाजातील व्यक्ती कोणते तीन गुण विशद केले आहेत.

उत्तर- वासना, साहस आणि बुद्धिमत्ता हे तीन गुण प्लेटोने विशद केले आहेत.

६. प्लेटोच्या न्यायाची कोणतीही दोन वैशिष्टये लिहा.

उत्तर - प्लेटोच्या न्याय सिद्धाताचे कार्यविशेषीकरण, अहस्तक्षेप आणि आत्म्याचा गुण ही वैशिष्टये आहेत.

७. प्लेटोने श्रमविभागणीच्या आधारावर कोणते तीन वर्ग पाडले आहेत.

उत्तर- प्लेटोने उत्पादक, सैनिक आणि प्रशासक हे श्रमविभागणीच्या आधारावर तीन वर्ग पाडले आहेत.

८. प्लेटोच्या आदर्श राज्याची तीन वैशिष्टये सांगा.

उत्तर- प्लेटोच्या आदर्श राज्याची तत्वज्ञानी राजा, आदर्श शिक्षण संकल्पना आणि संपत्ती व कुटुंबाचा साम्यवाद ही वैशिष्टये आहेत.

९. प्लेटोच्या उपआदर्श राज्याची दोन वैशिष्टये कोणती?

उत्तर- मिश्र राज्यघटना, दहा सदस्यांचे सल्लागार मंडळ, राज्याची लोकसंख्या व भौगोलिक स्थिती, आर्थिक व्यवस्था ही उपआदर्श राज्याची वैशिष्टये आहेत.

१०. प्लेटोच्या न्याय सिद्धांत मांडण्यासाठी कोणत्या तीन न्याय सिद्धांताचे त्यांने खंडन केलेले आहे.

उत्तर- पारंपरिक न्याय सिद्धात, क्रांतिकारी न्याय सिद्धात आणि व्यावहारिक न्याय सिद्धात या सिद्धांताचे खंडन करून प्लेटोने न्याय सिद्धात मांडला आहे.

## प्रकरण २ रे
## ॲरिस्टॉटल
(इ.स.पूर्व ३८४ ते इ.स.पूर्व ३२२)

**जीवनपरिचय-**ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राला जनक म्हटले जाते. तो प्लेटोचा शिष्य होता. ॲरिस्टॉटलचा जन्म इ.स.पूर्व ३८४ मध्ये थ्रेस येथील स्टॅगिरा येथे झाला. त्याचे वडिल राजदरबारी वैद्य होते. त्याला विज्ञात अभिरूची असण्याचे कारण वैज्ञानिक संस्कृती कारण होते. त्याने प्लेटोच्या ॲकॅडमीत १८ व्या वर्षी शिक्षणासाठी प्रवेश घेतला. तो जवळजवळ २० प्लेटोच्या ॲकॅडमीत अध्ययन व अध्यापनाचे काम केले. राज्यासंबंधी विचार मांडताना त्याने जीवशास्त्रीय सिद्धांताचा उपयोग करून लेखन केले. प्लेटोच्या विचाराची छाप त्यांच्यावर अखेरपर्यंत होती. प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याने ॲकॅडमी सोडून बारा वर्ष तो भ्रमंती करत राहिला. जगद्जेत्या सिंकदरचा गुरू होण्याची त्याला संधी मिळाली परंतु सिंकदरावर कोणतीच प्रभाव पाडू शकला नाही. त्याने निरीक्षण, विश्लेषण व उपाययोजना या शास्त्रीय पद्धतीने राज्यशास्त्रात लेखन केल्यामुळे त्याला राज्यशास्त्राचे जनक म्हणतात. ॲरिस्टॉटने तात्कालीन काळातील १५८ राज्यघटनाचा अभ्यास त्यांच्या तत्त्वज्ञानाला तार्किक व वास्तवतेची जोड आहे. काय असावे यापेक्षा काय करणे शक्य आहे यावर त्याने भर दिला. त्याने इतर राज्यापासून राज्यशास्त्राला स्वतंत्र व अलग केले. तुलनात्मक अध्ययन करून आपले आदर्श राज्याची संकल्पना मांडली. त्यामुळे अथेन्समध्ये लिसियम या विद्यापीठाची स्थापना करून अध्यापनाचे कार्य केले. त्याने जवळजवळ ४०० ग्रंथाचे लेखन केले. त्यात The Politics आणि The Constitution हे ग्रंथ राज्यशास्त्राच्या दृष्टीने उपयुक्त मानले जातात. त्यांचे इ.स.पूर्व ३२२ मध्ये निधन झाले. त्यांच्या विचारावर कौटुंबिक वातावरण, प्लेटोचा प्रभाव, तत्कालीन परिस्थिती व ग्रीक संस्कृती, सिंकदरचा सहवास आणि इतर देशाच्या भ्रमंती मिळालेल्या अनुभवाचा प्रभाव त्यांच्या विचारावर दिसून येतो.

**प्र.१ ला. ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राचा जनक का म्हटले जाते ते स्पष्ट करा?**

राज्यशास्त्राच्या अभ्यासाची सुरूवात प्लेटोच्या विचारापासून होते. त्याने राज्यशास्त्राला मौलिक तत्त्वज्ञान दिले त्यामुळे तो राज्यशास्त्रातील पहिला विचावंत ठरतो पण प्लेटो हा आदर्शवादी विचारवंत होता. वास्तवतेपेक्षा कल्पनाचित्र रंगविणे व काव्यात्मक शैलीत विषय मांडणी करतो. याउलट ॲरिस्टॉटने प्लेटोच्या विचारापासून प्रेरणा घेऊन विचार मांडले पण वास्तवावर भर देऊन शास्त्रीय विवेचन केल्यामुळे त्याला राज्यशास्त्राचे जनक मानले जाते. त्यांची कारणे पुढील प्रमाणे होत.

१. **राज्यशास्त्राचे स्वतंत्र अस्तित्व-** ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राला नीतिशास्त्रापासून स्वतंत्र शास्त्र म्हणून विकसित केले. त्यापूर्वी राज्यशास्त्र नीतिशास्त्राचा एक भाग मानला जात असे. प्लेटोने त्याच पद्धतीने विचार मांडलेले दिसतात. ॲरिस्टॉटलने ४००ग्रंथ लिहीले. त्यातील Politics या ग्रंथात राजकीय विचाराचा समावेश आहे. तो राज्यशास्त्राला सर्व शास्त्रात श्रेष्ठ शास्त्र मानतो. कारण राज्याशिवाय मानवाचे जीवन परिपूर्ण होऊ शकत नाही. श्रेष्ठ जीवनासाठी आदर्श राज्य असावे लागते. म्हणून त्यांच्या विचारात प्लेटोच्या तत्त्वदर्शनापेक्षा वास्तव परिस्थितीचे वर्णन जास्त दिसते.

२. **शास्त्रीय दृष्टिकोन-** ॲरिस्टॉटलला बालपणी पित्याकडून जीवशास्त्रीय विचाराचा वारसा मिळाला. त्याचा उपयोग त्याने राज्यशास्त्रातील मूलभूत सिद्धांत माडण्यासाठी केला. निरीक्षण, विश्लेषण व उपाय ही पद्धत त्याने विविध सिद्धांत मांडण्यासाठी वापरली. त्याने निरीक्षण व माहितीच्या आधारावर विविध राजकीय संस्थाचा अभ्यास करून विविध पैलू व तर्काचा वापर करून निष्कर्षपर्यंत पोहचण्याचा केला. राज्यशास्त्रीय लेखनासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला. त्याने केवळ तत्त्वज्ञाची भूमिका न स्वीकारता व्यवहारी राजकारणाचा विचार करून त्या काळातील १५८ राज्यघटनाचा तुलनात्मक अभ्यास करून निष्कर्ष मांडल्यामुळे तो राज्यशास्त्राचा जनक ठरतो. अनेक शास्त्रीय पद्धतीचा त्याने सर्वप्रथम अवलंब केला.

३. **अनुभवगम्य व हेतदर्शक ऐतिहासिक पद्धतीचा वापर-** प्लेटोने निगमनात्मक पद्धतीने अंतिम ध्येय पुढे ठेवून विचार केला तर ॲरिस्टॉटलने विगमनात्मक पद्धतीने प्राप्त अनुभवाच्या आधारावर काय करणे शक्य आहे यावर भर दिला. तसेच त्याने हेतूदर्शक व ऐतिहासिक दृष्टिकोनाचा उपयोग केला. या पद्धतीचा वापर पुढे मॅकेव्हिली व इतर मध्ययुगीन विचारवंतानी केलेला आहे.

४. **वास्तववादी विचार-** ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला आदर्शवादाकडून वास्तववादाकडे वळविले. राज्य निव्वळ मानवाला जीवन जगता यावे यासाठी अस्तित्वात आले नसून मानवाला सर्वश्रेष्ठ जीवन जगता यावे यासाठी अस्तित्वात आले. प्लेटो आदर्श राज्यात तत्वज्ञ राजा, साम्यवाद हे काल्पनिक सिद्धांत मांडतो तर ॲरिस्टॉटल खाजगी संपत्ती व कुटुंब व्यवस्थेचे समर्थन करतो. त्यामुळे त्यांचा दृष्टिकोन प्लेटोपेक्षा व्यावहारिक आहे.

५. **परंपरावादी-** ॲरिस्टॉटल हा परंपरावादी विचारवंत मानला जातो. त्यांच्या परंपरावादाचे तीन पैलू आहेत. व्यवहारवाद, वास्तवता व उपयुक्ततावाद हे तीन पैलू होत. गुलामगिरीची परंपरा तात्कालिक दृष्टया उपयुक्त असल्याने तिचे समर्थन करतो. नागरिकत्व सर्वांना न देता विशिष्ट गुणवत्ता असलेल्यांना बहाल करतो. नैसर्गिक असमानता मान्य करतो.

६. **कायदयाच्या सार्वभौमत्वाला महत्त्व-** ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची सुरूवातच कायदयाने होते. मानव बुद्धिवान असला तरी कायदा हा त्यापेक्षा श्रेष्ठ असतो. कायदा एका व्यक्तीचा एकाधिकार निर्माण होऊ देत नाही. कायदा हा राज्याचा मुख्य आधार आहे. संमिश्र संविधानाला तो महत्व देतो. व्यक्तीपेक्षा कायदा व कायदाचे अधिराज्य हे तो श्रेष्ठ मानतो.

७. **ॲरिस्टॉटलने सर्वव्यापी विचार मांडले-** राज्य ही संस्था व्यक्तीच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी निर्माण झालेली आहे. ती कायमस्वरूपी राहणार आहे. व्यक्ती राज्याबाहेर विकास करू शकत नाही. राज्याचा संबंध उपयुक्ततेशी नसून ती कल्याणकारी संस्था आहे हे आज सर्वमान्य झाले आहे. राज्याला लोकमताचा आधार आवश्यक सांगुन संपत्ती व कुटुंबाची उपयोगिता सांगतो. स्वातंत्र्य, कायदा व सत्तेचा समन्वय घातला व सत्ता तीन भागात विभालेली असावी हे सर्वमान्य तत्व त्याने सांगितले हे तत्व आज सर्वत्र दिसून येते.

८. **सत्ताविभाजनाची नांदी-** ॲरिस्टॉटलने पोलिटिक्स मध्ये कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ या तिन्ही शाखांचा स्वतंत्र विचार केला आहे. त्यामधुन पुढे मॉन्टेस्क्यूने सत्ताविभाजन सिद्धांत विकसित केला. त्याचे श्रेय ॲरिस्टॉटलकडे जाते.

९. **ॲरिस्टॉटलचा प्रभाव-** ॲरिस्टॉटलच्या विचाराचा प्रभाव मध्ययुगीन आणि अर्वाचीन काळात अनेक विचारवंतावर पडलेला दिसतो. सेंट ऑगस्ताईन, मॅकेव्हिली, डांटे, बॉंदे, मॉन्टेस्क्यू, हेगेल, कार्ल मार्क्स इत्यादी विचारवंतावर प्रभाव पडलेला दिसतो. सत्ता व संपत्ती यांची विषम वाटणी झाल्यास अनेक दु:ख निर्माण होतात असे सांगुन सत्ता व संपत्ती वाटणीचा मध्यममार्ग सुचवितो. आजदेखील ॲरिस्टॉटला वगळून राज्यशास्त्राचा विचार होऊ शकत नाही यातच त्यांच्या विचारांचे मौलिकत्व लक्षात येते.

वरिल कारणामुळे ॲरिस्टॉटला राज्यशास्त्राचे जनक मानले जातात.

**प्र.२ रा. ॲरिस्टॉटलचे राज्यविषयक विचार स्पष्ट करा?**

ॲरिस्टॉटलच्या मते राज्य ही नैसगिक संस्था असून राज्याची उत्पत्ती जीवन जगण्यासाठी नसून चांगले व समृद्ध जीवन जगता यावे यासाठी राज्याची निर्मिती झालेला आहे. राज्यसंस्थेचा उदय कुटुंब संस्थेमधून झाल्याचे त्याचे मत आहे. त्याने राज्याचे उदय, स्वरूप व कार्याचे विश्लेषण केलेले आहे. राज्याच्या उदयाबद्दलचे सोफिस्टांनी मांडलेली ऐतिहासिक संस्था तसेच राज्य करारातून निर्माण झाली असे मानणाऱ्या विचाराचे ॲरिस्टॉटलने खंडन केलेले आहे.

१. **राज्य स्वाभाविक मानवी संघटना-** राज्य ही एक स्वाभाविक संस्था असून राज्य विकासप्रक्रियाचा अंतिम परिणाम आहे. मानव हा समाजाशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय राहू शकत नाही. तो समाजात राहूनच एकमेकांच्या सहकार्याने आपल्या जीवनाची पूर्ती करू शकतो. मानवाच्या मूलभूत प्रवृत्तीमुळे स्त्री-पुरूष एकत्र येऊन कुटुंब निर्माण करतात. कुटुंबात कुटुंबप्रमुखाच्या आज्ञा सर्वांना मानाव्या लागत तसेच संपत्तीचे रक्षण

करावे लागत असे. यातून आज्ञापालन, सहकार्य व हित या आवश्यक तत्त्वाची निर्मिती झालेली होती. कुटुंबसंस्था परिपूर्ण नसल्यामुळे गावाची निर्मिती होते व ग्रामापासून नगरराज्य निर्माण होते. म्हणजे राज्य हे कुटुंब संस्थेचे विस्तारित रूप आहे. राज्यसंस्था स्वाभाविक असण्याचे कारण कुटुंबसंस्था स्वाभाविक आहे. मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी राज्य निर्माण झाले असून श्रेष्ठ जीवनाच्या प्राप्तीकरिता ते सातत्याने टिकून राहणार नाही. राज्य हे स्वाभाविक असल्यामुळे मानवी विकासासाठी आवश्यक आहे. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याशिवाय राहणारा मानव पशू किंवा परमेश्वर असू शकेल. श्रेष्ठ जीवनाची प्राप्ती राज्यातच होऊ शकेल. मानवी स्वभावाची स्वाभाविक निर्मिती म्हणजे राज्य होय. राज्य ही मानवी विकासाची अंतिम प्रक्रिया आहेत ती लादलेली नसून स्वीकारलेली आहे. ही संस्था मानवी विकासाला बाधक नसून साधक आहे. मानव परस्पर सहकार्य व विकास राज्यातच संभव होऊ शकतो. श्रेष्ठ जीवन हा मानवी उद्देश राज्यातच प्राप्त करता येऊ शकतो.

२. **राज्य सर्वश्रेष्ठ समुदाय-** मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी समुदाय निर्माण झाले. मानवी जीवनाच्या विशिष्ट बाजूची पूर्तता करणे हा समुदायाचा उद्देश असतो. हे सर्व समुदाय राज्यातच शक्य असतात. त्यांना आपला उद्देश राज्याशिवाय पूर्ण करणे शक्य नाही. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे राज्य साधन असून मानवाचा सर्वांगीण विकास हे राज्याचे ध्येय असल्याने राज्य ही एक सर्वश्रेष्ठ संस्था वा समुदाय ठरते.
३. **राज्य प्रथम व्यक्ती नंतर-** ॲरिस्टॉटल सेंद्रीय सिद्धांताचा पुरस्कार करतो. मानवाच्या विकास प्रक्रियेतून राज्य उदयास आले. ऐतिहासिक दृष्टीने विचार केल्यास व्यक्ती-कुटुंब-गांव आणि राज्य असा विकासाचा क्रम लागतो. परंतु राज्य व्यक्तीपूर्वी निर्माण झाले हे सांगतो तेव्हा तात्त्विक दृष्टिकोन तो मांडतो. राज्याला तो पूर्ण विकसित शरीर मानतो. शरीर पूर्ण विकसित झाल्याशिवास अवयवाला अर्थ प्राप्त होत नाही. उदा.डोळा तेव्हाच कार्य करेल जेव्हा तो शरिराचा भाग असेल तेव्हा शरीराशिवाय तो निरूपयोगी आहे. त्यानुसार राज्य प्रथम व व्यक्ती नंतर असा क्रम लावतो. राज्याशिवास व्यक्ती शून्यवत असते कारण विकास राज्यातच शक्य आहे. हा हेतू लक्षात घेऊन राज्य प्रथम व व्यक्तीनंतर असा तात्त्विक क्रम तो लावतो.
४. **मानवी शरीरासारखे राज्य-** शरीराचे अवयव एका सूत्रात बांधलेले असतात तोपर्यंत त्यांना महत्व असते. शरीरापासून अलग केल्यास ते महत्त्वहीन बनतात. त्याप्रमाणे व्यक्ती व समुदाय हे राज्याचे विविध अंग आहेत. राज्याअभावी ते ते नष्ट होतील. शरीर प्रक्रिया चालण्यासाठी अवयवाना कार्यरत राहावे लागते तसे राज्य प्रक्रियेसाठी व्यक्ती, प्रजा, विविध समुह यांनी कार्य केलेच पाहिजे. असे झाले नाही तर राज्यरूपी शरीरात बिघाड होईल आणि राज्याचा अंत होवून मानवी विकास कुंठित होईल. त्यामुळे राज्य मानवी शरीरासारखे आहे.
५. **एकता व स्वावलंबित्व-** ॲरिस्टॉटलने विविधतेतून एकता साध्य करण्याचा प्रयत्न केला. राज्याने आवश्यक बाबींवर नियंत्रण ठेवावे इतर गोष्टीबाबत नागरिकांना स्वातंत्र्य द्यावे. राज्यांत विविध कला गुणांचे लोक राहतात. त्यांची विविधता कायम ठेवून त्या सर्वांना एकाच सूत्रात बांधून एकता निर्माण करता येईल. विविधतेतून एकता निर्माण करून आदर्श व स्वावलंबी राज्य निर्माण करता येऊ शकेल. नागरिकांच्या सर्व गरजा राज्यात पूर्ण झाल्या पाहिजेत. सुखी व समृद्ध जीवनाचे लक्षण म्हणजे स्वावलंबित्व त्या काळात नगरराज्ये ही स्वावलंबी होती. विविधतेत एकता निर्माण करूनच आदर्श व स्वावलंबी राज्य निर्माण होऊ शकते असा ॲरिस्टॉटलला विश्वास वाटत होता.
६. **राज्याचा उद्देश व कार्य-** राज्य म्हणजे कुटुंब व खेडी यांचा समुदाय होय. या समुदायात सुखी व स्वयंपूर्ण जीवन जगता येणे एवढा मनुष्याचा मर्यादित हेतू नसतो. त्याला सर्वश्रेष्ठ जीवनाची प्राप्ती करावयाची आहे.म्हणून तो म्हणतो की, मानवी जीवनाच्या आवश्यकता भागविण्यासाठी राज्य निर्माण झाले असून ते चांगल्या व श्रेष्ठ जीवनाच्या उपलब्धेकरिता अस्तित्वात आले आहे. राज्यावर नैतिक उद्देश पूर्ण करण्याची जबाबदारी पार पाडण्याकरिता राज्याला सकारात्मक व नकारात्मक अशा दोन पद्धतीची कार्ये करावी लागतात. माणूस गुण दोषाचा पुतळा असून त्यांच्या अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवून उच्च प्रवृत्तीची जोपासना करून नैतिक विकास घडवून

आणणे हे राज्याचे कार्य होय. त्यासाठी व्यक्तीचे अन्यायापासून संरक्षण, भौतिक गरजाची पूर्तता, अधिकार रक्षण हे कार्य सांगितली. या कार्याशिवाय काही रचनात्मक कार्य ज्यात नैतिक मूल्याची वृद्धी, धर्मसंगत जीवन, शिक्षणाची व्यवस्था, सदगुणी नागरीकांची निर्मिती इ.कार्य करावीत. राज्याचे अंतर्गत व बाहय आक्रमणापासून रक्षण करावे. तसेच जीवन व संपत्तीच्य संरक्षणाची जबाबदारी पार पाडावी लागते. स्वावलंबित्व प्राप्त करून संपूर्ण विकासासाठी राज्याला कार्य करावयाचे असते. ॲरिस्टॉटल राज्याला नैतिक जीवनाचा अध्यात्मिक समुदाय म्हणतो.

**प्र.३ रा. ॲरिस्टॉटलचे राज्य वर्गीकरणाबाबत विचार स्पष्ट करा?**

**किंवा**

**राज्यवर्गीकरणाचा सिद्धांत सांगुन गतीचक्राच्या सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण करा?**

ॲरिस्टॉटलने शासन व राज्य यात फरक करण्याचा प्रयत्न केला. राज्यामध्ये सर्व नागरिकांचा समावेश होतो आणि शासन संस्थेत केवळ सत्ताधारक वर्गाचा समाविष्ट असतात. राज्याचा उद्देश कार्यान्वित करणारे माध्यम म्हणजे शासनसंस्था होय. राज्यकर्त्या व्यक्तीत बदल झाल्यास शासनात बदल होता. परंतु राज्यघटना बदल्याशिवाय राज्य बदलत नाही. तो राज्यघटना व राज्य या दोहाना एकच मानतो. राज्यघटना म्हणजे विशिष्ट नियमानुसार शासनसंस्थेची व्यवस्था होय. यात शासनसंस्थेच्या विविध विभागाचे परस्परसंबंध व पदाची सर्वोच्चता निश्चित केलेली असते. ॲरिस्टॉटलच्या राज्य वर्गीकरणावर प्लेटोच्या द स्टेटमन या ग्रंथातील वर्गीकरणाचा प्रभाव दिसतो. त्याने राज्याचे वर्गीकरण करतांना दोन तत्त्वे वापरली आहेत.

**अ) संख्यातत्व-** या तत्वात राज्यातील सार्वभौम सत्तेचा वापर करणाऱ्या व्यक्तीची संख्या विचारात घेतली.

**ब) गुणतत्व-** राजसत्ता वापरामागील त्या व्यक्तीचा हेतू किंवा उद्देश कोणता आहे. स्वार्थ हा हेतू असल्यास शासनाचा प्रकार अध:प्रतित ठरतो तर निस्वार्थ हेतू असल्यास तो प्रकार शुद्ध ठरतो.

**ॲरिस्टॉटलचे राज्याचे वर्गीकरण**

| **संख्यातत्व** | **गुणतत्व** | |
|---|---|---|
| **शासनाची सत्ता** | **राज्याचा उद्देश जनहित** | **राज्याचा उद्देश स्वहित** |
| १) एक व्यक्ती | राजेशाही Monarchy | एकतंत्र वा हुकूमशाही Tyranny |
| २) काही व्यक्ती | महाजनशाही Aristocracy | धनिकशाही Oligarchy |
| ३) सर्व व्यक्ती | घटनात्मक लोकशाही Polity | लोकशाही वा झुंडशाही Democracy |

ॲरिस्टॉटलच्या मते सार्वभौम सत्तेचा वापर प्रजेच्या हितासाठी होत असेल तर त्यावर आधारित शासनाचे तीन शुद्ध प्रकार पडतात. आणि सत्तेचा उपयोग जर स्वहित साधण्याकरिता होत असेल तर राज्यसंस्थेचे तीन विकृत प्रकार पडतात. शुद्ध व विकृत असे मिळून तो शासनाचे सहा प्रकार करतो ते प्रकार पुढील प्रमाणे होत.

१. **राजेशाही-** सार्वभौम सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती असते आणि ही व्यक्ती प्रजाहित दक्ष असून जनकल्याणाकरिता सत्तेचा वापर करतो तेव्हा तेथे राजेशाही हा शासनाचा प्रकार असतो. तो विवेकशील वर्तन करीत असल्याने व्यक्तीला नैतिक जीवन प्राप्त होते. त्यासाठी राजा हा सर्वगुण संपन्न असणे गरजे आहे. परंतु असा शासक मिळणे दुर्लभ असल्याने तो राजेशाहीचे समर्थन करीत नाही.

२. **एकतंत्र वा हुकूमशाही-** एकतंत्र हा राजेशाहीचा विकृत प्रकार आहे. यात सार्वभौम सत्ता एकाच व्यक्तीच्या हातात असते. परंतु सत्तेचा वापर जनकल्याणाऐवजी स्वहितासाठी करतो. या प्रकारात अन्याय, भ्रष्टाचार मोठया प्रमाणात आढळतो. हा शासनाचा निकृष्ट प्रकार आहे.

३. **महाजन सत्ता-** यालाच कुलीनतंत्र असेही म्हणतात. राज्याची सत्ता काही बुद्धिवान व श्रेष्ठ घराण्यातील काही व्यक्तीच्या हातात असते. आणि सत्तेचा वापर जनकल्याणासाठी केला जातो. कायदयानुसार शासन चालते.

४. **धनिक तंत्र-** हे महाजनशाहीचे विकृत रूप आहे. धनिकतंत्रात सत्ता काही लोकांच्या गटाकडे असते. ते सत्तेचा वापर स्वार्थासाठी करतात. त्यामुळे जनहिताकडे दुर्लक्ष होते. जनतेचे शोषण करून राज्यकर्ते संपत्ती जमा करण्याच्यामागे लागतात.

५. **घटनात्मक लोकशाही-** या प्रकारात शासनाची अंतिम सत्ता जनतेच्या हाती असते. या प्रकारात जनता प्रतिनिधी निवडते. सर्वसामान्य लोकांचे हित हा शासनाचा उद्देश असतो. मध्यवर्गीयांच्या हाती शासनाची सूत्रे असतात. ॲरिस्टॉटला हा शासनप्रकार सर्वोत्तम वाटतो.

६. **लोकशाही वा झुंडशाही-** घटनात्मक लोकशाहीचा हा भ्रष्ट प्रकार आहे. या प्रकारात जनतेत फूट पडून प्रत्येकजण सत्ता मिळविण्यासाठी गटबाजी, सत्तास्पर्धा, हिंसाचार व भ्रष्टाचार यांचा आधार घेतो. जनकल्याणाची जागा स्वकल्याण होते तेव्हा हा शासनाचा विकृत प्रकार जन्माला येतो.

**राज्याच्या परिवर्तनाचे गतिचक्र वा गतिचक्रांचा सिद्धांत-** शासनाची सत्ता कधीही स्थिर राहत नाही. त्यात सतत बदल होत राहतो. एकानंतर एक असा चक्राप्रमाणे शासन संस्था बदलत जाऊन पूर्ववत अवस्था प्राप्त होते असा सिद्धांत ॲरिस्टॉटलने मांडला. म्हणून या सिद्धांताला शासनसंस्थेच्या परिवर्तनाचा गतिचक्रांचा सिद्धांत म्हणतात. त्यांच्यामते जगात सर्वप्रथम राजेशाही हा शासनप्रकार अस्तित्वात आला. सुरूवातीला राजा हा सर्वगुण संपन्न होता. जनकल्याणासाठी राजसत्तेचा वापर करी कालांतराने राजा हा भ्रष्ट बनतो. त्या वेळेस राजेशाहीचे रूपांतर हुकूमशाहीत होते. हुकूमशाहीत जनतेवर अन्याय, अत्याचार करतो. सत्ता स्वतःच्या स्वार्थासाठी करतो. याअत्याचाराला कंटाळून राज्यातील काही कुलीन व बुद्धिवान लोक क्रांती करून सत्ता आपल्या ताब्यात घेतात. या प्रकाराला महाजन सत्ता म्हणतात. शासनाच्या या शुद्ध प्रकारात जनकल्याणाचा हेतू असतो. काही काळानंतर हे लोक भ्रष्ट बनतात व सत्तेचा वापर धन संपादन करण्यासाठी करतात. तेथून धनिकतंत्र सुरू होते. धनिकांच्या अत्याचाराला लोक कंटाळून जनता सत्तेविरोधात बंड पुकारतात आणि सत्ता आपल्या ताब्यात घेतात. अंतिम सत्ता लोकप्रतिनिधीच्या हातात असल्यामुळे सत्तेचा वापर जनकल्याणासाठी करतात यास तो घटनात्मक लोकशाही मानतो. काही काळानंतर सत्ता अज्ञानी व स्वार्थी लोकाच्या हाती गेल्यावर सत्ता स्पर्धा व गटबाजी सुरू होते. लोकशाहीचे विकृत स्वरूप निर्माण होते. त्यास तो झुंडशाही म्हणतो. सत्तेसाठी राज्यकर्त्या वर्गात आपसात संघर्ष होऊन अराजक निर्माण होते. या प्रकाराला जनता कंटाळते. समाजातील एखादी शूर व्यक्ती पुढे येऊन शासनाची सूत्रे आपल्या हाती घेते आणि जनकल्याणार्थ राज्यकारभार चालविते. या प्रकारे पुन्हा राजेशाही प्रस्थापित होते. हे राज्यव्यवस्थेचे ऐतिहासिक गतिचक्र सातत्याने चालत राहते.

**गतिचक्राच्या सिद्धांताचे परिक्षण-** ॲरिस्टॉटलच्या गतिचक्र सिद्धांत पुढील दोष दिसतात.

१. **शासनाचे वर्गीकरण-** ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण केलेले आहे. वास्तविक ते राज्याचे वर्गीकरण नसून शासनसंस्थेचे वर्गीकरण आहे. तो राज्य व शासन एकच मानतो.

२. **आधुनिक काळात अनुपयुक्त-** आज भिन्न भिन्न स्वरूपाचे शासन प्रकार अस्तित्वात दिसतात. एकात्म, संसदिय, साम्यवादी इ.प्रकार विकसित झाले. ॲरिस्टॉटल त्याचे विवेचन करित नाही. तो शासन संस्थेचे मर्यादित प्रकार सांगतो. आज त्यांचे वर्गीकरण उपयुक्त नाही.

३. **संख्यातत्वावर भर-** सत्ता किती लोकाच्या हाती आहे यावर तो अधिक भर देतो. त्याने गुणतत्वाकडे दुर्लक्ष केले असे टीकाकारांना वाटते.

४. **प्लेटोचा प्रभाव-** ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरणावर प्लेटोच्या द स्टेटमन ग्रंथातील वर्गीकरणाचा प्रभाव आहे. त्यात थोडा बदल करून सुधारित आवृत्तीत त्याने मांडलेली आहे.

५. **गतिचक्रातील दोष-** ॲरिस्टॉटल शासनाच्या परिवर्तनात राजेशाही पासून सुरू करून शुद्ध व विकृत प्रकारातून क्रमवार शासनात बदल सांगतो. शेवटी लोकशाहीतील भ्रष्ट्राचाराला कंटाळून होणाऱ्या बदलातून राजेशाहीपर्यंत

त्याचे चक्र फिरते. परंतु याच क्रमाने शासनात बदल होताना दिसत नाही. या शिवाय शासनाचे अनेक प्रकार असल्याने हा चक्र सिद्धांत लागू पडत नाही.

**टिप- कुटुंबसंस्थेविषयी ॲरिस्टॉटलचे विचार-** ॲरिस्टॉटल कुटुंब ही एक नैसर्गिक संस्था मानतो. कुटुंब ही सामाजिक जीवनाची पहिली अवस्था आहे. ही राज्याची आधारशिला असून त्यावर संपूर्ण सामाजिक जीवनाची इमारत उभी आहे. ती नागरी जीवनाची पाठशाला असून मानव जन्मतः या संस्थेचा सदस्य असतो. या संस्थेतून राज्यसंस्थेचा उदय झाला. कुटुंब समाजाचा लहान घटक असून स्वसंरक्षण, शिस्त, शारीरिक गरजाचीपूर्ती व नैतिक विकास कुटुंबातच होऊ शकतो. या कौटुंबिक व्यवस्थेत पती-पत्नी, मालक-गुलाम, आई-वडिल व मुले परस्पर संबंधाला विशेष महत्व असते. मानवाच्या राजकीय प्रवासाची कुटुंब ही पहिली पायरी असते. त्याला पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था अपेक्षित होती. कुटुंबावर वृद्ध पुरूषाचे नियंत्रण असावे. तो इतरापेक्षा जास्त गुणवान व बलवान असल्याने त्यांचे कुटुंबावर पूर्ण नियंत्रण असावे. स्त्रियांना चार भिंतीमध्ये ठेवणे त्याला योग्य वाटते. स्त्री पुरूषापेक्षा कनिष्ठ असल्यामुळे तिच्यावर पुरूषाचे नियंत्रण ठेवतो. गुलाम निबुद्ध असल्याने त्यांच्यावर विवेकी पुरूषाचे नियंत्रण असावे. कौटुंबिक व्यवहार परस्परात मैत्रीपूर्ण असले पाहिजे. कारण परस्परांच्या सहकार्यातून नैतिक व भौतिक आवश्यकतेची पूर्तता होते. कुटुंब संस्थेचा पुरस्कार करणार ॲरिस्टॉटल कुटुंबाला पूर्ण स्वातंत्र्य देत नाही. लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठीचे कायदे राज्याने करावे, शिक्षणाची व्यवस्था करावी ही सूचना त्याने केल्या. कुटंबाच्या स्वाभाविक प्रवृत्तीचे जतन करून स्थिर कुटुंब स्थिर राज्याचा आधार असतो.

**टिप-ॲरिस्टॉटलचे संपत्तीविषयक विचार सांगा-**

खाजगी संपत्ती मानवी मनाची स्वाभाविक प्रेरणा आहे. संपत्ती व्यक्ती विकासासाठी आवश्यक आहे. संपत्ती शिवाय सामाजिक जीवनाची संकल्पना व्यर्थ मानतो. संपत्ताी गृहस्थ जीवनासाठीचा जड वस्तूचा संग्रह असतो. दैनंदिन जीवन चालविण्यासाठी संपत्तीची गरज असते. ॲरिस्टॉटच्या मते आम्ही त्याला संपत्ती मानतो की, ज्यामुळे कौटुंबिक व राजकीय गरजाची पूर्तता होत असते. सुखी व समृद्ध जीवनासाठी संपत्ती आवश्यक असते. त्यामुळे तो संपत्तीचा अधिकार सर्व नागरिकांना देतो. तो संपत्तीचे दोन प्रकार सांगतो.

**१) निर्जीव संपत्ती-** घर, शेत, वस्तू इ.

**२) सजीव संपत्ती-** गुलाम, पशू इ.

कुटुंबासाठी संपत्ती आवश्यक असली तरी अमर्याद संपत्तीला ॲरिस्टॉटला मान्य नाही. मालमत्ता शाप न ठरता वरदान ठरावी. म्हणून त्यांने मर्यादित संपत्तीचे समर्थन केलेले आहे. चांगल्या जीवनासाठी खाजगी संपत्तीची आवश्यकता असते. संपत्तीतून माणसाला कार्याची प्रेरणा मिळते. उत्पादन वाढते. मानवी जीवनात आनंद निर्माण होता. औदार्य, सहानुभूती व जबाबदारीची जाणीव संपत्तीतून वाढत असल्याने ती नैतिक विकासाला पूरक असते. हा अधिकार आदर्श जीवनासाठी आधारभूत असतो त्यामुळे या अधिकाराचा जपून वापर करण्यावर भर देतो.त्यासाठी संपत्ती योग्य व नैतिक मार्गाने मिळवावी. संपत्ती मिळवण्याचे दोन प्रकार त्यांने सांगितले.

१) **नैसर्गिक मार्ग-** प्रत्यक्ष श्रमाद्वारे संपत्ती करणे याला नैसर्गिक मार्ग म्हणतो. उदा. शेती व पशूपालन

२) **अनैसर्गिक मार्ग-** उत्पादित वस्तूवर श्रम खर्च न करता नफा व व्याज या पद्धतीने मिळविलेल्या संपत्तीला अनैसर्गिक मार्ग म्हणतो. उदा. व्यापार, सावकारी

नैसर्गिक मार्गाला तो योग्य ठरवतो तर अनैसर्गिक मार्गाला अयोग्य मानतो. संपत्तीच्या अधिकाराचा दुरूपयोग होऊ नये म्हणून त्याने संपत्तीचे न्यायपूर्ण विनिमयाचे तीन मार्ग सांगितले आहेत.

१. व्यक्तिगत अधिकार व सार्वजनिक उपभोग.

२. सार्वजनिक अधिकार व व्यक्तिगत उपभोग.

३. सार्वजनिक अधिकार व सार्वजनिक उपभोग.

वरिल मार्गात सार्वजनिक अधिकार व सार्वजनिक उपभोग दोषपूर्ण असतो. कारण सर्वांचे म्हणजे कुणाचेही नाही हा हिशोब असल्याने संपत्तीचे संरक्षण होणार नाही. कोणीही श्रम करण्यास तयार होणार नाही. तसेच तर व्यक्तिगत

उपभोग अनैतिक असतो. म्हणून संपत्तीची व्यक्तिगत मालकी असावी पण व्यक्तीच्या भौतिक व नैतिक विकासासाठी संपत्तीच्या सामुदायिक उपभोगाला तो योग्य समजतो. व्यक्तीच्या भौतिक व नैतिक विकासाला महत्त्व देणारा ॲरिस्टॉटल सामुदायिक उपभोगाला योग्य मानतो. सार्वजनिक कल्याणसाठी संपत्ती विनिमयाला महत्त्व देतो. तो प्लेटोच्या पालक वर्गाच्या साम्यवादाला विरोध करीत असतांना तो सार्वजनिक उपभोगाला मान्यता देवून प्लेटोच्या साम्यवादाच्या जवळ जातो.

**प्र.३ रा ॲरिस्टॉटल गुलामगिरी विषयक विचार स्पष्ट करा?**

**किंवा**

**ॲरिस्टॉटलच्या गुलामगिरीविषयक सिद्धांताचे टिकात्मक परिक्षण करा?**

ॲरिस्टॉटल हा परंपरावादी विचारवंत असल्यामुळे तात्कालिक ग्रीक नगरराज्यात अस्तित्वात असणाऱ्या गुलामगिरी पद्धतीचे समर्थन करतो. त्यांच्या मते गुलामगिरी ही स्वाभाविक प्रथा आहे. कुटुंबातील कामासाठी ती अत्यंत आवश्यक व उपयुक्त आहे. मालक व गुलाम हे कुटुंबाचे दोन महत्त्वाचे मानतो. ॲरिस्टॉटल हा स्वतः अनेक गुलामाचा मालक होता. ग्रीक नगरराज्यात जमिनी कुलिनांच्या मालकीच्या असल्यामुळे त्या कसण्यासाठी गुलामाची गरज होती. उत्पादन करणाऱ्या या लोकांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी मालकावर टाकतो. गुलामांना तो मालकांची संपत्ती मानतो. त्याकाळी गुलाम जवळ बाळगणे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. सोफिस्ट लोकांनी मानवतेच्या भावनेतून प्रथेला तीव्र विरोध केला. मात्र तो कुटुंब व संपत्ती प्रमाणे दासप्रथा नैसर्गिक मानतो. त्याने संपत्तीचे निर्जीव संपत्ती व सजीव संपत्ती हे दोन प्रकार पाडले आहेत. तो निर्जीव संपत्ती घर, शेत व इतर वस्तूंचा समावेश करतो तर सजीव संपत्तीत पशूसोबत गुलामाचाही समावेश करतो. गुलामाच्या श्रमाशिवाय उत्पादन होणे शक्य नसल्याने तो व्यवहारवादी भूमिकेतून गुलामगिरीचे समर्थन करतो. तो गुलामाचे दोन प्रकार सांगतो.

१. **नैसगिक गुलाम-** जो मनुष्य नैसर्गिकरित्या स्वतःच्या तंत्राने न चालता दुसऱ्यांच्या तंत्राने चालतो तो नैसर्गिक गुलाम होय.
२. **अनैसर्गिक गुलाम-** ज्यांचा युद्धात पराभव झालेला असतो. त्याला विजेता गुलाम बनवितो त्याला वैधानिक वा अनैसर्गिक गुलाम असे म्हणतात. मात्र ग्रीक युद्धात पराजित झाले तरी त्याला गुलाम करू नये कारण ग्रीक हे निसर्गतः राज्य करण्यासाठी जन्माला आलेले आहेत असे तो मानतो.

**गुलामगिरीचे समर्थन-** गुलाम हा मालकाचा नोकर असल्यामुळे मालक त्याचा मर्जीप्रमाणे वापर करू शकतो. गुलामाला बुद्धी नसल्यामुळे उत्पादन कार्यात मालक त्याचा हवा तसा वापर करू शकतो.

**१. स्वाभाविक प्रथा-** निसर्गात सर्व माणसे जन्मतः समान नसतात. काही माणसे जन्मतः बुद्धिवान असतात तर काही जन्मतः बुद्धिहीन असतात. निसर्ग नियमानुसार उत्कृष्टांचे निकृष्टांवर अधिकार गाजवितात. म्हणजेच गुलामगिरीचे मूळ नैसर्गिक असमानतेत आहे. काही लोक जन्मतः शासक म्हणून जन्माला आलेले असतात तर काही शासित म्हणून जन्मास येतात. त्याने शासकाला मालक तर शासितांना गुलाम म्हटले आहे. मालकाची बुद्धी व गुलामाचे श्रम कुटुंबासाठी आवश्यक मानतो.

**२. उत्कृष्टांचे निकृष्टावर शासन-** अरिस्टॉटल शासक आणि शासित यांचा परस्परांशी संबंध शरीर आणि आत्मा यांच्या संबंधासारखा असतो. ज्याप्रमाणे शरीर आत्म्याच्या आदेशाप्रमाणे कार्य करते. त्याप्रमाणे बौद्धिक प्रगल्भता असणाऱ्या मालकाच्या आदेशानुसार कमकुवत बुद्धीच्या परंतु शारीरिक क्षमता असलेल्या गुलामांनी काम करावे. याचा अर्थ शासन ही एक कला असून ती केवळ मालकाच जमते असे त्याचे म्हणणे होते.

**३. गुलामांना हितकारक प्रथा-** गुलामांना स्वतंत्र बुद्धी नसल्यामुळे मालकाच्या मार्गदर्शनाखाली राहण्यातच त्यांचे कल्याण आहे. आई वडिलाच्या मार्गदर्शनाने मुलांचा विकास होतो. तसाच मालकांच्या छत्राने गुलामाचा विकास होतो. बुद्धिहीन गुलाम स्वतःचा विकास स्वतः साध्य करू शकत नाही. मालकाने गुलामाच्या विकासाला साह्य करावे.

४. **मालकांना लाभदायक प्रथा-** ॲरिस्टॉटलने नगरराज्याच्या राज्यकारभारात केवळ नागरिकांना सहभाग दिला आहे. सर्वच लोक नागरिक नसतात. नागरिकाकडे संपत्ती, मोकळ वेळ व बुद्धिमत्ता हे गुण लागतात. मालकाकडे गुलाम असल्याने राज्यकारभारासाठी संपूर्ण वेळ देता येत नाही. त्या वेळेचा सदुपयोग करून राजकारण वा कायदा निर्मिती करू शकतात .त्यामुळे केवळ मालकांचा फायदा नसून संपूर्ण समाजाला फायदा होतो.

५. **उपयुक्ततेचा आधार-** ग्रीक नगरराज्यात पूर्वीपासून दासप्रथा अस्तित्वात होती सामाजिक स्थैर्य, आर्थिक विकास व कौटुंबिक विकासासाठी उपयुक्त होती. ॲरिस्टॉटलने उपयुक्ततेचा तार्किक आधार देवून गुलामगिरीचे समर्थन करतो. सोफिस्ट मानवतेच्या भावनेतून गुलामगिरीला विरोध करतात. पण त्यातून सामाजिक समतोल बिघडेल. उत्पादन कार्यात अडचणी निर्माण होतील ही ॲरिस्टॉटला भिती वाटत असल्याने त्याने गुलामगिरीचे समर्थन केलेले आहे.

**गुलामगिरीत सुधारणा-** ॲरिस्टॉटल गुलामगिरीचे समर्थन करत असला तरी तो उपयोगितेच्या दृष्टिकोनातून या प्रथेचे समर्थन करतो. त्याकाळी अस्तित्वात असलेल्या प्रथेत पुढील सुधारणा सांगतो.

१. **मित्रवत व्यवहार-** मालकाने गुलामाशी मित्रासारखे वागावे. त्यांच्या वागण्यात निर्दयता वा अमानुषता असू नये. गुलामाशी पशूतुल्य व्यवहार करू नये. दासप्रथेचा उद्देश दोघांचे कल्याणे असल्याने त्याचा मालकाने गैरवापर करू नये ही सूचना करतो.

२. **वंशपरंपरागत नसावी-** गुलामगिरी वंशपरंपरागत नसावी. गुलामाच्या बुद्धिवान मुलांना मुक्त करावे.

३. **गुलामाची मुक्तता-** चांगले वर्तन करणाऱ्या गुलामांना गुलामगिरीतून मुक्त करावे. मालकांच्या सहवासात बौद्धिक कुवत वाढलेले आणि स्वतंत्र राहण्याची क्षमता असलेल्याना मुक्त करावे. त्याने आपल्याजवळील अनेक गुलामांना मुक्त केले होते.

४. **युद्धपराजितासाठी-** युद्धात पराजित झालेल्या सर्वांना गुलाम बनविणे योग्य नाही. त्यांना काही काळानंतर गुलामगिरीतून मुक्त करावे. ग्रीक युद्धात पराजित झाले तरी गुलाम बनवू नये कारण ग्रीक हे जगात श्रेष्ठ आहेत. ग्रीकांखेरीज इतर लोक रानटी असल्यामुळे ते गुलाम होण्याच्या लायकीचे आहेत.

**गुलामगिरीचे दोष वा परिक्षण, टीका-**

१) **अशास्त्रीय व अनैतिक प्रथा-** ॲरिस्टॉटलच्या काही व्यक्ती जन्मतः बुद्धिहिन असतात असे सांगतो. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात बुद्धिहिन व बुद्धिवान कसे ओळखावे हा प्रश्न निर्माण होतो. तसेच कोणतीही व्यक्ती बुद्धिहीन नसते. काहीच्या बुद्धीचा विकास योग्य परिस्थिती अभावी झालेला नसतो. शिक्षणातून व्यक्तीचा बौद्धिक विकास घडविणे शक्य असते याकडे दुर्लक्ष करतो.

२) **समाजाचे कृत्रिम विभाजन-** काही लोक शासक म्हणून जन्माला येतात आणि काही शासित म्हणून जन्माला येतात. शासक हे मालक तर शासित गुलाम असे तो मानतो. परंतु समाजात प्रत्येक व्यक्ती कमी अधिक बुद्धीचे असतात. सर्वच राज्यकर्ते बुद्धिवानअसतात असे नाही. राज्यकारभार कला आहे त्याचे गुण वेगळे असतात. बुद्धीच्या आधारावर समाजाचे मालक गुलाम विभाजन अयोग्य वाटते.

३) **वंशाचा फाजील अभिमान-** ग्रीक लोक हे संस्कृत आहेत तर ग्रीकेत्तर रानटी आहेत. त्यामुळे ग्रीकांनी युद्धात पराजित केलेल्याना कायदेशीर गुलाम बनवावे. परंतु ग्रीक जर पराभूत झाले तर त्यांना गुलाम करू नये कारण ते जन्मतः जगावर राज्य करण्याच्या लायकीचे आहेत असे सांगुन वंशाचा फाजिल अभिमान दाखवितो.

४) **वैचारिक विसंगती-** ॲरिस्टॉटल दासप्रथा आवश्यक व नैसर्गिक मानतो. तसेच जे स्वतंत्र जीवन जगण्यास लायक असतील त्यांना दासप्रथेतून मुक्त करावे असेही सांगतो ही त्यांच्या विचारात विरोधाभास दिसतो. मालक व गुलाम यांचे संबंध प्रेमाचे व मित्रत्वाचे ठेवण्याचा सल्ला देतो. गुलाम जर मालकांची संपत्ती मानली तर त्यात क्रौर्य असते. याप्रकारचे त्यांच्या विचारात वैचारिक विसंगती दिसते.

५) **आज निरूपयोगी प्रथा-** ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थन करून समता व स्वातंत्र्य यांना काहीच स्थान दिलेले नाही. आज त्यांचा सर्वत्र लावण्याचा प्रयत्न केला तर समाजातील बहुसंख्य लोक गुलाम बनतील.

**६) बार्करचे मत-** बार्करच्या मते माणूस हा सर्व दृष्टीने प्रथम माणूस असतो. त्यामुळे ॲरिस्टॉटलचा हा सिद्धात माणूसकी व स्वातंत्र्यविरोध आहे. दासाची तुलना पाळीव प्राणी बरोबर करतो. त्यांना कुटुंबाची संपत्ती मानतो असे योग्य नाही.

ॲरिस्टॉटल तर्कविसंगत गोष्टीना तर्कशास्त्राचा आधार देऊन समर्थन करतो. सामाजिक आवश्यकतेतून विरोध करण्याचे धैर्य त्यांच्याकडे नसल्यामुळे दासप्रथेचे समर्थन करतो. ग्रीक आर्थिक व्यवस्थेचा विचार करून मानवताविरोधी प्रथेचे समर्थन केल्यामुळे मॅक्सीसारख्या विचारवंत पॉलिटिक्सवर बंदी आणावी ही कडवी प्रतिक्रिया व्यक्त करतो. कारण हा सिद्धात पूर्णता मानवतावादी आहे त्याचे समर्थन ॲरिस्टॉटलसारख्या महान विचारवंताने करणे हे योग्य वाटत नाही.

**टिप- ॲरिस्टॉटलचे नागरीकत्वासंबंधी विचार-** ॲरिस्टॉटलने राज्य म्हणजे नागरिकांचा समुदाय मानतो. तो राज्यातील सर्वांना नागरिकत्वासाठी पात्र समजत नाही. त्याने सर्व प्रथम नागरिक कोण नाहीत ते सांगितले. नागरिकासाठी राज्यातील वास्तव्य, कायदा व जन्म एवढी मर्यादा पुरेशी नाही त्यांचा कार्याला त्याने महत्त्व दिले आहे. त्याने नागरिकत्वाच्या व्याख्या करण्याअगोदर त्याने प्रचलित मताचे खंडन केलेले आहे.

**१) वास्तव-** एखादया राज्यात दीर्घकाळ वास्तव केल्यामुळे नागरिक होत नाही. कारण अशा ठिकाणी परकीय व गुलामही राहतात. त्यांना नागरिक समजले जात नाही.

**२) कायदयाने संरक्षित-** राज्याचे संरक्षण किंवा न्यायालयाद्वारे न्याय मिळविण्याचा अधिकार दिलेल्या व्यक्तीला नागरिक म्हणता येत नाही. कारण परकीय व्यक्तीला तहाच्या आधाराने हा अधिकार मिळू शकतो.

**३) वंशतत्व-** नागरिकत्व वंशतत्वाने प्राप्त होणारी गोष्ट नाही. नागरीकत्वासाठी उपजत गुणाची आवश्यकता असते. जन्मापेक्षा कर्म महत्त्वाचे असते.

**४)** ज्यांना राज्यकारभार भाग घेण्याचा अधिकार नाकारला असेल हद्दपार, परकीय, गुलाम, कामगार, स्त्रिया,मुले व वयोवृद्ध यांना नागरिकत्व देत नाही.

**नागरीकत्वाची व्याख्या-** ॲरिस्टॉटल राज्य, नागरी अधिकार व कर्तव्ये या संबंधित व्यवस्थेच्या आधारावर नागरिकत्वाची व्याख्या करतो. राज्य म्हणजे नागरिकांचा समूह आणि नागरिक म्हणजे राज्यांच्या सर्वश्रेष्ठ सत्तेमध्ये प्रत्यक्ष सहभाग मिळविणाऱ्या व्यक्ती होत. राज्यकारभारात जो भाग घेता त्याला तो नागरिक मानतो. परंतु सर्वांना राज्यकारभारात भाग घेता येत नाही त्यासाठी पात्रता असावी लागते. ही पात्रता नैसर्गिक असते. जो इतरांना आज्ञा देऊ शकतो वा स्वतः इतरांच्या आज्ञेचे योग्यरीतीने पालन करू शकतो तोच नागरिकत्वास पात्र ठरतो. राज्याला दोन महत्त्वाची कार्ये पार पाडावी लागतात एक म्हणजे न्यायिक प्रशासनाचे आणि दुसरे विधिसभेचा सदस्य म्हणून कायदेनिर्मितीच्या कार्यात भाग घेण्याचा अधिकार नागरिकांना असतो. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याच्या न्याय प्रशासनात आणि विधिसभेचा सदस्य या नात्याने कायदेनिर्मितीत जो भाग घेतो त्यास नागरिक म्हणतो. या दोन्हीपैकी एका कार्यात भाग घेणाऱ्या व्यक्तीसही नागरिक म्हणता येईल. अथेन्समध्ये एक वर्षाच्या छोटया कालावधीसाठी न्यायाधीश यांची क्रमवार निवड होत असे.त यामुळे प्रत्येकाला या पदावर कार्य करण्याची संधी मिळत असे. नागरिकत्वासाठी राज्यकारभार भाग घेण्याची क्षमता अंगी बाळगणे व प्रत्यक्ष कार्य करणे आवश्यक असल्याने कौटुंबिक काळजी व कार्य यापासून मुक्त असले पाहिजे. शारीरिक श्रम करणाऱ्या वेळ मिळत नसल्याने त्यांना नागरीकत्व देत नाही. नागरीकत्वासाठी कुटुंब, मोकळा वेळ व संपत्ती या तीन गोष्टी तो आवश्यक मानतो. ॲरिस्टॉटलने मोकळा वेळ या अर्थाने न करता कार्याचे वेगळे रूप मानतो. कार्याचे दोन प्रकारचे असतात.

**१) साधन म्हणुन करावयाची कार्ये-** जी कार्य विशिष्ट उद्देश प्राप्त करण्याचे साधन म्हणून केली जातात. त्याला साधनरूपी कार्य म्हटले पाहिजे. या कार्यात शेती, व्यापार, श्रम करून संपत्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो.

**२) उद्देश किंवा साध्य म्हणून करावयाची कार्ये-** काही कार्ये स्वतः साध्य असतात. कार्ये हाच उद्देश असतो. उदा. बौद्धिक कार्य, ज्ञानप्राप्ती, साहित्य व समाजसेवा इ. कार्यास उद्देशरूपी कार्य मानतो. जी कार्य माणूस आपल्या आर्थिक किंवा भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी करतो त्यांना सोडून इतर सर्व कार्य मोकळा वेळ मध्ये येतात. त्यात शासन चालविणे, सार्वजनिक सेवाचा समावेश होतो. या कार्याला पूर्ण करण्यासाठी व्यक्ती उत्पादन कार्यापासून

मुक्त असली पाहिजे. म्हणजे संपत्ती, मोकळा वेळ, कुटुंब नागरिकत्वासाठी आवश्यक मानून नागरिकांची संख्या मर्यादित होते. राज्यातील सर्वांना नागरिकत्व देत नाही. ॲरिस्टॉटलने आदर्श नागरिकांच्या योग्यतेत त्याला राज्यकारभार करता आला पाहिजे व शासित म्हणूनही कार्य करता आले पाहिजे या तत्त्वावर विशेष भर दिला. राज्यकर्ता व प्रजाजनाचे गुण एकत्ररीत्या नागरिकात असावेत. नागरिकत्व हे गुणवत्तेवर व शासनाच्या प्रकारावर अवलंबून असते. ज्याला शासनकार्यात सहभागी होण्याचा अधिकार असतो. त्याला तो नागरिक म्हणतो. त्यांचे हे विचार नगरराज्य व्यवस्थेला अनुकूल आहेत.

**नागरीकत्वाच्या विचारावरील आक्षेप-**

१. **आदर्श राज्य विरोधी-** ॲरिस्टॉटल राज्याचा उद्देश सर्वश्रेष्ठ जीवनाची प्राप्ती मानतो असे जीवन प्राप्त करण्याचा अधिकार सर्वांना असला पाहिजे पण श्रमिक, गुलाम, स्त्रिया इ.ना राजकारणापासून वंचित ठेवून नागरिकत्व नाकारले हे योग्य नाही.

२. **आधुनिक काळात निरूपयोगी-** ॲरिस्टॉटलने नगरराज्याचा विचार करून नागरिकत्वाची कल्पना मांडली. आज जगात सर्वत्र प्रातिनिधीक लोकशाही असल्याने प्रत्येक जण राजकारणात भाग घेऊ शकत नाहीत. नागरिकत्वासाठी संपत्ती व मोकळा वेळ यावर भर दितो. या तो सुकंचित दृष्टीने नागरिकत्वाचा विचार करतो. आज नागरिकत्व देतांना व्यापक दृष्टिकोनाचा अवलंब केला जातो. त्यांच्यामुळे ॲरिस्टॉटलची नागरिकत्वाची कल्पना आधुनिक काळात निरूपयोगी आहे.

३. **न्याय व कायदा सहभाग अनावश्यक-** प्रत्येक व्यक्ती न्यायदान वा कायदा निर्मिती यात सहभागी असणाऱ्यांना नागरीकत्वाचा अधिकार देतो. पण प्रत्येक व्यक्ती असे कार्य करण्यास पात्र असतीलच असे नाही. ॲरिस्टॉटलच्या न्याय व कायदा निर्मिती सहभागामुळे अनेक लोक नागरिकत्वाच्या अधिकारापासून वंचित करतो हे योग्य नाही.

४. **समाजाचे दोन भागात विभाजन-** ॲरिस्टॉटल राज्यकारभारात सहभाग ही अट टाकून समाजातील बहुसंख्य लोकांवर अन्याय करतो. समाजातील छोटया गटाला नागरिकत्वाचा अधिकार देऊन बहुसंख्य लोकांकडे दुर्लक्ष करतो. प्रत्येकाला व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची संधी द्यावयास हवी होती पण तो निवडक लोकांना संधी देवून समाजात नागरीकत्व नसलेले आणि नागरीकत्व असलेले हे दोन भागात समाजाचे विभाजन करतो.

५. **नागरीकत्वाची अनुदार कल्पना-** ॲरिस्टॉटलच्या नागरीकत्व कल्पनेमुळे ज्या वर्गाला नागरिकत्व मिळेल त्यांची मिरासदारी निर्माण होते. श्रीमंताच्या हातात शासनव्यवस्था गेल्यास सामान्यांचे हित डावलेले जाईल. त्यामुळे समाजात शासक व शासित असे कायम स्वरूपी वर्ग निर्मितीचा धोका संभवतो.

६. **अधिकार दुर्लक्षित व कर्तव्यावर भर-** आदर्श नागरिकाचे गुण काय असावेत यावर भर दिला व अनेकांना राजकीय अधिकारापासून वंचित ठेवले. आधुनिक मोठया राज्यात नागरी व राजकीय अधिकार सर्वांना दिले जातात. याकडे त्याने दुर्लक्ष केलेले दिसते.

**प्र.४ था. ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याची संकल्पना स्पष्ट करा?**

प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. परंतु प्लेटोला लक्षात आले की आदर्श राज्य निर्माण करणे शक्य नाही म्हणून त्याने स्टेटस्‌मन व द लॉज ग्रंथात कायदयाच्या सार्वभौमच्या जवळपास जाणाऱ्या उपआदर्श राज्याची मांडणी केली होती. प्लेटोचे दुसरे आदर्श राज्य हेच ॲरिस्टॉटलचे प्रथम क्रमांकाचे आदर्श राज्य होय. कारण त्याने प्लेटोच्या विचाराचा विचार करून आदर्श राज्याची संकल्पना मांडली आहे. ॲरिस्टॉटलने 'पॉलिटिक्स' या ग्रंथात आदर्श राज्याची संकल्पना मांडली आहे. त्यांच्या आदर्श राज्यात सत्ता मध्यम वर्गाच्या हातात असते. त्यांच्या आदर्श राज्यावर प्लेटोच्या उपआदर्श राज्याचा प्रभाव दिसतो. सेबाइनच्या मते, ज्याला ॲरिस्टॉटल आदर्श राज्य म्हणतो तेच प्लेटोच उपआदर्श राज्य होय. ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याला प्लेटोच्या उपआदर्श राज्याची सुधारून वाढविलेली सुधारित आवृत्ती म्हटले जाते. तो ग्रीक लोकासाठी नगरराज्य हेच सर्वोत्कृष्ट राज्य मानत असे. त्यांच्या दृष्टीने लोकतंत्र सर्वोत्कृष्ट राज्य आहे. त्याने १५८ राज्यघटनाचा तुलनात्मक अभ्यास करून आदर्श राज्याची संकल्पना आहे. ॲरिस्टॉटल मध्यममार्गी असल्याने वास्तवता लक्षात घेऊन त्याने व्यवहार्य राज्याची कल्पना मांडली आहे. आदर्श

राज्यामध्ये व्यक्ती फक्त सुखी व समाधानी जीवन जगू शकत नाही तर श्रेष्ठ जीवनाची प्राप्ती करू शकतो. त्यांचे आदर्श राज्य खालील घटकांवर अवलंबून आहे.

१) **लोकसंख्या-** प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यात लोकसंख्या किती असावी हे सांगितले नाही पण आदर्श राज्याची लोकसंख्या ही मर्यादित असावी. लोकसंख्या राज्य स्वयंपूर्ण होऊ शकेल एवढी असावी. नागरिक प्रशासन कार्यासाठी एकमेकांना ओळखू शकतील एवढी असावी. त्यांने दहा ही लोकसंख्या फारच कमी असून एक लाख जास्त असल्याने दहा हजारापर्यंत असावयास हरकत नाही असे मत मांडतो. तो लोकसंख्या नियंत्रित करण्याचा अधिकार राज्याला देतो. विवाह विषयक कायदे करून संख्या फार कमी किंवा जास्त होणार नाही याची राज्याने काळजी घ्यावी असे सुचवितो. त्यासाठी विकृत व अपंगाना विवाहाचा व जगण्याचा अधिकार देत नाही. राज्याचे संरक्षण व स्वयंपूर्ण राज्य निर्माण करण्यास आवश्यक लोकसंख्या असावी ॲरिस्टॉटलला वाटते.

२) **भूप्रदेश-** लोकसंख्याप्रमाणेच भूप्रदेश विषयी सुवर्णमध्य गाठणारा विचार ॲरिस्टॉटल मांडतो. राज्याचे क्षेत्रफळ फार मोठे किंवा फार लहान नसावे. जास्त भूप्रदेशामुळे राज्य व संरक्षण करणे अवघड होईल. कमी भूप्रदेशाने आर्थिक संपन्नता व स्वावलंबनात बाधा येईल. सुखी जीवनास आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध होईल इतकी भूप्रदेशाची व्याप्ती असावी. ॲरिस्टॉटल व्यापारासाठी समुद्र किनारा आवश्यक मानतो. व्यापारामुळे आर्थिक भरभराट होऊ शकते. तो संरक्षणासाठी राज्याच्या चारही बाजूने भक्कम कोट उभारावा. भूप्रदेशातील जमीन शेतीस उपयुक्त असावी.

३) **समाजव्यवस्था-** आदर्श राज्यातील आदर्श जीवनाकरिता ज्या कार्याची आवश्यकता असते त्यानुसार समाजाचे वर्गीकरण करतो. ॲरिस्टॉटल हा समाजाचे सहा वर्गात विभाजन करतो. पुरोहित, प्रशासक, सैनिक, व्यापारी, शेतकरी व कामगार या वर्गातील पहिल्या चार वर्गाना नागरिकत्व देतो तर शेवटच्या शेतकरी व कामगार यांना नागरिकत्व नाकारतो. या वर्गाना नागरिकत्व दिल्यास उत्पादन कार्यावर विपरीत परिणाम होईल. त्याने केलेले समाजाचे वर्गीकरण जन्मावर आधारित नसून कार्यावर आधारित आहेत. प्रत्येक व्यक्तीला गुणानुसार अधिकार देतो. नागरिकांनी वयानुसार कार्य करावीत. तारूणावस्थेत सैनिक, प्रौढावस्थेत प्रशासन व वृद्धावस्थेत पौराहित्याचे कार्य करावे. अशा रितीने एका व्यक्तीला तीन कार्य करण्याचा अधिकार देतो.

४) **राज्यघटना-** ॲरिस्टॉटल संमिश्र राज्यघटनेला श्रेष्ठ मानतो. राज्यघटने संबंधी विचार मांडताना राजेशाही हा सर्वश्रेष्ठ प्रकार आहे परंतु आदर्श राजा सापडणे शक्य नसल्याने राजेशाही लागू करू नये तर महाजन सत्तेत श्रीमंत व गरिब या दोन वर्गात दरी निर्माण होण्याचा धोका असतो. दोन्ही व्यवस्थेतील दोषांना टाळून मर्यादित लोकशाही शासनाचा आदर्श प्रकार तो सांगतो. या प्रकारात मध्यमवर्गीयाच्या हाती राज्याची सत्तासूत्रे असावी. योग्य व्यक्तीना गुणानुसार सत्ता दिली पाहिजे. ॲरिस्टॉटलने व्यावहारिकतेवर भर देऊन सवर्णमध्ये साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

५) **जनचारित्र्य-** ॲरिस्टॉटल हा आदर्श राज्यातील नागरीकांचे चारित्र्य कसे असावे याचाही विचार मांडतो. विशेषतः तो बुद्धिमत्ता आणि चैतन्य या गुणावर जास्त भर देतो. युरोपियन लोकांतील उत्साह व आशियायी लोकातील विवेक याचा संयोग आदर्श राज्यातील नागरिकात असला पाहिजे. त्यातूनच ते आपला राजकीय विकास पूर्ण करू शकतील असे तो सांगतो.

६) **शिक्षणव्यवस्था-** ॲरिस्टॉटलने प्लेटोप्रमाणे शिक्षणावर भर दिलेला आहे. शिक्षणाचा उद्देश मानवाचा सर्वांगीण विकास करण्याचा असतो. शिक्षणाने शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकास घडविता येतो. नैतिक व चारित्र्य संपन्न नागरिक तयार होतात. राज्यकारभार करण्याची पात्रता निर्माण होते. तो प्लेटोच्या शिक्षणव्यवस्थेशी मिळती जुळती अशी शिक्षणव्यवस्था सांगतो. ज्ञान व चारित्र्य हा दोहोंची शिक्षणात सांगड घालतो. शिक्षण राज्य नियंत्रणाखाली व सक्तीची असावी यावर भर देतो. सर्व नागरिकांना समान शिक्षण दिले जावे. शिक्षणाचे तीन टप्पे पाडतो. पहिला टप्पा वयाच्या सात वर्षापर्यंत आहे. दुसरा टप्पा चौदा वर्ष व तिसरा टप्पा एकवीस वर्षापर्यंतचा आहे. तो लहानपणापासून शिक्षणाची सुरूवात करतो. बालपणी मुलांच्या शारीरिक व नैतिक शिक्षणाची व्यवस्था करावी. शिक्षण व बलोपासना यावर भर द्यावा. मनोरंजनाची खेळाची व्यवस्था करावी. दुसऱ्या टप्पात नैतिक व शारीरिक

शिक्षणावर भर देता. तिसऱ्या टप्पात बौद्धिक शिक्षणाला महत्त्व देतो. शिक्षणात संगीत व गणित या विषयांना प्राधान्य देतो.

**७) सार्वभौमसत्ता-** ॲरिस्टॉटलने सार्वभौमत्वाबद्दल अस्पष्ट विचार मांडलेले आहेत. नैसर्गिक नियम हा सार्वभौमत्वाचा आधार असतो. ती निरंकुश असू नये. सत्तेचा स्वार्थासाठी वापर करू नये. सत्ता एका विशिष्ट व्यक्तीच्या हाती नसावी. ती धनिक वा निर्धनाच्या हाती नसावी तर सार्वभौमत्व मध्यमवर्गीयांकडे असल्यास त्याचा दुरूपयोग टाळता येतो.

**८) कायदा व न्याय-** ॲरिस्टॉटल हा वर्तणूकीच्या सामान्य नियमांना नैसर्गिक कायदा मानतो.हे नियम सद्सद् विवेकावर आधारलेले असतात.कायदा हा मानवनिर्मित असला तरी पवित्र असतो.कायदयाचे पालन शासक व शासित दोघांना आवश्यक ठरते.मानव कितीही बुद्धीवान असला तरी कायदापेक्षा श्रेष्ठ असु शकत नाही.तो व्यक्तीच्या शासनापेक्षा विधिनियमांचे शासन योग्य मानतो.न्यायाची कल्पना प्लेटोसारखी त्यांने मांडली आहे.समाजातील सहा वर्गातील प्रत्येकाने आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडण्यात न्याय वातावरण निर्माण होते.व सर्वांना न्याय मिळतो.

**९) कायदा व न्याय-** ॲरिस्टॉटल वर्तणुकीच्या सामान्य नियमांना नैसर्गिक कायदा म्हणतो. हे नियम सद्सद् विवेकावर आधारलेले असतात. म्हणून कायदा हा मानवनिर्मित असला तरी पवित्र असतो. कायदयाचे पालन शासक व शासित दोघांना आवश्यक असते. माणूस कितीही बुद्धिवान असला तरी कायदयापेक्षा श्रेष्ठत्व देऊ नये. व्यक्तीच्या शासनापेक्षा विधिनियमाचे शासन योग्य मानले आहे. न्यायाची कल्पना प्लेटोप्रमाणे मांडली आहे. समाजातील सहा वर्गातील प्रत्येकाने आपले कर्तव्य योग्य प्रकार पाड पाडण्यात न्याय वातावरण निर्माण होतो व सर्वांना न्याय मिळतो असे त्यांचे मत आहे.

**१०)मध्यममार्गी व इतर व्यवस्था-** ॲरिस्टॉटल आदर्श राज्याच्या विचारात वास्तवतावाद आहे. या राज्यात श्रीमंताचे प्रमाण कमी असावे तसेच गरिबांचे प्रमाण कमी असेल. राज्यात मध्यमवर्गीयाची संख्या जास्त असेल मध्यमवर्गीय राज्यकर्ते असल्यामुळे समन्वय साधला जाईल व सत्तेचा दुरूपयोग टळेल. तो कुठल्याही व्यवस्थेचा चिकटून न राहता परिस्थितीनुसार संमिश्र घटनेचा एक आदर्श नमुना ठरतो. राज्याने बाहय आक्रमणापासून संरक्षणासाठी किल्ले, सैनिक दल व तटबंदी निर्माण करावे. सार्वजनिक आरोग्य, पाणी, रस्ते व सार्वजनिक ठिकाणे याकडे लक्ष देणे, शासन कार्यासाठी साधारण सभा, प्रशासकीय अधिकारी व न्यायालय यातीन शाखाची आवश्यकता सांगतो.

**प्र.५ वा ॲरिस्टॉटलचे क्रांतीविषयक विचार स्पष्ट करा?**

ग्रीक नगरराज्यात सातत्याने जी परिवर्तन होत होती त्याचा ॲरिस्टॉटलने बारकाईने अभ्यास केला. या अभ्यासाच्या आधारावर क्रांतीची कारणे आणि उपाय सांगितले. त्याने क्रांती हा शब्द व्यापक अर्थाने वापरला आहे. आज शासनव्यवस्थेत होणाऱ्या बदलाला क्रांती असे म्हणतात. ॲरिस्टॉटल राज्यघटनेत होणारा कोणतीही बदल म्हणजे क्रांती या अर्थाने हा शब्द वापरला आहे. ग्रीक नगरराज्यातील परिवर्तनातून प्रस्थापित शासनव्यवस्थेतील दोषांचे विश्लेषण शास्त्रीय व ऐतिहासिक पद्धतीने करतांना क्रांतीचे तत्त्वज्ञान जन्माला आले. त्याने सुचविलेल्या उपाययोजनेत त्यांचे मोठेपण सामावलेले आहे.

**क्रांतीची व्याख्या-** एखादया राज्याच्या राज्यघटनेत होणारा बदल किंवा शासनात होणारा बदल म्हणजे क्रांती होय. ती क्रांती हिंसक वा अहिंसक स्वरूपाची असू शकते. क्रांती म्हणजे शस्त्र संघर्ष किंवा रक्तपाताच्या आधारावर होणारे परिवर्तन नसून त्यातून नवी न्याय व्यवस्थेची उपलब्ध होत असते.

**क्रांतीचे प्रकार-** ॲरिस्टॉटल क्रांतीचे तीन प्रकार पाडतो.

**अ) संपूर्ण क्रांती-** जेव्हा राज्यघटनेत संपूर्ण राज्यघटनेत बदल केला जातो. जुनी व्यवस्था नष्ट करून नवी व्यवस्था नव्या घटनेने निर्माण केलेली असते तेव्हा त्यास संपूर्ण क्रांती म्हणतात.

**ब) आंशिक क्रांती-** राज्यघटनेतील एखादया भागात बदल घडवून आणला जातो त्यास आंशिक क्रांती म्हणतात

**क) व्यक्तिसापेक्ष क्रांती-** राज्यघटनेत कोणताही बदल न होता शासनव्यवस्थेतील विशिष्ट गट वा व्यक्ती यांना पदच्युत करून बदल घडविला जातो त्याला व्यक्तिसापेक्ष क्रांती म्हणतात.

**अ) क्रांतीचे सामान्य कारणे-** ॲरिस्टॉटलने ग्रीक नगरराज्यातील १५८ राज्यघटना व शासन व्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास करून क्रांतीची कारणमीमांसा केलेली आहे. क्रांतीच्या कारणाचे सामान्य कारणे व विशिष्ट कारणे या दोन भागात विभाजन केलेले आहे. ॲरिस्टॉटलने क्रांतीची पुढिल सामान्य कारणे सांगितली आहेत.

१. **अन्याय परिमार्जन-** न्याय व मैत्री वर्तन हे राज्याचे नैतिक आधार मानले जातात. शासकाकडून समाजातील विविध गटाशी वर्तणूकीत फरक पडला की अंसतोष निर्माण होतो. एखादया गटाला न्याय मिळत नसेल तर तो गट डावलला जात असेल तर आपल्यावर अन्याय झाला अशी भावना या गटामध्ये तयार होते. शासनाबद्दल तिरस्कार निर्माण होऊन तो गट क्रांती करतो.

२. **सामाजिक समतोलाचा अभाव-** समाजाचे दोन परस्पर विरोधी वर्गात विभाजन झाला तर परस्परांत देषभावना निर्माण होतो. या दोन वर्गात समतोल साधण्याचे कार्य मध्यमवर्ग करत असतो. जेव्हा समाजात मध्यमवर्गाचा अभाव असतो तेव्हा क्रांती होते.

३. **असमानता-** सर्वसामान्य व्यक्तींना सर्व बाबतीत समता असावी. पण समाजामध्ये आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय बाबत विषमता असते. भूक, दारिद्रय व सामाजिक प्रतिष्ठा याबाबत असमानतेची जाणीव लोकामध्ये निर्माण होते. तेव्हा समता स्थापनेकरिता ते क्रांती घडवून आणतात.

४. **सत्तेचा दुरूपयोग-** ॲरिस्टॉटलने शासनव्यवस्थेचे तीन शुद्ध व तीन अशुद्ध विकृत प्रकाराचे वर्णन करून गतीचक्राचा सिद्धांत मांडला. त्यानुसार शासनकर्ते काही दिवस प्रामाणिक व लोककल्याणासाठी प्रयत्न करतात. परंतु काही दिवसांनी ते भ्रष्ट बनतात. या भ्रष्टाचाराला कंटाळून लोक क्रांती करतात.

५. **परस्परविरोधी विचारप्रणाली-** सत्तेचा मोह व अर्थप्राप्ती, परस्परविरोधी विचारप्रणालीमुळे समाजात दोन गट निर्माण होतात. या गटामध्ये एकमेकाबद्दल भिती व अविश्वासाची भावना निर्माण होते. सत्ताप्राप्तीची अभिलाषा या कारणामुळे देखील क्रांती घडून येते.

६. **असावधानता-** शासनकर्त्यांच्या निष्काळजीपणामुळे एखादया गटाला किंवा व्यक्तीला महत्त्वाचे पद दिले जाते. त्यांच्या राजद्रोहाकडे दुर्लक्ष केले जाते. मग या गटातील लोकांना संधी प्राप्त होते. संधीचा फायदा घेवून हे लोक क्रांती करतात.

७. **सत्ता प्राप्तीची अभिलाषा-** सत्तेपासून मिळणाऱ्या फायद्याचा मोह व प्रतिष्ठा, अर्थप्राप्ती इत्यादी कारणामुळे काही स्वार्थी व्यक्ती, गट अथवा पक्ष याच्यामध्ये सत्ताप्राप्तीची अभिलाषा निर्माण होते. या अभिलाषेतून सनदशीर मार्गाने सत्ता न मिळाल्यास हे लोक क्रांती करून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतात.

८. **प्रादेशिक असमतोल-** एखादया राज्यातील अनेक विभागापैकी एखादया भागाचा विकास होतो तर त्या तुलनेने इतर विभागाचा मागासलेले वा अप्रगत राहतात. विकसित व अविकसित भागातील लोक तुलना करून आपल्या भागाचा विकाससाठी राज्यकर्तेवर दबाब टाकतात. त्यांचा काहीच परिणाम होत नसेल तर लोक प्रादेशिक विकासाकरिता क्रांती करतात.

९. **कौटुंबिक वैमनस्य-** शासकांच्या घराण्यातील कौटुंबिक झगडे, वैमनस्य, द्वेष इ.कारणांमुळे क्रांती होत असते. महाजनशाही व राजेशाही या कारणामुळे अनेकदा क्रांती होत असते.

**ब) क्रांतीची विशिष्ट कारणे-** वर उल्लेख केलेल्या कारणाशिवाय विशिष्ट प्रकारच्या शासनप्रणालीत काही कारणामुळे क्रांती होत असल्यामुळे ॲरिस्टॉटल क्रांतीची विशेष कारणे मांडतो. ती पुढीलप्रमाणे होत.

१. **राजेशाही व हुकूमशाहीतील कारणे-** राजेशाहीत कौटुंबिक झगडे, सत्तास्पर्धा, द्वेष व तिरस्कार, प्रजेला अन्यायकारक व अपमानास्पद वागणूक, शेजारी राष्ट्राचा त्रास, भ्रष्टाचार व वशिलेबाजी व जनतेत असुरक्षितेची भावना इ.कारणामुळे क्रांती होती.

२. **महाजनशाही व अल्पजनशाहीतील क्रांती-** या शासनप्रद्धतीत समाजातील कुलीन व विशिष्ट गटाकडे प्रतिष्ठा व सत्तास्थाने असतात. ते स्वतःच्या हितासाठी सत्तेचा दुरूपयोग व भ्रष्टाचार वाढतो. दडपशाही व जनतेचे शोषण आणि आपसातील हेवेदावे व फुटिर वृत्ती इ.कारणामुळे क्रांती होते.

३. **लोकशाही व झुंडशाहीतील क्रांती-** शासनातील भ्रष्ट व अन्यायकारक व्यवस्था, सत्तेचा दुरूपयोग, अयोग्य व्यक्तीच्या हाती सत्तासूत्रे, श्रीमंतांना संपत्तीची शाश्वती न वाटणे, परस्परातील हेवेदावे व सत्ताकांक्षेतून स्पर्धा व महत्वाकांक्षी वक्ते व नेते इ.कारणामुळे क्रांती होते.

**क्रांती टाळण्याचे उपाय-** ॲरिस्टॉटलने क्रांती टाकून सामाजिक स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी काही प्रभावी उपाय सांगितले आहेत. क्रांतीच्या खुणा दिसू लागल्यावर योग्य उपाययोजना करण्यापेक्षा क्रांतीची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनाची तरतूद केलेली आहे. त्योन क्रांती टाळण्याच्या उपायाचे सामान्य उपाय आणि विशिष्ट उपाय या दोन भागात वर्गीकरण केलेले आहे.

**अ) सामान्य उपाय-** ॲरिस्टॉटलने क्रांती टाकण्याचे पुढील उपाय सांगितले.

१. **न्याय व संविधानबद्दल आस्था-** नागरिकांमध्ये न्याय व संविधानाबद्दल आस्था निर्माण करावी. जनतेला कायदा पालनाची सवय लागावी. कायदाभंग करणाऱ्यांना कायदेशीर शिक्षा करावी.त्यातून क्रांती टाळता येईल.

२. **शिक्षणप्रसार-** शिक्षणामुळे नागरिकांचा आपली जबाबदारी कळते. शासनाविषयी निष्ठा निर्माण होते. क्रांतीमुळे होणाऱ्या परिणामांची त्यांना जाणीव असते. म्हणून शिक्षणप्रसार महत्वाचा ठरतो.

३. **सत्तेचे विकेंद्रीकरण-** सत्ता केव्हाही एकाच वर्गाच्या हाती केंद्रीत होऊ नये. कारण अधिक सत्ता मानवाला भ्रष्ट बनविते. शासनकर्त्याकडून सत्तेचा दुरूपयोग होतो. म्हणून सत्तेचे विभाजन केले पाहिजे.

४. **आर्थिक समता-** समाजात गरिब व श्रीमंत असे टोकाचे वर्ग निर्माण झाल्यास क्रांतीची शक्यता जास्त असते. दोन वर्गात समन्वय राखण्याचा प्रयत्न राज्याने करावा. त्यासाठी संपत्तीचे योग्य वितरण करावे. समाजात मध्यमवर्ग जास्त संख्येने असल्यास क्रांती टाळता येईल.

५. **सत्वगुणी शासक-** शासनकर्त जर दुर्गुणी असेल तर त्याचा अध:पात अटळ आहे. शासकवर्ग भ्रष्टाचार व लाचलुचपत यापासून दूर असावे. शासकाने जनतेशी उचित व्यवहार करावा. अन्याय अत्याचार टाळून लोकहिताकडे लक्ष दिल्यास क्रांती टाळता येते.

६. **अधिकार पदातील विषमता-** राज्यातील अधिकारपदाच्या जागा व्यक्तींना योग्यतेनुसार दिला पाहिजेत. अयोग्य लोकाकडे महत्वाची पदे सोपविल्यास जनतेची कामे होत नाही व त्यातून अंसतोष वाढत जातो. अधिकारी वर्गावर सातत्याने नियंत्रण असले पाहिजे.

७. **पदव्याचे वितरण-** राज्यातील गुणवान व्यक्तीचा गुणगौरव करण्यासाठी सार्वजनिक पदव्या योग्यतेनुसार देण्यात याव्या. तसेच महत्वाच्या पदाचा कालावधी कमी व कमी महत्वाच्या पदासाठी जास्त कालावधी असला पाहिजे.

८. **परचक्राची भिती-** जनतेचे अंतर्गत राज्यकारभारावरून लक्ष विचलित करण्यासाठी सतत परकीय आक्रमणाची भिती जनतेत निर्माण करावी. वेळप्रसंगी आक्रमक धोरण स्वीकारून धोका असल्याचे भासवावे. त्यामुळे लोकांत देशप्रेमाची भावना वाटते व क्रांती टाळता येते.

**क्रांती टाळण्याचे विशिष्ट उपाय-**

**१. राजेशाही व हुकूमशाहीतील उपाय-** या शासनव्यवस्थेत क्रांती टाळण्यासाठी राजाने गुप्त हेराचा वापर करावा, परकीय आक्रमणाचा धोका दाखवावा, नागरिकांना सन्मानित करण्याचे कार्य स्वत: करावे पण शिक्षा दुसऱ्यामार्फत करावी. राज्याचे महत्वाची पदे जनप्रिय लोकांना द्यावीत. लोकांना सतत कामात गुंतवावे, हुकूमशहाची लोकांना भीती असावी, महत्वाकांक्षी व संशयित व्यक्तीचा नाश करावा. राजाने विलासी जीवन जगू नये इ.उपायाने क्रांती टाळता येते.

**२. महाजनशाही व धनिक तंत्रील उपाय-** या शासनपद्धती धनिकांना संपत्तीच्या असुरक्षिता भावना निर्माण होऊ नये, गरिब जनतेच अधिकार व प्रतिष्ठा यांचे रक्षण करावे, बुद्धिवानाना शासक कार्यात सहभाग दयावा, गरिब श्रीमंत याच्यात समन्वय साघण्याचा प्रयत्न करावा, इ.मार्गाने क्रांती टाळता येईल.

३. **लोकशाही व झुंडशाहीतील उपाय-** या शासनपद्धतीत समता व न्याय निर्माण करावा, प्रशासनातील भ्रष्टाचारावर प्रतिबंध घालावा, जनतेच्या संपत्तीचे रक्षण करावे, राज्यकर्त्यांनी जीवन व्यथित करावे, चैनीचे जीवन जगु नये, सर्वसामान्यांना पात्रतेनुसार सहभाग द्यावा इ.मार्गाने क्रांती टाळता येईल.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. ॲरिस्टॉटलने सांगितलेले गुलामगिरीचे प्रकार स्पष्ट करा.
   उत्तर- ॲरिस्टॉटलने नैसर्गिक गुलामगिरी व अनैसर्गिक वा मानवनिर्मित गुलाम हे दोन गुलामगिरीचे प्रकार सांगितलेले आहेत.

२. अरिस्टॉटलची नागरिकत्वाची संकल्पना लिहा.
   ॲरिस्टॉटलच्या मते, राज्याच्या न्याय प्रशासनात आणि विधिसभेचा सदस्य या नात्याने कायदेनिर्मितीत जो भाग घेतो त्यास नागरिक म्हणतो. या दोन्हीपैकी एका कार्यात भाग घेणाऱ्या व्यक्तीसही नागरिक म्हणता येईल. नागरिकत्वासाठी कुटुंब, मोकळा वेळ व संपत्ती या तीन गोष्टी तो आवश्यक मानतो.

३. ॲरिस्टॉटलने सांगितलेली क्रांतीची दोन कारणे कोणती?
   उत्तर- ॲरिस्टॉटलने क्रांतीची सामान्य कारणे आणि क्रांतीची विशेष कारणे हे दोन कारणे सांगितलेली आहेत.

४. ॲरिस्टॉटलने कुटुंबसंस्थेविषयी विचार स्पष्ट करा.
   उत्तर- ॲरिस्टॉटल कुटुंब ही एक नैसर्गिक संस्था मानतो. कुटुंब ही सामाजिक जीवनाची पहिली अवस्था आहे. ही राज्याची आधारशिला असून त्यावर संपूर्ण सामाजिक जीवनाची इमारत उभी आहे. ती नागरी जीवनाची पाठशाला असुन मानव जन्मतः या संस्थेचा सदस्य असतो. या संस्थेतून राज्यसंस्थेचा उदय झाला.कुटुंब समाजाचा लहान घटक असून स्वसंरक्षण, शिस्त, शारीरिक गरजाचीपूर्ती व नैतिक विकास कुटुंबातच होऊ शकतो.

५. ॲरिस्टॉटलने स्पष्ट केलेले क्रांतीचे कोणतेही दोन प्रकार लिहा.
   उत्तर- ॲरिस्टॉटलने संपूर्ण क्रांती, आंशिक क्रांती आणि व्यक्तीसापेक्ष क्रांती हे प्रमुख प्रकार होत.

६. ॲरिस्टॉटलने लिहीलेल्या दोन ग्रंथाची नांवे सांगा.
   उत्तर- ॲरिस्टॉटलने the Politics आणि The Constitution हे राज्यशास्त्राच्या दृष्टीने उपयुक्त ग्रंथ लिहीले.

७. ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राचे जनक का म्हटले जाते ते स्पष्ट करा?
   उत्तर- ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला स्वतंत्र अस्तित्व दिले तसेच शास्त्रीय व वास्तवतावादी दृष्टीने राज्यशास्त्रात लिखाण केल्यामुळे त्याला राज्यशास्त्रला जनक मानले जाते.

८. ॲरिस्टॉटलने केलेले संपत्तीचे दोन प्रकार कोणते?
   उत्तर- सजीव संपत्ती आणि निर्जीव संपत्ती हे संपत्तीचे दोन प्रकार सांगितले आहेत.

९. ॲरिस्टॉटलने कोणत्या दोन प्रकारच्या गुलामाचा उल्लेख केलेला आहे.
   उत्तर- नैसर्गिक गुलाम आणि अनैसर्गिक गुलाम या दोन प्रकारच्या गुलामाचा उल्लेख त्याने केलेला आहे.

१०. ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासाठी कोणत्या तीन गोष्टी आवश्यक मानलेल्या आहेत.
   उत्तर- मोकळा वेळ, संपत्ती, कुटुंब या तीन गोष्टी ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासाठी आवश्यक मानलेल्या आहेत.

## प्रकरण ३ रे
## निकोलो मॅकिव्हली
(इ.स.१४६९ ते १५२७)

**जीवनपरिचय-** मॅकिव्हलीचा जन्म इटलीतील प्लॉरेन्स नगरात १४६९ मध्ये झाला. त्यांचे वडील साधारण वकिल होते. त्यांचे बालपण व शिक्षण प्लॉरेन्समध्ये झाले. त्यांच्या बालपणी प्लॉरेन्सवर मेडिसी राजघराण्याची सत्ता होती पुढे ती सत्ता जाऊन गणतंत्र निर्माण झाले. या काळात कठिण परिश्रमाने मॅकिव्हलीला सरकारी नोकरी मिळाली. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर सचिव पद मिळविले. त्यांची राजदूत म्हणून नेमणूक झाली. त्यांनी पॅरिस, रोम, बर्लिन इत्यादी २३ वेळा परराष्ट्रातील वकिलातीत काम करावे लागले. तो कौन्सिल ऑफ टेन नावांच्या मंत्रिपरिषदेचा सचिव बनला. या प्रत्यक्ष राजकीय अनुभवातून मॅकिव्हलीची ग्रंथसंपदा निर्माण झालेली दिसते. १५१२ मध्ये गणतंत्राचा शेवट होऊन मेडिसी वंशाचे राजतंत्र आले. मॅकिव्हलीवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला आणि त्यांची कारागृहात रवानगी झाली. एका वर्षाने राजकारणातील सहभागावर बंधने टाकून सुटका करण्यात आली. कारावासातून सुटका झाल्यानंतर त्याने आपल्या गावी राहून लेखन कार्य करणे पसंत केले. त्याने The Prince, The Discourses, The Art of War, The History of Floerence इ.ग्रंथ लिहीले. दि प्रिन्स हा ग्रंथ मेडिसी राजाला अर्पण केल्यामुळे राजवंशीय आणि गणराज्यशासक या दोघांनी त्याच्याकडे संशयाने पाहिले. इ.स. १५२७ मध्ये एखादया सामान्य माणसासारखा उपेक्षित मृत्यू झाला. त्यांच्या ग्रंथात इटलीच्या सामाजिक परिस्थितीचा प्रभाव दिसून येतो. इटलीला सामर्थ्य संपन्न बनविणे हा त्यांच्या ग्रंथ लेखनाचा प्रमुख हेतू होता. मॅकिव्हली प्रथम पारंपरिक निगमन पद्धतीचा त्याग केला करून ऐतिहासिक निरीक्षण पद्धतीचा अवलंब करून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला. मानवी हा स्वभाव हा त्यांच्या विषयाचा मूळ पाया मानतो. सर्वकाळी आणि सर्वत्र मानवी स्वभाव सारखा असतो यावर त्यांचा विश्वास होता. तसेच इटलीच्या राजकारणाची इतर देशाशी तुलना करतो. त्या त्यांच्या काळातील चांगला निरीक्षक व विश्लेषण करून यथार्थवादी निष्कर्ष काढणारा श्रेष्ठ विचारवंत त्यांने अवलंबिलेल्या नावीन्यपूर्ण अध्ययन पद्धतीमुळे मानले जाते.

**प्र १ ला . मॅकिव्हलला आधुनिक युगाचा शिशु समजले जाते या विधानाचे स्पष्टीकरण करा?**

कोणत्याही विचारवंतावर तात्कालिक परिस्थितीचा प्रभाप पडतचे असतो. परंतु मॅकिव्हलीवर त्या काळाचा एवढा जबरदस्त प्रभाव पडला की, त्याने आपले संपूर्ण तत्त्वज्ञान इटालीची दुर्दशा सोडविण्याच्या दृष्टीने चिंतन केले. इटालियन समाजाचे बारकाईने निरीक्षण करून समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविले. त्यामुळे त्याला आधुनिक युगाचा शिशु म्हटले जाते. त्यांच्या विचारांत काल्पनिकतेला थारा नसून यथार्थवादी भूमिका माडतो. मॅकिव्हलीवर खालील घटकांचा प्रभाव पडलेला दिसतो.

१. **शक्तिसंपन्न राजसत्तेचा उदय-** युरोपमध्ये राष्ट्रराज्याची सुरूवात झालेली होती. इंग्लंड, फ्रॉन्स व स्पेन या तीन सत्ता अधिक महत्वाच्या होत्या. या राष्ट्राचे वैशिष्टये म्हणजे धर्म प्राबल्यापासून ती मुक्त होती. पारलौकिक बाबींपेक्षा भौतिक बाबींकडे लक्ष केंद्रीत केले. सामंत व पोप याचे वर्चस्व कमी करून शक्तिसंपन्न राजेशाही अस्तित्वात आणले. नेमका या काळात इटलीचे छोटया राज्यात विभाजन, धर्मसत्तेचा प्रभाव, नैतिकतेचा अभाव याचे निरीक्षण करून प्रिन्स सारखा ग्रंथ निर्माण केला. तो इटलीचे एकीकरण करू इच्छीत होता. त्यामुळे त्याला निरंकुश राष्ट्रराज्याची स्थापन व्हावी असे वाटत होते.

२. **राष्ट्रीयत्वाची भावना-** युरोपात इंग्लंड, फ्रॉन्स व स्पेन ही राज्ये राष्ट्रीयत्वाच्या आधारावर सुसंघटित आणि शक्तिसंपन्न होती. या राज्याच्या तुलनेत इटली पाच घटकांत विभाजित झालेला होता. या पाच राज्यांत आपसातील संघर्ष नेहमी होत असे. या संघर्षामुळे दुबळेपणा आलेला होता. पश्चिम युरोप आणि इटलीच्या व्यवस्थेत मोठे अंतर होते. या स्थितीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. पाच राज्यात एकता निर्माण व्हावी. खंडित व दुबळा बनलेला देश एकसंघ व बलवान बनावा ही त्यांची आंतरिक तळमळ होती. इटली युरोपीय देशाची युद्धभूमी बनला होता.

इटलीतील छोटी राज्ये केवळ कूटनीतीचा वापर करून आपले अस्तित्व टिकवून ठेवत होते. तो या सर्वापासून इटली मुक्त करण्याचे स्वप्न पाहत होतो. त्यांच्या या नीतीचा प्रभाव त्यांच्या प्रिन्स वर पडलेला दिसतो.

३. **सामाजिक परिस्थिती-** इटालियन समाज हा धार्मिक व नैतिक दृष्टीने अत्यंत अधोगतीकडे वाटचाल करीत होता. भ्रष्टाचार, स्वार्थ, अश्विास व अप्रामाणिकपणा या दृष्ट प्रवृत्ती उफाळून आलेला होत्या. सत्य, सदाचार, परोपकार या गोष्टीना स्थान नव्हते. स्वार्थ लोलूपता एवढया पराकोटीला गेली होती की देशद्रोह करावयास व्यक्ती सहज तयार होत होती. पोप धर्माच्या नावावर लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेऊन लुबाडित असत. या सर्व परिस्थितीचा प्रभाव मॅकिव्हलीने वर्णन केलेल्या मानवी स्वभावातून दिसून येते. माणूस हा स्वभावातः स्वार्थी, दृष्ट, चंचल, कृतघ्न असल्याचे चित्र रेखाटतो.

४. **लोकशाहीची पिछेहाट-** १६ शतकाच्या प्रारंभापासून कंसिलियर चळवळीने सुरू केलेली लोकशाही स्थापन करण्याची चळवळ बलवान राजेशाहीच्या प्रभावामुळे दाबली गेली. चर्चच्या विविध मंडळात पोपने वर्चस्व निर्माण केले. राजकीय क्षेत्रातही राजांनी संरजामदारांचा पराभव करून आपली निर्विवाद सत्ता प्रस्थापित केली. १६ वे शतकाची सुरूवात म्हणजे बलसंपन्न व्यक्तीचा, समर्थ व्यक्तीचा काळ मानला जातो. त्याचा प्रभाव मॅकिव्हलीवर दिसून येतो.

५. **पुनर्जागरण-** इटलीत मॅकिव्हलीची जन्मभूमी प्लॉरेन्स येथूनच पुनर्जागरण प्रक्रियेला सुरूवात झाली होती. केवळ आध्यात्मिक कल्पनेस बिलगून न बसता भौतिक दृष्टीने मानवी विकासाचा विचार करण्याची महत्वपूर्ण चळवळ सुरू झालेली होती. ईश्वरापेक्षा मानवी समस्यांचा अभ्यासाला आरंभ झाला. मोक्षापेक्षा सुखी जीवनाकडे लोकांचा कल निर्माण झाला. या सर्व बदलाचा परिणाम चर्च व धर्मगुरूवर मोठया प्रमाणावर झाला. धर्मगुरूचे महत्व कमी झाले. मॅकिव्हलीने धार्मिक संस्थावर कठोर प्रहार केले. राज्यशास्त्राला नीतीशास्त्र व धर्मशास्त्रापासून अलग केले. जर नैतिक मार्गाने राज्याचे संरक्षण होत नसेल तर अनैतिक मार्गाचा वापर करावा त्यात गैर नाही. राज्याच्या संरक्षणासाठी अनैतिक-नैतिक, धार्मिक-अधार्मिक कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याची नवी दृष्टी त्याने दिली. ईश्वरापेक्षा राज्याच्या हिताला प्राधान्य दिले. अशा विचारामुळे तो ज्ञानाच्या पुनर्जागरण चळवळीचे प्रतिनिधीत्व करतो.

अशाप्रकारे तात्कालिन परिस्थितीचा मॅकिव्हलीच्या विचारावर प्रभाव पडलेला असल्याने डनिंग हा विचारवंत मॅकिव्हली प्रतिभावंत प्लॉरेन्सवासी खऱ्या अर्थाने त्याच्या युगाचा शिशु होता असे वर्णन केले आहे ते योग्य वाटते.

**प्र.२ रा. मॅकिव्हलीचे मनुष्यस्वभावासंबंधीचे विचार स्पष्ट करा?**

मॅकियाव्हलीने दि प्रिन्स ग्रंथात मनुष्य स्वभावाचे वर्णन केलेले आहे. त्यांचे संपूर्ण राजकीय विचार मानवी स्वभावाच्या गृहित तत्वाभोवती फिरतात. त्याने तात्कालीन इटलीच्या परिस्थितीचा अभ्यास करून मानवी स्वभावाबद्दल निष्कर्ष काढले आहेत. तो मानवी स्वभावाच्या आधारावर शासनाची भव्य इमारत उभारू इच्छीत होता. मॅकिव्हली मानवाला अत्यंत दुर्गणी मानतो. त्यांची अशी धारणा होती की, मनुष्य हा जन्मतः दृष्ट, स्वार्थी, चंचल, भित्रा, कृतघ्न व संपत्तीचा भोक्ता आहे. मानवाला कार्यप्रवृत्त करणाऱ्या प्रेरणा स्वार्थी आहेत. मानवी स्वभाव अनेक दोषांनी युक्त असल्याने त्यांच्या वर्तनावर योग्य नियंत्रण असले पाहिजे. त्यांच्या इच्छेनुसार वागण्याचे स्वातंत्र्य दिले तर अराजकता निर्माण होईल. माणसाच्या सर्व राजकीय व सामाजिक कार्यांचे प्रेरणास्थान त्याची स्वार्थी प्रवृत्ती हीच असते. हे गृहित तत्त्व त्याने मांडले आहे. आपल्या स्वार्थसिद्धीसाठी किंवा त्या कार्यापासून फायदा होत असेल तरच तो कार्यप्रवृत्त होतो. प्रत्येक मनुष्य जन्मतः स्वार्थी, कृतघ्न, विश्वास घातकी, चंचल आणि भित्रा असतो. त्यांच्या शोधूनही सद्गुण सापडणार नाहीत इतका पशूतुल्य असतो. मॅकिव्हली मानव व पशू यांची तुलना करून पशूप्रमाणे स्वार्थ व भितीपासून प्रेरणा मिळते. मानव चांगले वागण्याचा तेव्हा प्रयत्न करतो जेव्हा ते त्यांच्या फायदयाचे असते. स्वतःच्या फायदयासाठी तो ढोंगबाजी करतो. म्हणून शासकाने मानव दृष्ट व वाईट आहे हे गृहित धरूनच राज्यकारभार करावा. स्वार्थ अंहकार व आक्रमणशिलता मानवाला दृष्ट बनविते. प्रत्येक मानवाला जीवनातील अधिकात अधिक भाग स्वतःच्या उपभोगासाठी हवा असतो. त्यासाठी तो सातत्याने संघर्ष करीत असतो. जर अशा मानवाला कायदयाने नियंत्रित केले नाही तर समाजात

अराजकता निर्माण होईल. सामान्य माणसाला सुरक्षितता हवी असते त्यासाठी तो कायदयाची बंधने मान्य करतो. जीवीत व वित्त रक्षणासाठी मानवाला राज्याची आवश्यकता भासते.

मॅकिव्हलीच्या मते मानवी जीवनाला प्रभावित करणारी एक भावना म्हणजे भिती होय. म्हणून मानवाकडून कोणतेही कार्य करवून घ्यावयाचे असेल तर प्रेमापेक्षा भीतीचा वापर करावा. राजाबद्दल जनतेच्या मनात भीती असावी. कारण भीतीपोटी लोक कायदे पालन करतात. कुशल प्रशासकांने मानवी मनाच्या कमकुवात बाजूचा वापर करून कुटनीतीच्या मार्गाने राज्यकारभार करावा. भीतीशिवाय संपत्तीचा लोभ ही एक महत्त्वाची प्रेरणा आहे. मानवाला निसर्गतः संपत्तीचा लोभ आहे. मानव सातत्याने संपत्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो. सर्व कार्याची संपत्ती ही प्रेरक शक्ती असते. मानवाचा संपत्तीचा लोभ इतका पराकोटीचा असतो की, तो एखादया वेळेस आपल्या वडिलांचा मृत्यू विसरू शकेल पण संपत्तीचे नुकसान विसरू शकणार नाही. त्यापुढची  पायरी म्हणजे "वडिलांचा खून करणाऱ्या क्षमा करेल पण संपत्ती हिरावून घेणाऱ्याला क्षमा करणार नाही" माणूस संपत्ती कमविण्यासाठी अविरत प्रयत्नशील असतात. माणूस हा विलासी प्रवृत्तीचा असल्याने त्याला सुख व आराम हवा असतो. कमी कष्टात जास्त संपत्ती असे त्याला वाटत असते. माणूस चांगला वागतो त्यामागे त्याचा स्वार्थ दडलेला असतो. तो दुसऱ्याशी सहकार्य यामुळे करतो की त्याचे जीवन व वित्त सुरक्षित राहणार असते. सहकार्यामागची प्रेरणा स्वार्थी असते.

**मॅकिव्हलीच्या मनुष्य स्वभावाची वैशिष्टये खालील प्रमाणे**

१) मनुष्य हा स्वार्थी, कपटी, कृतघ्न, भित्रा, दृष्ट व संपत्तीचा भोक्ता आहे.
२) मानवाची सर्व कार्ये स्वार्थाने प्रेरित व लाभांसावर नजर ठेवून असतात.
३) जीवन व वित्त सुरक्षित राहावे या हेतूने तो शासनाचे नियंत्रण मानतो.
४) इतराशी सहकार्य किंवा चांगली वागणूक तो स्वतःच्या फायदयासाठी करतो.
५) प्रेमापेक्षा भीतीमुळे तो राजाज्ञांचे पालन करतो. म्हणून राजाने प्रजावत्सल न बनता भीती ठेवून सामर्थ्यसंपन्न बनावे.
६) माणूस संपत्तीचा भोक्ता असल्यामुळे त्यांच्या संपतीचे अपहरण होऊ नये याची काळजी घ्यावी.
७) शिक्षणाने सुधारणार नाही. त्यामुळे दंडशक्तीचा वापर करावा. स्वार्थ प्रवृत्ती रोखण्याचा एकमेव मार्ग आहे.

**मनुष्य स्वभावाचे टीकात्मक परिक्षण-**

१. मॅकिव्हली मनुष्य स्वभावाचे एकांगी व अतिरंजीत चित्रण केले आहे. त्याला कोणताच शास्त्रीय आधार नाही. ऐतिहासिक दृष्टिकोन नाही. केवळ इटलीतील तात्कालिन परिस्थितीच्या आधारावर हे विचार मांडले आहेत.
२. मानव स्वार्थी, कपटी, दृष्ट, भित्रा आहे असे निराशाजनक विचार मांडले. माणसांच्या सदगुणांकडे दुर्लक्ष केले. परोपकार, त्याग, सेवा, सहकार्य इ.भावना त्याने लक्षात घेतल्या नाहीत.
३. शिक्षणाने मानव सुधारणे शक्य नाही असे सांगुन मानवावर अविश्वास दाखवितो. दंडशक्तीच्या सहाय्याने मानवावर अंकुश ठेवता येतो म्हणून राजाने भीतीचा वापर करावा असे सांगतो हे योग्य नाही. वास्तविक प्रेमाने जास्त कार्य होऊ शकतात. भीतीतून उद्रेक निर्माण होतो हे लक्षात घेत नाही.
४. राजा हा देखील माणूस आहे जर माणसे दुष्ट व दुर्गुणी असेल तर राजाच्या हाती सर्वंकष सत्ता देणे गैर आहे. ही त्यांच्या तत्त्वज्ञानात परस्परविसंगती जाणवते.
५. इटलीच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या आधारावर त्याने मानवी स्वभावाचे वर्णन केले त्यामुळे शास्त्रीय दृष्टी मिळाली नाही. सर्व राष्ट्रामधील माणसे सर्वकाळी सारखी नसतात म्हणून इटलीचा तात्कालिक माणूस अपवाद असू असेल पण अपवाद म्हणजे नियम नव्हे.

या उणिवा मॅकिव्हलीच्या मानवी स्वभावाच्या विचारात असली तरी त्यामुळे त्यांच्या विचाराचे मूल्य कमी होत नाही. मानवी स्वभावाचे त्याने एकांगी चित्रण मांडलेले असले तरी मानवात सद्गुण कमी व दुर्गुण जास्त दिसून येतात. आजच्या राजकारणातही स्वार्थी, धोकेबाज, संपत्तीचा हाव असलेली, अनैतिक व अप्रामाणिक माणसे पाहिल्यावर त्यांची निरीक्षणाची बाजू लक्षात येते. मात्र तो माणसावर जास्त प्रमाणात अश्विास दाखवितो ते योग्य वाटत नाही तरी ही त्यांच्या विचारात तथ्यांस दिसतो.

**प्र. ३ रा. मॅकिव्हलीचे नैतिकता, धर्म व राजकारणाबाबत विचार सांगा?**

मॅकिव्हलीला मध्ययुगीन विचारवंतापासून वेगळे अस्तित्व प्रदान करणारा जर कोणता घटक असेल तर तो म्हणजे त्याचा नैतिकता व धर्मावरिल विचार होय. मॅकिव्हलीने धर्म व राजकारणाची जेवढी फारकत केली तेवढी मध्ययुगीन वा प्राचीन विचारवंताने कधीच केलेली नाही. मॅकिव्हलीने विचारपूर्वक धर्म व नीती यांची फारकत केल्यामुळे त्यांना आधुनिक विचाराचा जनक मानले जाते.

**अ) नैतिकता व राजकारण-** मॅकिव्हलीचा नैतिकता संबंधी विचार हा दुहेरी स्वरूपाचा आहे. कोणताही कार्य मूलत: चांगले किंवा वाईट असत नाही. त्या कार्यापासून जे इष्ट किंवा अनिष्ट परिणाम होतात. त्या आधारावर ते कार्य चांगले किंवा वाईट ठरते. त्याच्या मते राज्याच्या हिताची असणारी गोष्ट चांगली व राज्याच्या हितविरोधी गोष्ट असणारी गोष्ट वाईट असते. त्याने राज्य व समाजाच्या हिताच्या आधारावर नीती व अनीतीच्या कल्पना मांडल्या आहेत. नैतिकता व अनैतिकता या चांगल्या व वाईट बदलच्या गोष्टीवर व्यक्तीचे कार्य घडत असते. मॅकिव्हलीने नैतिक कल्पनेचे दोन भागांत वर्गीकरण करतो.

**१) सामाजिक नैतिकता-** यालाच व्यक्तीगत किंवा जनतेची नीती म्हणतात. प्रजेने सदगुण संपन्न होण्याचा प्रयत्न करावा. सार्वजनिक सेवाभाव, कायदापालन, देशासाठी बलिदान करण्याची मानसिक तयारी, समाज व राज्याच्या हितासाठी वैयक्तिक हिताचा त्याग करणे म्हणजे सामाजिक नैतिकता असे मानतो. समाजातील प्रत्येकाने नैतिकतेचे पालन केले पाहिजे यावर भर देतो.

**२) राजाची नैतिकता-** मॅकिव्हलीने राजकारण व नाती यांची फारकत केली आहे. राजा संपूर्ण स्वतंत्र आहे. तो कोणत्याही नीती नियमांला बाधिल नाही तो नीतीनियमापेक्षा श्रेष्ठ असतो. राजाने आपले उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी कोणत्याही साधनाचा वापर करण्यास हरकत नाही ते अनैतिक असले तरी हरकत नाही. कारण राजा वापरत असलेल्या साधनांचे औचित्य त्याला मिळणाऱ्या सफलतेवर अवलंबून असते. राजाची सफलता नीती व असफलता ही अनीती असे त्याचे समीकरण आहे. राजा यशस्वी झाला तर त्याने वापरलेली साधने नैतिक समजावीत. याचा अर्थ राजा व प्रजा यांच्या नीतीच्या कल्पनात त्याने फरक केला. मॅकिव्हलीने व्यक्ती व राजाच्या नीतीसंबंधी विचार मांडताना व्यक्तीने सद्वर्तनी व नैतिक असले पाहिजे. परंतु राजाने प्रत्यक्ष सद्गुणी असण्याची आवश्यकता नाही. नीती-अनीतीच्या कल्पना ही साधारण माणसांच्या कल्पना असतात. राजाने राज्यहिताचा विचार केला पाहिजे. राजाकरिता काही वेळा सद्गुण हेच अवगुण ठरण्याची शक्यता असते. राजाने परिस्थितीनुसार वागणे योग्य ठरेल. राजा सद्गुणी नसावा परंतु सद्गुणी असल्याचा देखावा करावा. सद्वर्तनाने प्रजेचे व राज्याचे हित असेल तर तेव्हा त्याने सद्वर्तनी असावे. परंतु आवश्यक तेव्हा कूटनीतीचा वापर करण्याचा संकोच करू नये.

मॅकिव्हलीच्या मते आदर्श राज्यात सिंहाचे शौर्य आणि कोल्हाचा कावेबाजपणा असावा. आपल्या उद्देशपूर्तीकरिता राजाने साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गाचा आवश्यकतेनुसार उपयोग करावा. प्रजेला दिलेली वचने पूर्ण करण्यात हित असेल तर ती पूर्ण करावीत. वचन पूर्ण करण्यात हित असेल तर ती पूर्ण करावीत जर अहित असेल तर वचनभंग करावा. नागरिक व राजाच्या नीतीत फरक करतांना महत्वाची सूचना करतो. नागरिकांनी परस्पराशी मित्रत्वाने वागावे. परंतु राजाने शेजाऱ्यापासून सावध राहावे. संधी मिळताच आक्रमण करून प्रदेश जिकावा. राजाने भावनेच्या आहारी जाऊ नये. त्याने विवेकी व संधीसाधू असावे. सामान्य माणसांचे दुर्गण हेच राजाचे गुण होत त्याचा कौशल्याने वापर करून राज्याचे हित सुरक्षित राखावे.

**ब) धर्म व राजकारण-** मॅकिव्हली धर्म व राजकारण यांच्यात फारकत केली पण तो धर्मविरोधी नव्हता. त्याने धर्माची अवहेलना केली नाही. परंतु राजाला धर्माच्या नियंत्रणापासून मुक्त केले. राजाने धार्मिक असण्याची गरज नाही पण धर्माचा राज्यहितासाठी राजाने उपयोग करावा. त्याकाळी इटलीत धर्मव्यवस्था ही अध:पतीत झाली होती. धर्मगुरू हे धर्माच्या नावावर जनतेला लुबाडित होते. धर्माच्या नावे अन्याय व अनीती सर्वत्र पसरली होती. धर्मसत्तेचा राजसत्तेवर मोठा प्रभाव होता. त्यामुळे त्याने धर्म व राजकारण यांचे विभाजन करून राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ असल्याचे सांगितले.

त्याने धर्माच्या परिणामाकडे दुर्लक्ष केले नाही. व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणारी धर्म ही महान शक्ती आहे. भीती व दंडशक्तीच्या आधारावर राज्य टिकत नसते. धर्म ही अशी आध्यात्मिक शक्ती आहे की कायदापासून लपून छपून व्यक्ती दुवर्तन करू शकेल पण धर्माच्या नियंत्रणापासून तिची सुटका नाही. म्हणून राजाने धर्माचा वापर शांतता व सुव्यवस्था आणि राज्याच्या स्थिरतेसाठी करावा. धार्मिकबाबतीत तो दोन प्रकार करतो.

**१) व्यक्ति धर्म-** प्रत्येक व्यक्तीने धर्माचे पालन करावे. धर्माचा सद्वर्तनाशी संबंध असतो. धर्म कृत्यात पाप पुण्य, इहलोक परलोक इ. चा संबंध असतो. धर्म वैयक्तिक बाब असते. धर्म सकारात्मक व नाकारात्मक बाजू सांगतो. प्रामाणिपणा, त्याग या सकारात्मक बाजू असून पाप, चोरी या नकारात्मक बाजू होत. माणसांच्या दृष्ट प्रवृत्तीवर नियंत्रणाचा धर्माएवढा सोपा मार्ग नाही. मॅकिव्हली धर्माचे उपयोगितेच्या आधारावर ठरवितो. ज्या धर्मामुळे राज्याचे हित होत असेल तो धर्म चांगला मानतो. राजाने धर्मात हस्तक्षेप करू नये. परंतु अधार्मिक बाजूवर नियंत्रण ठेवावे.

**२) राजधर्म-** राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ असतो. राज्यसंरक्षण व राजहित हाच राजाचा धर्म असतो. या साध्याप्रत जाणारा प्रत्येक मार्ग हा धार्मिक असतो. राजाने उपयोगितेच्या आधारावर धर्म व अधर्माचा वापर करावा. व्यावहारिक दृष्टीने राजधर्माचा विचार केलेला आहे. राज्याच्या स्थैर्याचा विचार करून राज्याचे संरक्षण करणे हेच राजाचे प्रमुख कर्तव्य असते. राज्यसंरक्षणार्थ अधार्मिक व अनैतिक मार्गाचा उपयोग राजा करू शकतो. राजधर्म म्हणजे राज्याच्या ध्येयासाठी आवश्यक असलेली कार्ये असे त्याचे समीकरण होय. शांततेच्या काळात राजाने धार्मिक कल्पनाचा आदर करावा. धार्मिक कार्यात सहभाग घ्यावा. धार्मिक कार्यास सढळ हाताने मदत करावी. राजाने धार्मिक असू नये पण धार्मिक असल्याचा देखावा करावा. राजाने जनतेसमोर असे वागावे की प्रजेला राजा दयाळू, प्रजावत्सल, धार्मिक व शुद्ध अतःकरणाचा वाटावा. धर्माचा ऱ्हास हा राज्याच्या विनाशाचे कारण ठरू शकतो. कार्यसिद्धीचे साधन म्हणून धार्मिक भावनेत न अडकता राजाने धर्माचा वापर राजहितासाठी करावा असे मॅकिव्हलीला वाटते.

अशाप्रकारे मॅकिव्हलीने धर्म व राजकारणबाबत असलेले विचार पाहता तो अनैतिक व अधार्मिक विचारवंत वाटतो. परंतु तो वास्तवतावादी विचारवंत असल्याने धर्म व नैतिक या दोन कल्पनापासून राजकारणाला मुक्त करू इच्छीत होता. राजकारणावरिल धर्म व नीतीचा पगडा कमी करून तो राज्याचे स्थैर्य व सामर्थ्य वाढवू इच्छीत होता. तो नास्तिक नव्हता. परंतु धर्माच्या अवास्तव प्रभावाच्या विरोधी होता. व्यक्तीची सुरक्षितता व कल्याण राज्यात असल्याने नैतिक-अनैतिक किंवा धार्मिक-अधार्मिक कोणत्याही साधनाचा वापर करण्याची परवानगी राजाला देतो. धर्म व नीतीपेक्षा त्याला देशभक्ती अधिक महत्त्वपूर्ण वाटते. तो व्यावहारिक राजनीतिज्ञ असल्याने धर्म व नीतीस राजकारणापासून अलग केले आहे. डनिंगच्या मते "मॅकिव्हलीचा नीती व धर्मासंबंधीचा दृष्टिकोन शास्त्रीय पद्धतीचा आणि राजकीय समस्या जाणून त्याचे निवारण करण्याची समर्पकता ठेवणारा होता."

**टिप- मॅकिव्हलीचे साध्य व साधनाबाबत विचार-** मॅकिव्हलीच्या मते साध्य महत्त्वाचे असून साध्यापर्यंत जाणारे मार्ग साध्यप्राप्तीमुळे आपोआप योग्य बनतात. यश हीच त्यांची नैतिकता मानतो. तो वास्तवतावादी विचारवंत होता. त्याने आपले लेखन करतांना निरिक्षणात्मक व वास्तवतावादी दृष्टिकोन स्वीकारला. इटलीला सामर्थ्यसंपन्न बनविणे ध्येय होते. ते ध्येयपूर्ण करण्यासाठी कोणत्याही साधनाबाबत विचार मांडताना उपयोगितावादाचा आधारावर विचार मांडले. राजा कोणताही नीतीनियमाला बांधला नाही. तो नितीनियमापेक्षा श्रेष्ठ मानतो. आपले ध्येय व उद्दिष्ट शुद्ध असले तरी म्हणजे ते पूर्ण करण्यासाठी वापरले जाणारे साधन अनैतिक असले तरी हरकत नाही. कारण राजा वापरत असलेल्या साधनाचे औचित्य त्याला मिळणाऱ्या यशावर अवलंबून असते. राजाच्या यशावर मॅकिव्हली साधनाची योग्यता आणि अयोग्यता ठरवितो. राजा यशस्वी झाला तर त्याने वापरलेली साधने योग्य समजावीत. यशावर तो साधनाचे पावित्र्य ठरवितो. यशासाठी तो कोणत्याही साधनाच्या वापरास मान्यता देतो. राजाने उद्देशपूर्तीसाठी साम, दाम, दंड, भेद इ.मार्गाचा आवश्यकतेनुसार वापर करावा. यशासाठी सिंहाचे शौर्य व कोल्हाचा कावेबाजपणा असावा. राज्याचे संरक्षण व राजहित हा राजाचा धर्म असावा. राज्याचे संरक्षण हा राजधर्म असल्याने या साध्याप्रत जाणारा प्रत्येक मार्ग हा धार्मिक असतो. राजधर्म म्हणजे राज्याच्या ध्यर्यासाठी आवश्यक असलेली कार्य होय. ही कार्य करण्यासाठी कोणत्याही साधनाच्या वापराला मान्यता देता. याचा अर्थ मॅकिव्हलीच्या मते साध्य उत्तम असले पाहिजे. साधने कोणतेही असले तरी चालतील

मात्र त्या साधनाने साध्य मिळविण्यासाठी यश मिळविले पाहिजे. तर ते साधने योग्य व पवित्र समजावीत असे मत मांडतो. यशाच्या आधारावर साधनांचे मोजमाप तो करतो. यशासाठी हिंसक व अहिंसक साधन वापरायला मान्यता देतो. तो साधनाला महत्व न देता साध्यावर भर देतो.

**प्र.४ था. मॅकिव्हली राज्य आणि राज्याच्या वर्गीकरणाबद्दलचे विचार सांगा.**

मॅकिव्हली राज्यसंस्थेला एक कृत्रिम संस्था मानतो. तो राज्याच्या उत्पत्ती संबंधी स्वतंत्र दृष्टिकोन मांडतो. त्यांची मानवी स्वभावाविषयीची गृहिते त्याला राज्यासंबंधी स्वतंत्र विचार मांडण्यास प्रवृत्त करतात. त्याने राज्य निर्माण होण्यापूर्वीच्या अवस्थेचे वर्णन करून राज्याची उत्पत्ती मनुष्याच्या स्वार्थातून झाली असे मानतो. मनुष्य हा स्वभातःच स्वार्थी, दुष्ट, आणि नीच प्रवृत्तीचा आहे. यामुळे राज्यपूर्व अवस्थेत मनुष्य जीवन संकटे आणि संघर्षाने परिपूर्ण होती. कोणाचेही जीवन आणि संपत्ती सुरक्षित नव्हती. या अवस्थेला लोक कंटाळले. त्यांनी समाजाची व्यवस्था पाहण्यासाठी काही अधिकाऱ्यांची निवड केली. सर्व मानवांचे सामान्य हित साधण्यासाठी राज्यसंस्थेची उत्पत्ती झाली असे त्याचे स्पष्टीकरण आहे. राज्य निर्मितीच्या प्रेरणा स्वार्थी आहेत. माणसाच्या दृष्ट प्रवृत्तीवर नियंत्रण घालून जीवित व वित्त संरक्षण करणे हा राज्याचा प्रधान हेतू आहे असे सांगुन दैवी सिद्धांत नाकारतो. राज्य मानवनिर्मिती समाजाचे सामान्य हित साध्य करण्यासाठी निर्माण झाल्यामुळे व्यक्तीहिताचा त्याग त्यात अपेक्षित असतात.

राज्य मानवाच्या सर्व समुदायांमध्ये श्रेष्ठ संस्था आहे. व्यक्तींचे मिळून राज्य बनल्यामुळे व्यक्तीच्या गुणासारखेच राज्याचे गुण असतात. राज्य कल्याणकारी संस्था असल्यामुळे राज्यापुढे व्यक्ती गौण आहे. राज्यहितातच व्यक्ती हित सामावलेले आहे. व्यक्ती व इतर संस्थांनी राज्याच्या अधिपत्याखाली कार्य केले पाहिजे. त्या संस्था राज्याला जबाबदार असतात. पण राज्य स्वतंत्र असून ते कुणाला जबाबदार नसते. ते धर्म व नीतीच्या वरच्या दर्जाचे असते. राज्याचा इतिहास हा त्यांच्या उत्कर्ष व अधःपतनाचा इतिहास आहे. राज्य परिवर्तनशील असल्यामुळे त्यात बदल होत जातात. अशा बदलाचा एक निश्चित क्रम असतो. मानवी स्वभावातील बदलानुसार राज्ये उत्कर्षाप्रत वाटचाल करतात आणि लयास जातात व त्यानंतर पर त्यांचा विकास होत जातो. त्याने राज्याचे शक्तीशाली आणि दुर्बल राज्य या दोन प्रकारात विभाजन करतो. शक्तिशाली राज्य ही आक्रमण प्रवृत्तीची असतात. त्यामध्ये युद्ध व संघर्ष सातत्याने घडत असतो. या राज्यात स्वार्थाला जागा नसते. राज्यात एकता राहून राज्यात स्थैर्य असते. याउलट दुर्बल राज्य ही स्वार्थाने पीडित, युद्धाबद्दल उदासीन असतात. राज्याकडे दुर्लक्ष असल्यामुळे जनतेत एकता व संघटनसामर्थ्य नसल्यामुळे या राज्यावर आक्रमण करून त्यांना जिंकणे सोपे असते. त्यामुळे ही राज्य अस्थिर असतात.

मॅकिव्हली हा यर्थायवादी विचारवंत असल्यामुळे राज्याच्या उत्पत्ती, विकासासंबंधी व्यवस्थित मांडणी करू शकला नाही. प्रत्येक सिद्धातात मांडताना इटालीच्या मर्यादेबाहेर जाऊन करू शकत नाही हीच मर्यादा राज्यविषयक विचारातही दिसते.

**राज्याचे वर्गीकरण-** मॅकिव्हली राज्य वर्गीकरणावर ॲरिस्टॉटलचा प्रभाव दिसतो. ॲरिस्टॉटलप्रमाणे तो तीन शुद्ध व तीन विकृत अशा एकूण सहा प्रकारच्या सरकारची कल्पना मांडतो आणि संख्यातत्त्वाला अधिक महत्त्व दिले आहे.

**राज्याचे वर्गीकरण**

| अ) राज्याचे शुद्ध प्रकार | ब) राज्याचे विकृत प्रकार |
|---|---|
| १. राजतंत्र Monarchy | १.एकतंत्र Tyranny |
| २. कुलीन तंत्र Aristocracy | २. धनिकतंत्र Oligarchy |
| ३. प्रजातंत्र Republic | ३.समूह तंत्र Democracy |

**संमिश्र शासन-** वरील सहा प्रकारशिवाय हा सातवा प्रकार सांगतो. या प्रकारात राजतंत्र, महाजनतंत्र आणि प्रजातंत्र या तिन्ही शासन पद्धतीतील गुणाचा समन्वय साधलेला असेल. संमिश्र शासन व्यवस्थेत सत्तेचे संतुलन साधले जाते. त्यात कोणताही वर्ग सर्वाधिकारी बनत नाही म्हणून या शासनाचा गौरव करतो. प्रिन्स ग्रंथात राजतंत्र ग्रंथाला तर डिस्कोर्सेस ग्रंथात गणतंत्राला श्रेष्ठ मानतो.

१. **राजतंत्र-** अनुवंशिक राजतंत्र व निर्वाचित राजतंत्र हे राजतंत्राचे दोन प्रकार पाडतो. निर्वाचित राजतंत्राला श्रेष्ठ मानतो. स्वार्थ, फुटीरता, देशाच्या एकात्मतेला धोका, भ्रष्ट्राचार इत्यादींवर मात करण्यासाठी राजतंत्र हा शासनाचा सर्वश्रेष्ठ प्रकार सांगतो. इटलीतील भ्रष्ट स्वरूप नष्ट करण्यासाठी एकसंघ व शक्तिशाली निरंकुश राजतंत्राचे समर्थन करतो.

२. **कुलीन तंत्र-** मॅकिव्हली कुलीन तंत्रावर तीव्र स्वरूपाची टीका कतरे. या तंत्रात मूठभर लोक दुसऱ्याच्या श्रमावर ऐशाआरामाचे जीवन जगतात. स्वतः परिश्रम करावे लागत नसल्यामुळे ते आळशी व सुखलोलूप बनतात. इटलीतील भ्रष्टतेला हा वर्ग त्याला जबाबदार वाटतो. म्हणून हा शासन प्रकार त्याला अयोग्य वाटतो.

३. **गणतंत्र किंवा प्रजातंत्र-** डिस्कार्सेस ग्रंथात गणतंत्रात्मक शासन हे उत्कृष्ट असल्याचे मानतो. या शासनात लोक प्रतिनिधिच्या हातात सत्ता सूत्रे असतात. लोकमताचे शासनकार्यात प्रतिबिंब पडते. सर्वांना सहभाग संधी आणि राजकीय शिक्षणामुळे लोकांची जबाबदारी वाटते. या शासन व्यवस्थेत परिस्थितीनुसार परिवर्तन करता येत असल्याने हा शासन प्रकाराला चांगला म्हणतो. परंतु मनुष्य स्वभावामुळे गणतंत्र यशस्वी होण्यास अडचणी निर्माण होतात.

शासन वर्गीकरणासोबत राज्य विस्ताराची आवश्यकता विशद करतो. त्यांच्यामते स्थिर वस्तू शाश्वत व दीर्घजीवी नसते. राज्यात चैतन्य कायम ठेवण्यासाठी राजाने आपला प्रदेश वाढविला पाहिजे. राज्य वैभवासाठी स्थिर शांतता व सुव्यवस्थेसाठी राज्य विस्ताराची त्याला आवश्यकता वाटते.

**प्र. ५ वा. मॅकिव्हली राजाला केलेला उपदेश वा शासकांची कर्तव्य स्पष्ट करा?**

मॅकिव्हलीने दि प्रिन्स ग्रंथात राजाने कोणत्या परिस्थिती कसे वर्तन करावे व कोणत्या नियमांचे पालन करावे हे सांगितले. हा ग्रंथ मॅकिव्हलीच्या तत्त्वज्ञानाचे सार आहे. प्रिन्स ग्रंथ प्लेटो, ॲरिस्टॉटल सारखा तात्त्विक ग्रंथ नसून तो वास्तविक राजकारणावरील यर्थाथवादी ग्रंथ आहे. हा ग्रंथ त्याने मेडिसी वंशाच्या राज्याला समर्पित केला होता. राज्यकारभार कसा कौशल्याने करावा याचे तंत्र सांगून उत्तम राज्यकर्त्यासाठी मार्गदर्शन केलेले आहे. या ग्रंथ लेखनाचा मूळ हेतू राजाने शांतता व सुव्यवस्था कशाप्रकारे टिकवावी.त्यासाठी कोणते उपाय योजावे. त्याचा मुख्य उद्देश राज्याला टिकवून त्याची वृद्धी करण्याचा असतो. त्यासाठी तो राजास उपदेश करून कर्तव्याची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

१.**प्रजेच्या जीवित व संपत्तीचे रक्षण-** मॅकिव्हलीच्या मते, राजाने प्रजेच्या जीविताचे रक्षण करावे. कारण जर जीविताचे रक्षण केले नाही तर इतर स्वातंत्र्य व्यर्थ ठरतात. तसेच राजाने संपत्तीचे रक्षण करावे. मनुष्य स्वभावताच संपत्तीचा लोभी आहे. त्याचे जीवीतएवढेच संपत्तीवर प्रेम असते. राजाने संपत्तीचे अपहरण करू नये. माणूस एकवेळेस वडीलांच्या मारेकरूला क्षमा करू शकतो पण संपत्तीचे अपहरण करणाऱ्याला माफ करणार नाही. त्यामुळे राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी राजाने प्रजेच्या जीवित व संपत्तीचे रक्षण करणे हे त्याचे प्रथम कर्तव्य होय. त्यासाठी राजाने प्रजेकडून कमीतकमी कर वसूल करावा. प्रजेच्या संपत्तीची उधळपट्टी करू नये. वित्त, स्त्री संरक्षण करतो तो राजा लोकप्रिय होतो.

२. **आक्रमकता-** राजाने नेहमी युद्धसज्य व आक्रमक असावे. युद्ध हे स्थिर राज्यासाठी आवश्यकअसते. शक्तीसंतुलन व कुटनीती हा परराष्ट्रधोरणाचा केंद्रबिंदू असावा. दोन शेजारील राष्ट्रांत संधी होऊ नये याची खबरदारी घेऊन शेजारच्या राज्यात हस्तक्षेप करावा. आपल्यापेक्षा शेजारच्या राष्ट्राची शक्ती वाढणार नाही याची काळजी घ्यावी. जवळच्या राज्याला मित्र बनविण्यासाठी प्रलोभनाचा देखील उपयोग करावा. संधी मिळताच शेजारील राष्ट्रावर आक्रमण करून इतर राष्ट्रांना जिकून आपले मांडलिक करावे. युद्धात जिंकलेल्यांना मांडलिक बनवून आपली शक्तिशाली तुकडी तैनात करावी.

३. **युद्ध संपत्तीचे वाटप-** राजाने युद्धात पराजित केलेल्या राजाची सर्व संपत्ती खजिन्यात जमा करू नये. त्यामुळे सैनिकमध्ये गैरसमज निर्माण होतो. युद्धातील लुटीचे सैनिकामध्ये योग्यतेनुसार वाटप करावे. लुटीच्या संपत्तीमधून आपला खर्च चालववावा. त्यामुळे राजाबद्दल प्रजा व सैनिकात आदराची भावना निर्माण होईल.

४. **रूढी व प्रथाचा आदर-** कोणत्याही समाजात रूढी किंवा प्रथा यांच्याशी लोकांचे भावनिक नाते असते. राजाने त्या तोडण्याचा प्रयत्न केल्यास विरोध वा विद्रोह होण्याची शक्यता असते. म्हणून राजाने शक्यता समाजाच्या भावनिक प्रश्नात हस्तक्षेप करू नये.

५. **सिंह व कोल्हाच्या गुणांचा समन्वय-** मॅकिव्हलीच्या कुटनीतीचे सार या गुणांच्या समन्वयात सामावलेले आहे. राजा हा गुढ व्यक्तिमत्त्वाचा असावा. त्याने मनात एक व ओठात दुसरेच असे वागणे गरजेचे आहे. त्याच्या भावी योजना शत्रूपासून गुप्त राहिल्याशिवाय त्याला यश मिळणार नाही. त्याला आपल्याविरूद्ध चाललेल्या कट कारस्थानाचा अंदाज आला पाहिजे व विरोधकाचा बिमोड करण्यात यश मिळाले पाहिजे. राजाच्या पराक्रमामुळे राष्ट्रातील प्रजेवर व परराष्ट्राच्या राजावर प्रभाव पडतो तर कोल्हाच्या धूर्तपणामुळे योजना यशस्वी करण्यास मदत मिळते. फसवेगिरी करून शत्रूस नामोहरण करता येते त्यासाठी कावेबाजपणा आवश्यक असतो.

६. **सद्‌गुणांचा आभास-** मॅकिव्हलीच्यामते राजाला सद्‌गुणी असण्याची आवश्यकता नाही पण तो लोकांना सद्‌गुणी व प्रेमळ वाटला पाहिजे. परंतु राजाने राज्याच्या हितासाठी वेळप्रसंग पडल्यास विरोधी वर्तन करावे. राजाचे यश हाच सद्‌गुण असतो. त्याने भावनेच्या आहारी जाऊ नये. जनतेच्या भावनेचा राज्याच्या हितासाठी आवश्य उपयोग करून घ्यावा.

७. **प्रेमापेक्षा भीतीचा प्रभाव टाकावा -** मॅकिव्हलीने मनुष्य स्वभावाचे वर्णन करतांना कपटी, धूर्त, स्वार्थी व दुर्गुणी चित्र रेखाटले आहे. त्यांच्या या वर्तनावर नियंत्रणासाठी राज्य उदयास आले. माणूस राजाज्ञांचे पालन भीतीमुळे करतो. भीतीमुळे कायदा उल्लंघन करणार नाही. लहानसहान अपराधाबद्दल कडक शिक्षा केल्यास राजाचा दबदबा निर्माण होतो. राजा हा कठोर हृदयी असावा. म्हणून राजाने प्रेमापेक्षा भीतीचा प्रभाव टाकावा.

८. **राजाने अजातशत्रू असावे-** राज्यात उद्रेक होऊ नये या करिता राजाने आपले शत्रू निर्माण करू नये. जोपर्यंत प्रजा संतुष्ट असते. राजाबद्दल प्रजेची भावना आदराची व विश्वासाची असते तो पर्यत उद्रेक होत नाही. शहाणा राज्यकर्ता सामान्य छळ होणार नाही व श्रीमंताच्या संपत्तीचे संरक्षण होईल याची काळजी घ्यावी. राजाने अप्रियता निर्माण होईल असे कार्य स्वत: करू नये. आपल्या अधिकाऱ्याकडून दंड किंवा शिक्षेची तरतूद करावी. आपली प्रतिष्ठा व नावलौकिक वाढले अशा कार्यात जातीने सहभागी झाले पाहिजे. पुरस्कार किंवा बक्षीस वितरण करून प्रजेला आपलेसे करावे.

९. **धार्मिक देखावा-** मॅकिव्हली राज्यशास्त्राला धर्म व राजकारणापासून अलग केलेले आहे. धर्माला व्यक्ती नियंत्रणाचे साधन मानतो. राजाने धार्मिक असू नये पण धार्मिक असल्याचा देखावा करावा. धार्मिक कार्यात सहभाग व्हावे.धार्मिक कार्यक्रम व संस्थाना सढळ होताने मदत करावी. आपण धर्मपरायण असल्याची जनतेत भावना निर्माण करावी.

१०. **मनोरंजनाची व्यवस्था-** राजाने प्रजेचे लक्ष शासन कार्यापासून इतर गोष्टीकडे वळवावे. जनता राज्यकारभाराकडे लक्ष देवू लागल्यास प्रजेचे शासन कार्यातील दोषाकडे प्रजेचे लक्ष जाईल. परिणामी राजाविरोधी वातावरण तयार होऊ शकेल. कट, कारस्थाने उद्‌भवतील म्हणून राजाने संगीत, नृत्य व नाटक यासारखे मनोरंजनाचे उपाय करून प्रजेला गुंतवून ठेवावे.

११. **त्वरित निर्णय-** राजाने कोणत्याही कठिण प्रंसगी त्वरित व ठाम निर्णय घेतले पाहिजेत. निर्णय घेण्यास मदत व्हावी म्हणुन बुद्धिवान व विश्वासू सल्लागार आपल्याजवळ ठेवावे. खोटया प्रशंसकापासून सावध राहावे. आत्मस्तुतीच्या दोषात अडकून राहू नये.

१२. **राष्ट्रीय सेना उभारावी-** मॅकिव्हली राजाला सल्ला देता की, राजाने राष्ट्रीय सेना उभारावी. त्याकाळी भाडोत्री सैन्याचा वापर जास्त केला जात असे. भाडोत्री सैन्यावर राजा अवलंबून राहिल्यास त्याचा अध:पात होईल. भाडोत्री सैन्य अंतर्गत कलह व परकीय आक्रमण दोन्ही थांबविण्यास असमर्थ असते.

अशा प्रकारचे वास्तवतावादी भूमिकेतून मॅकिव्हली राजाला उपदेश केलेला आहे. त्यांच्या उपदेशात मुत्सदीपणा, दूरदृष्टी, सावधानता, संयम याचा प्रत्यय येतो. राज्याचे हित व प्रजेचे कल्याण हा उद्देश ठेवून सर्व सत्ता सूत्रे

राजाकडे सोपवितो. राज्यसंरक्षण व विकासासाठी योग्य अयोग्य किंवा नैतिक अनैतिक मार्गाच्या वापरला परवानगी देतो. त्यांच्या दृष्टीने साध्य साधने महत्त्वाची नसून यश हीच नैतिकता मानतो.

**प्र.६ वा. मॅकिव्हलीला आधुनिक राज्यशास्त्राचा जनक का मानले जाते?**

मॅकिव्हलीस आधुनिक राज्यशास्त्राचा जनक मानले जाते. याचा अर्थ त्यांच्या विचाराने आधुनिक राजकीय विचारावर फार मोठा प्रभाव टाकला आहे. समकालीन राजकीय तत्त्वज्ञांची पुढची झेप त्यांच्या तत्त्वज्ञान होती. त्याने राज्यशास्त्रीय तत्त्वज्ञानात जी मौलिक भर घातलेली आहे ती उल्लेखनीय मानली जाते. त्यांच्या विचारात मध्ययुग व आधुनिक युगाच्या प्रवृत्तीचे दर्शन होते तो दोन्ही युगाचे प्रतिनिधित्व करीत नाही तर मध्ययुगाचा शेवट व आधुनिक युगाची पहाट त्यांच्या विचारापासून होते. त्यामुळे त्याला आधुनिक युगाचा जनक मानले जाते. प्रा.डनिंगच्या मते "मॅकिव्हली आधुनिक युगाची सुरूवात करतो हे म्हणणे तेवढेच खरे आहे की जेवढे तो मध्ययुगाचा शेवट करतो असे म्हणणे खरे आहे" त्याने मध्ययुगीन विचाराचे खंडन करून नव्या विचाराची सुरूवात केली. राजकारणाला नवे रूप दिले. सैद्धांतिक मंथन न करता राज्यशास्त्राला व्यावहारिक बैठक प्राप्त करून देऊन विषयाच्या कक्षा विस्तीर्ण केल्या. खालील कारणामुळे त्याला राज्यशास्त्राचा जनक मानण्याची कारणे सांगितली जातात.

**अ) मध्ययुगाचा शेवट-**

१. **दैवी कायदा अंत नागरी कायदा श्रेष्ठ-** मध्ययुगात दैवी कायदयाला महत्व होते. त्यावेळी नागरी कायदयापेक्षा पारलौकिक जीवनावर भर होता. राज्य दुय्यम मानले जात असे आणि धार्मिक आधारावर शिक्षेची तरतूद होत असे. मॅकिव्हलीने राज्यसंस्था व नागरी कायदे श्रेष्ठ असतात. कायदे राजाने निर्माण केलेले असून त्यांचा उद्देश शांतता व भौतिक कल्याण आहे. कायदाचा पारलौकिक जीवनाशी संबंध नसून भौतिक सुख व समृद्धी संबंधी असतो असे त्याने सांगितले आहे.

२. **धर्मगुरूचे श्रेष्ठत्व नाकारले-** मध्ययुगात राज्याची सर्व सत्ता ख्रिश्चन धर्मगुरूच्या हातात एकवटली होती. धर्मगुरू ईश्वराला जबाबदार होते. त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते. तो आपल्या ग्रंथात नमूद करतो की, ख्रिश्चन धर्मगुरूली आम्हाला केवळ अधार्मिक केले नाही तर आमच्या देशाची तुकडे केले. आमचे अध:पतन आजही सुरू आहे. धर्मगुरूवर कोणतेच नियंत्रण नसल्याने ते अनैतिक व भ्रष्ट बनले. तो राष्ट्रप्रेमी असल्याने धर्मगुरूवर कडक टीका प्रहार करून राजसत्तेचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. राजाला चर्चवर नियंत्रण करणारे नियम करण्याचा तो अधिकार देतो. तो सर्व संस्थात राज्यसंस्था श्रेष्ठ असल्याचे सांगतो.

३. **सांमतवादास विरोध-** मध्ययुगात एका राजाच्या नियंत्रणाखाली अनेक सांमत असत. हे सामंत त्यांच्या क्षेत्रात सैन्य व न्याय यांची व्यवस्था करीत असत. संपर्कसाधनाच्या कमतरतेमुळे राजाचे सांमतावर फारसे नियंत्रण राहत नसे. त्याचा परिणाम ते आळशी व हुकूमशही बनल्याने त्यांच्या क्षेत्रात शांतता व सुव्यवस्था निर्मितीत असमर्थ ठरले. सांमत हे राष्ट्रनिर्मितीत अडसर बनल्यामुळे मॅकिव्हली सामंतवादाचा विरोधक होता.

**ब) आधुनिक युगाचा प्रारंभ-**

१.**ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब-** मध्ययुगात धार्मिक आणि राजकीय सर्व प्रकारच्या समस्याचे चिंतन तार्किक पद्धतीने केला जात असे. त्याने अंधविश्वाच्या प्रक्रियेस नकार देवून शास्त्रीय, निरीक्षणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला. कारण जुनी पद्धत अव्यवहार्य होती. वुर्डच्या मते"मॅकिव्हलीचा प्रिन्स हा ग्रंथ अशी पहिली कृती हाती ज्यात ईश्वरीस व मानवी तत्वात स्पष्ट संघर्ष दिसून येतो." मॅकिव्हलीनंतर शास्त्रीय पद्धत म्हणून ऐतिहासिक पद्धतीचा वापर पुढे अनेक विचारवंतानी केलेला आहे.

२. **धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन-** मॅकिव्हली हा पहिला विचारवंत आहे की त्याने धर्म व राजकारणाला अलग केले आहे. तो राजाला चर्चपेक्षा श्रेष्ठ मानतो. राष्ट्रहितासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व साधनांना योग्य समजतो. राजकारणाला धर्मापासून मुक्त करून धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करू इच्छीतो. या मुद्दामुळेच मॅकिव्हलीला मध्ययुगीन विचारवंतापेक्षा वेगळे स्थान दिलेले आहे. त्याने राज्यशास्त्राला मध्ययुगापासून आधुनिक युगात आणण्याची जबाबदारी पार पाडली आहे.

३. **सार्वभौमत्व व राष्ट्र राज्य कल्पनांचा सूचक-** मॅकिव्हलीने सार्वभौमत्व हा शब्द वापरलेला नाही पण त्याबाबत अस्पष्ट विचार मांडलेले आहेत. राजा हा सर्व नियंत्रणापासून मुक्त असतो. तो कुणालाही जबाबदार असत नाही. राजाची शक्ती अविभाज्य असते. राजावर अंतर्गत व बाहय नियंत्रण नसते. त्यांच्यापासून प्रेरणा घऊन बाँदे व हॉब्जने निरंकुश सार्वभौमत्वाची कल्पना मांडली. जी आज राज्याचा आवश्यक घटक मानली जाते. त्याने राष्ट्रीत्व हा शब्दप्रयोग केला नसला तरी राष्ट्रीत्वाचे घटक समान भूप्रदेश, परंपरा, समान कायदा याचे राज्याने संघटन करावे असे तो सुचवितो. आज राष्ट्रीत्वाच्या निर्मितीसाठी हे घटक आवश्यक आहेत.

४. **शक्तीसामर्थ्याचा वापर-** मॅकिव्हली हा असा पहिला विचारवंत आहे की, जो शक्तीला राज्याचा पाया मानतो. मानवी स्वभाव दृष्ट, स्वार्थी, लोभी असल्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शक्तीसामर्थ्याचा वापर करावा. भीतीमुळे राज आज्ञेचे पालन होते. राजाने शक्तींच्या आधारावर इतर राज्यांवर वचक व दरारा निर्माण केला पाहिजे असेही त्याला वाटते.

५. **साम्राज्यवादी-** मॅकिव्हली हा शक्तीसंपन्न व दुर्बल राज्य असे राज्याचे प्रकार सांगतो. शक्तीसंपन्न राज्यानी सदैव युद्धसज्य असले पाहिजे. राजाने शेजारिल राज्यावर आक्रमण करून त्याचा प्रदेश जिंकावा व आपल्या राज्याचा विस्तार करावा असे तो सुचवितो. आंतरराष्ट्रीय पातळीवर कुटनीतीचा वापर करावा. त्याने राज्याच्या स्थैर्य व संरक्षणासोबत राज्यविस्तारावर सातत्याने भर दिलेला असल्यामुळे त्याचे विचार साम्राज्यावादाचा पुरस्कार करणारे आहेत.

६. **बुद्धिवादी व व्यक्तिवादी-** मॅकिव्हली प्रत्येक राजकीय प्रश्नाकडे बुद्धिवादी दृष्टिकोनामधून पाहतो. त्याने शास्त्रीय आधारावर ग्रंथाचे लेखन केले. वास्तविकता लक्षात घेऊन सिद्धात व व्यवहारवादाची सांगड घातली. त्यांच्या पूर्वीच्या विचारवंतानी व्यक्तीला गौण स्थान दिले. त्याने राज्याचा उद्देश प्रजाजनाचे जीवन व संपत्ती रक्षण सांगुन प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिविकासाची पूर्ण संधी मिळावी म्हणून राजकारणात सहभागाची संधी त्याला दयावी हे त्याचे विचार व्यक्तीवादाच्या जवळ जाणारे आहेत.

७. **उपयोगितावादी-** मॅकिव्हलीच्या विचारात उपयोगितावादाची झलक दिसते. उपयोगितावादाचा आधार सुखाची इच्छा आणि दु:खाचे निवारण स्वाभाविक आहे. मॅकिव्हलीने पारलौकिक जीवन नाकारून जीवनातील सुख,समृद्धी व जनकल्याणाचा विचार केला.

मॅकिव्हलीचे विचार पूर्णपणे दोषमुक्त नाही हे वास्तव असले तरी त्यांच्या विचाराचा आधुनिक विचारवंतावर जबरदस्त प्रभाव दिसतो. त्याला अनैतिक व अधार्मिक विचारवंत म्हणत असतांनाच त्यांच्या कूटनीतीचा अवलंब आजही राज्यकर्ता वर्ग सर्रास करतांना दिसतो. त्यांने राजकारला दिलेले वास्तविक महत्त्व आजही दुर्लक्ष करता येणार नाही.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. मॅकिव्हली लिहीलेल्या दोन ग्रंथाची नावे लिहा.
   उत्तर- मॅकिव्हलीने The Prince, The Discourses, The Art of War, The History of Floerence इ. ग्रंथ लिहीले आहेत.
२. मॅकिव्हली कोणत्या दोन गोष्टीपासून राजकारणाला दूर ठेवू इच्छितो होता.
   उत्तर- मॅकिव्हली धर्म व नैतिकता या दोन गोष्टींना राजकारणापासून दूर ठेवू इच्छित होता.
३. मॅकिव्हलीच्या मते राजाची प्रमुख दोन कर्तव्य कोणती?
   उत्तर-राजाने प्रजेच्या जीवित व संपत्तीचे रक्षण करणे, रूढी व प्रथाचा आदर करावा आणि राष्ट्रीय सेना उभारावी तसेच राजाने अजातशत्रू असावे ही राजाची प्रमुख कर्तव्य मॅकिव्हली सांगतो.
४. मॅकिव्हलीने केलेले मनुष्य स्वभाव वर्णन लिहा.
   उत्तर- मॅकियाव्हलीने दि प्रिन्स ग्रंथात मनुष्य स्वभावाचे वर्णन केलेले आहे. मॅकिव्हली मानवाला अत्यंत दुर्गणी मानतो. त्यांची अशी धारणा होती की, मनुष्य हा जन्मतः दृष्ट, स्वार्थी, चंचल, भित्रा, कृतघ्न व संपत्तीचा भोक्ता आहे. मानवाला कार्यप्रवृत्त करणाऱ्या प्रेरणा स्वार्थी आहेत.
५. मॅकिव्हलीचे नैतिकतेसंबंधी विचार वा प्रकार सांगा.
   उत्तर- मॅकिव्हलीचा नैतिकता संबंधी विचार हा दुहेरी स्वरूपाचा आहे. त्याने राज्य व समाजाच्या हिताच्या आधारावर नीती व अनीतीच्या कल्पना मांडल्या आहेत. मॅकिव्हलीने सामाजिक नैतिकता व राजाची नैतिकता या दोन प्रकारात नैतिकतेचे वर्गीकरण करतो.
६. मॅकिव्हलीचे धर्माबद्दलची मते लिहा.
   उत्तर- मॅकिव्हली धर्म व राजकारण यांच्यात फारकत केली पण तो धर्मविरोधी नव्हता. त्याने धर्माची अवहेलना केली नाही. परंतु राजाला धर्माच्या नियंत्रणापासून मुक्त केले. राजाने धार्मिक असण्याची गरज नाही पण धर्माचा राज्यहितासाठी राजाने उपयोग करावा. त्याने धर्म व राजकारण यांचे विभाजन करून राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ असल्याचे सांगितले. राजहित हाच राजाचा धर्म असतो. राजाने उपयोगितेच्या आधारावर धर्म व अधर्माचा वापर करावा.
७. मॅकिव्हलीला आधुनिक राज्यशास्त्र जनक का म्हटले जाते त्याची दोन कारणे स्पष्ट करा.
   उत्तर- मॅकिव्हलीने राज्यशास्त्रीय लिखाणात ऐतिहासिक दृष्टिकोन, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनाचा वापर केला तसेच त्याचे विचार राष्ट्रराज्य कल्पनेचे सूचक आणि उपयोगितावादी असल्यामुळे त्याला आधुनिक राज्यशास्त्राचे जनक मानले जाते.

## प्रकरण ४ थे

## जीन जॅक्स रूसो

(इ.स.१७१२ ते १७७८)

**जीवन परिचय-** रूसोचा जन्म स्वित्झर्लँडमधील जिनेव्हा येथे २८ जून १७१२राजी झाला. त्याचे वडिल फ्रेंच व साधारण कारागीर होते. जन्मानंतर अवघ्या दहा महिन्यात आईचे निधन झाले. त्यांचे वडिल अशिक्षित असल्याने रूसोकडून उच्छृंखल व रोमांचकारी साहित्य वाचून घेत असत. वडीलावर हत्याचे आरोप झाल्याने त्यांनी रूसोला काकाकडे सोडून पलायन केले. वाचनामुळे अल्पावधीत इतर मुलापेक्षा प्रचंड आकलनशक्ती उत्पन्न झाली. वाचनातील बराचसा भाग कळत नसे पण मनावर विशिष्ट संवेदना उमटत असत. या अव्यक्त व गुढ भावनाचा रूसोच्या पुढील जीवनावर खोलवर प्रभाव पडला त्यातून तो शेवटपर्यंत बाहेर पडू शकला नाही. जीवनात रूसोला अनेक अडचणीतून भ्रमंती करावी लागली. रूसो सोळा वर्षाचा असतांना फ्रॉन्समध्ये पळून गेला. त्यांच्या गविष्ठ स्वभावामुळे मित्रही टिकविता आले नाही. एका कॅथालिक प्रादीला शरण जाऊन कॅथालिक पंथाची दिक्षा घेतली. त्याचे अनेक स्त्रियांशी संबंध आले. तो कुणासाही एकनिष्ठ राहिला नाही. थेरसी नावाच्या महिलेपासून पाच अपत्ये झाली परंतु त्याची जबाबदारी न स्वीकारता त्याने सर्वाना अनाथालयात पाठविले. सव्वीस वर्ष तिच्या सोबत संसार केल्यानंतर लग्न केले. त्याचे वैयक्तिक जीवन बेशिस्त राहिले असते. मित्राच्या सहाय्याने फ्रेंच दूतावासात नोकरी मिळविली पण टिकविता आली नाही. अस्थिर जीवनाच्या प्रभावामुळे  तो पद्धतशीर व तर्कसंगत विचार न मांडता गोंधळात टाकणारी गुढ विधाने करतो. रूसोने आपल्या लिखाणात विचारापेक्षा भावनेला अधिक महत्व दिले.

रूसोच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना १७४९ मध्ये घडली. डीजोन अकादमीने एक निबंध स्पर्धा आयोजित केली. स्पर्धचा विषय होता. 'शास्त्र व कला यांच्या प्रगतीने नैतिक जीवन उन्नत झाले की खालावले' रूसोच्या निबंधाला प्रथम पारिषोतिक मिळाले. तो म्हणतो की, जेवढया प्रमाणात शास्त्र व कला यांची वृद्धी झाली त्याच प्रमाणात मानवी भ्रष्ट झाले. मनुष्य स्वभावतः चांगला असून सामाजिक संस्थाच्या संपर्काने त्याला दृष्ट बनविले. हा निबंधाचा मध्यवर्ती गाभा होता. याच अकादमीने १७५४ मध्ये घेतलेल्या स्पर्धेत त्याने 'विषमतेचे मूळ' यावर निबंध लिहीला. यात प्राचीन समाजातील समता व सामंज्यस्याचे विवेचन करून, वैयक्तिक संपत्तीतून आर्थिक विषमता निर्माण झाल्याचे विवेचन करतो. यानंतर लेखन करणे हाच त्याचा व्यवसाय बनला. Emile या ग्रंथात धर्मगुरूवर टीका केल्यामुळे फ्रान्स, ब्रिटन व जर्मनी अशी भ्रमंती करावी लागली. २ जुलै १७७८ मध्ये त्याचे निधन झाले. रूसोने Social Contract, Emile, The Discourses of Art and Science, The Discourses on the Origion of Inequality, An Introduction to Political Economy हे ग्रंथ लिहीले. त्यांच्या विचारावर ग्रीक विचारवंत, हॉब्ज व लॉकचा सामाजिक करार सिद्धांत, तात्कालीन परिस्थिती, फ्रान्समधील राजकारण इ. चा प्रभाव दिसून येतो.

**प्र. १ ला. रूसोच्या मानवी स्वभाव आणि निसर्गावस्थेबद्दलचे विचार स्पष्ट करा?**

**रूसोचे मानवी स्वभावाबद्दलचे विचार**-The Discourses on the Origion of Inequality मध्ये रूसोने मानवी स्वभावाचे विवेचन केलेले आहे. मानवी स्वभावाच्या विश्लेषण करणाऱ्या हॉब्ज व लॉक या सामाजिक करारवादी विचारवंतानी परस्पर विरोधी विचार मांडले आहेत. हॉब्जने मानवाला दुर्गुणाचा पुतळा तर लॉकने सद्‌गुणाचा पुतळा मानले आहे. रूसो हॉब्जप्रमाणे मानवाला स्वार्थी मानत नाही तर लॉकप्रमाणे मानव स्वभावतः चांगला आहे असे मानतो. समाजाच्या संपर्कामुळे तो दुर्गुणी बनला असे मत व्यक्त करतो. तो मानवी स्वभाव निर्मितीच्या दोन प्रेरणा कारणीभूत असतात.१) आत्मप्रेम वा स्वसंरक्षण २) सहानुभूती वा परस्पर सहकार्य रूसो म्हणतो की, मानवाचा पहिला कायदा स्वसंरक्षण असून त्याला स्वतःची काळजी असते. मानवात ही भावना स्वभावतःच नसती तर तो प्राचीन काळातच नष्ट झाला असता. सहानुभूतीमुळे त्याचे जीवन सुलभ होते. ही प्रवृत्ती नसती तर संघर्ष होवून त्याला जीवन जगणे कठिण झाले असते. हीच भावना कुटुंब निर्मितीचा आधार आहे.

मानवाच्या स्वभावात आत्मप्रेम व सहानुभूती या दोन प्रवृत्ती मूळ असून इतर भावनांची निर्मिती या प्रवृत्तीवर आधारित असते. काही वेळेस स्वसंरक्षण व सहानुभूती यात संघर्ष निर्माण होतो. त्यातून एक वेगळी समस्या निर्माण होते. कारण एकाच वेळेस दोन्ही भावना पूर्ण करता येत नाही त्यामुळे व्यक्तीला दोघांत तडजोड करावी लागते. उदा. आत्मप्रेमामुळे एका मातेला स्वतः जेवणास प्रेरित करेल तर सहानुभूती मुलास भोजन देण्यास भाग पाडेल.

कौटुंबिक हिताची भावना समाजविरोधी कार्य करण्यास प्रेरित करते. त्यामुळे जी एक नवीन भावना उत्पन्न होते. त्या भावनेस रूसो अतःकरण म्हणतो. ही भावना मानवाला मिळालेली नैसगिक देगणी आहे. ही भावना शिक्षण किंवा बुद्धीमुळे निर्माण झालेली नाही. ती दोन्हीपेक्षा प्राचीन आहे. अतःकरण माणसाला सत्यावर प्रेम व असत्याची घृणा करण्यास शिकविते. ती नैतिक शक्ती आहे. अंतःकरणाला सत-असत यात फरक करता येत नाही. ती सद्‌भावना असते. सत-असतातील फरक ओळखण्यासाठी त्याला विवेकावर अवलंबून राहावे लागते. विवेक मार्ग दाखविते तर अंतःकरण करर्य करते. अशाप्रकारे आत्मप्रेम व सहानुभूती या दोहात समन्वय निर्माण करण्याचे कार्य अंतःकरण व विवेक यांच्यामुळे होत असते. रूसोच्या मते माणूस वाममार्गाकडे वळला तर तो विवेकाचा दोष आहे.विवेकाने योग्य अयोग्य यात फरक करण्याची चूक केली. अंतःकरण कधीच चुकत नसते. माणूस विवेकाद्वारे समाजात राहून आपला संपूर्ण विकास करू शकतो .जोपर्यंत माणूस आपल्या विवेक व अतःकरण प्रवृत्तीवर समन्वय साधू शकतो तोपर्यंत तो स्वभावतः चांगलो असतो. मनुष्य स्वभावतः चांगला आहे. त्याचे अधःपतन होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्याचे आत्मप्रेम हे दंभ व स्वार्थात बदलते. माणसाने विवेकाला स्वार्थापासून दूर ठेवले तर तो चांगला व आदर्श राहू शकतो. या वरील प्रमाणे मानवी स्वभावाचे आदर्श चित्रण करतो.

**रूसोचे निसर्गावस्था बद्दलचे विचार-** Discourses of Art and Science या ग्रंथात रूसोने निसर्ग अवस्थेचे वर्णन केलेले आहे. तात्कालीन समाज अवस्थेची नैसर्गिक अवस्थेशी तुलना करून निसर्ग अवस्था चांगली असल्याचे मत मांडतो. निसर्गावस्थेतील मानव सुखी व आनंदी जीवन जगत होता. सहज जीवनाचा आल्हाद त्याला स्वच्छंद फुलपाखरासारखा अनुभव येई. निसर्गावस्थेतील मानवाचे कुणाही भांडण वा द्वेष नव्हता. त्याला रूसो उदात्त वनचर म्हणतो. नैसगिक अवस्था पृथ्वीवरील नंदनवन मानतो. निसर्गावस्थेतील माणूस एकांत, आनंदी व निश्चित जीवन जगत होता. माणसाला भाषा अवगत नव्हती ना पोषाख, त्यावर कोणतेही बाहय बंधन नव्हते. त्याचे निष्पाप असल्याने आनंदी होते. सर्व माणसे स्वतंत्र व समान होती. माणसे स्वावलंबी व समाधानी होते. माणसे सामाजिक नसल्यामुळे चांगल्या वाईटाविषयी अनभिज्ञ होते. त्यांच्या गरजा मर्यादित होत्या. आदिम मानव अज्ञानी व रानटी होता. परंतु आजच्या संस्कृतीची तुलना केल्यास धोकेबाज व प्रामाणिक नक्कीच नव्हता. तो बुद्धिहीन असेल पण चारित्र्यहीन नव्हता. आदिम मानवाची आजच्या मानवाशी तुलना करून रूसो म्हणतो की, आम्हाला आमचे अज्ञान, निष्पापवृत्ती व भोळेपणा, गरिबी परत द्या या गोष्टी आम्हाला आनंदी करू शकतील. एवढी उदात्त निसर्गावस्था असेल तर ती संपुष्टात का आली याचे विश्लेषण करून सामाजिक कराराकडे वळतो. निसर्गावस्थेतील परिवर्तनाला कारण विवेकाचा उदय व लोकसंख्या वाढ सांगतो. निसर्गावस्थेतील परितर्वनाचे कारण स्वातंत्र्य व समतेच्या ऱ्हासात जाणवते. विवेकाच्या उदयामुळे आदिम मानवाला स्थिर कौटुंबिक जीवन व्यतित करण्यासाठी खाजगी संपत्तीची कल्पना सुचली असावी. रूसो म्हणतो की, "ज्या माणसाने एखादया भूखंडाभोवती कुंपण घालून हा भूखंड माझा आहे अशी प्रथम घोषणा केली आणि इतर व्यक्तींनी भाबडेपणाने त्यावर विश्वास ठेवला. तो राजकीय समाजाचा संस्थापक ठरला." खाजगी संपत्तीच्या उदयामुळे तुझे आणि माझे शब्द अस्तित्वात येऊन माणसाचे आदिम जीवन बदलून गेले. विवकाच्या उदयामुळे माणसे उदयोगी बनले. सर्व माणसे समान योग्यतेची असती तर नैसर्गिक अवस्था आदर्श स्वरूपात अस्तित्वात राहिली असती. परंतु बुद्धी, कुशलता व श्रम याबाबत माणसा-माणसात फरक आढळतो. त्यामुळे सुरूवातीला सर्वप्रथम भूमीवर श्रम करून वैयक्तिक संपत्ती मिळविली तेव्हापासून माणसाचे अधःपतन सुरू झाले. समाजातील बुद्धिवंतांनी अल्पश्रमात जास्त संपत्ती प्राप्त करण्याचे मार्ग शोधून काढले. परिणामतः समाजात धनिक व निर्धन असे दोन वर्ग उदयास आले. स्थिर कौटुंबिक व्यवस्थेमुळे लोकसंख्या वाढत गेली. त्यामुळे गरजा वाढल्या आणि सहकार्याची जागा संघर्षाने घेतली. सहानुभूतीऐवजी स्वार्थ बळावल्याने जीवन अस्थिर बनले. अशा

परिस्थितीत परत निसर्गावस्थेकडे परत जाणे शक्य नव्हते. मानवाला नैसर्गिक अवस्थेसारखे चांगले जीवन हवे होते. त्यासाठी सामाजिक कराराच्या माध्यमातून राजकीय समाजाची स्थापना करावी लागली. या करारातून मानवाला निसर्गावस्थेचे जीवन प्राप्त होईल अशी रूसोला आशा होती.

**प्र.१ला रूसोच्या सामाजिक करार सिद्धांताचे वैशिष्टये वा परिक्षण करा?**

'सामाजिक करार' ग्रंथाचा प्रारंभ रूसोने 'जन्मतः मनुष्य स्वतंत्र आहे आणि प्रत्येक ठिकाणी तो बंधनात अडकलेला आहे.' अशा परस्पर विसंगत वाक्याने करतो. पहिल्या अर्ध्या वाक्याचा अर्थ निसर्गावस्थेतील स्वतंत्र मानसांशी असून पुढील संदर्भ समाज स्थापनेनंतर त्यांच्यावर आलेल्या बंधनाशी संबंधित आहे. निसर्गावस्थेत स्वतंत्र माणूस कराराकडे वळला कारण विवेकाचा उदय व लोकसंख्या वाढीमुळे त्यांच्या निष्पाप स्वभावात बदल होत गेला. आत्मप्रेमाचे स्वार्थात परावर्तीत झाले. सहानुभूतीची जागा स्वार्थाने घेतली. संपत्ती संग्रह करण्याची प्रवृत्तीतून तुझे आणि माझे ही प्रवृत्ती निर्माण होऊन पूर्वीची समता नष्ट झाली. हिंसा व संघर्षामुळे अराजक निर्माण होऊन नंदवनाची जागा कलहाने घेतल्यामुळे शांतता व सुव्यवस्थाकरिता नियंत्रण करणाऱ्या शक्तीची आवश्यकता त्यांना वाटू लागली. या आवश्यकतेमधून सामाजिक करार अस्तित्वात आला.

सामाजिक करार घडविण्यात मुख्य अडचण होती स्वातंत्र्याची, कोणीही स्वातंत्र्य सोडण्यास कोणीही तयार नव्हता. मूर्ख वा विक्षिप्त मनुष्यच आपल्या स्वातंत्र्याचा त्याग करू शकेल. कारण गमावणे मानवी सहज प्रवृत्तीच्या विरोधी आहे. त्यामुळे रूसोने अशाप्रकारे करार केला की, ज्यात व्यक्तीने स्वतःचे अधिकार समाजाला देऊनसुद्धा स्वातंत्र्य अबाधित ठेवले. रूसोने सांगितलेल्या नागरी समाजाला प्रत्येकाने समंती दिलेली आहे. राजकीय समाजाची स्थापना करू इच्छीणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन करार करताना म्हणतात की, "आमच्यातील प्रत्येकजण सामुदायिक इच्छेच्या सर्वोच्च नियंत्रणाखाली आपले व्यक्तित्व व सर्व अधिकार समर्पित करतो आणि सामुदायिक एकत्वाचा अविभाज्य घटक या नात्याने त्याचा परत स्वीकार करतो." रूसोने कराराचे दोन पक्ष आहेत. व्यक्ती करार करतांना एक पक्ष व सामुदायिक रूपात दुसरा पक्ष असतो. अ +ब +क + ड मिळून समाज बनलेला असतो. अ हा समाजाचा घटक असतो आणि करार करणार स्वतंत्र घटकही असतो. व्यक्तिगत रूपाने अ हा आपले अधिकार ब, क, ड, ई या समुदायाला अर्पण करतो. परंतु ब जेव्हा आपले अधिकार समर्पित करतो. तेव्हा अ हा समाजाचा घटक असतो. म्हणजे प्रत्येकजण स्वतंत्र्यरित्या आपले अधिकार सोडतात व सामुदायिकरित्या परत स्वीकारतात. करारामुळे व्यक्तीला काहीही गमवावे लागत नाही. उलट नैसर्गिक अधिकाराची हमी व संरक्षण मिळते. करारात सहभागी सर्व व्यक्तीची मिळून राजकीय संघटना निर्माण होते. ही संघटना नैतिक स्वरूपाची असते. या सामदायिक संघटनेला सत्ता, एकता व जीवन इच्छा प्राप्त होते. सर्व व्यक्तीच्या इच्छेतून निर्माण झालेल्या निर्माण झालेल्या संघटनेस राज्य म्हणतो. या कराराचा परिणाम म्हणून समाज, राज्य व शासनसंस्था निर्माण झाली.

**रूसोच्या सामाजिक कराराची वैशिष्टये-**

१. **सर्वांना समतेची निश्चिती-** करारातील सर्व सभासद आपले सर्व अधिकार संपूर्ण समाजाला समर्पित करतात. त्यामुळे सर्वजण एकाच पातळीवर कार्य करतात. समाजातील कुणालाही विशेषाधिकार असत नाहीत. सामाजिक संस्थेकडे सार्वभौमत्व असते आणि प्रत्येक व्यक्ती हा त्या संस्थेचा समान भागीदार असतो.

२. **स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी-** नैसर्गिक अवस्थेत माणूस स्वतंत्र होता. पण विवेकाच्या उदयामुळे अराजक निर्माण झाले. त्यामुळे स्वसंरक्षण व स्वातंत्र्य मिळविण्यासाठी करार निर्माण झाला. सर्वजण नियम पालन करणार असल्याने सर्वच स्वतंत्र राहणार आहेत.

३. **सावयवी राज्य निर्मिती-** सामाजिक करारतून निर्मित राज्य हे जिवंत प्राण्यासारखे असून ते एक नैतिक व सामुदायिक प्राणी आहे. त्याला स्वतंत्र इच्छा, अस्तित्व व जीवन असते. रूसोने त्याला सार्वजनिक पुरूष म्हटले आहे. संपूर्ण शरिरामुळे अवयवाला महत्व असते. तसेच राज्यामुळे व्यक्तींना अस्तित्व असते. सेबाईनच्या मते, 'रूसोचे आधारभूत तत्त्व माणूस नसून नागरिक आहे आणि राजकीय नियंत्रण मूलतः नैतिक असून विधी किंवा व्यवस्था त्याचा दुय्यम आहे.' यावरून सेंद्रिय राज्याची कल्पना येते.

४. **अधिकअधिक प्राप्ती-** सामाजिक कराराची शब्दरचना अशी आहे की ज्यात व्यक्ती काही गमाववे लागणार नाही. नैसर्गिक अधिकार व स्वातंत्र्य समाजाचा एक घटक म्हणून परत मिळते सोबत सुरक्षितता व शांतता या दोन अधिक अधिकारांची प्राप्ती होते.

५. **अधिकार सार्वभौम समूहाला दिले-** हॉब्ज आणि लॉक प्रमाणे रूसोने नैसर्गिक अधिकार एका व्यक्तीकडे देत नाही. संपूर्ण समाजाला ते दिले जातात. प्रत्येक माणूस एकाच वेळेस प्रजाजन व सक्रिय सार्वभौम देखील असतो.

६. **कराराचे सातत्य-** रूसो करार हा एकदाच घडलेली प्रक्रिया मानत नाही. ती सतत चालणारी प्रक्रिया असते. राज्याचे नागरिकत्व व्यक्तीला मिळाल्यामुळे सामान्य इच्छेत भाग घेऊन राज्याच्या कार्यास संमती दर्शवीत असते.

७. **सामूहिक ईहेची निर्मिती-** रूसोच्या सामाजिक कराराचा सामान्य ईहा हा मध्यवर्ती गाभा आहे. सामान्य ईहा ही नेहमीच कल्याणकारी असते. कराराद्वारे व्यक्तीना आपली इच्छा सामूहिक ईहेला समर्पित केले आहे. सामूहिक इहेच्या नियंत्रणाखाली समाजाचा एक घटक म्हणून व्यक्ती कार्य करते. रूसोने सामुहिक ईहेच्या सिद्धांताने जनतेला सार्वभौम बनविले आहे.

**सामाजिक करारावरील आक्षेप-**

१. **मानवी स्वभावाचे एकांगी वर्णन-** रूसोने मानवी स्वभावाचे सद्‌गुण तेवढेच लक्षात घेतले व समाजाच्या संपर्कामळे तो दृष्ट बनला असे सांगतो. समाज व इतर संस्था मानवहितासाठी निर्माण झाल्या आहेत उलट मानवाने त्यांना भ्रष्ट बनविले. माणूस सद्‌गुण व दुर्गुणाचे संमिश्रण याकडे लक्ष दिलेले नाही.

२. **काल्पनिक निसर्गावस्था-** रूसोने निसर्ग अवस्थेचे स्वर्गतुल्य असे काल्पनिक वर्णन केले आहे. त्याला कोणताच ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. निसर्गावस्थेबद्दल कोणताही शास्त्रीय पुरावा मिळत नाही**.** म्हणून निसर्गावस्था काल्पनिक वाटते.

३. **विसंगत विधाने-** जन्मतः माणूस स्वतंत्र असतो व तो सर्वत्र बंधनात आढळतो. तसेच करारात वापरण्यात आलेली भाषेत संदिग्धता आहे.

४. **उद्देशातील संदिग्धता-** वॅहानच्या मते, रूसो राज्याचा प्रबळ समर्थक व व्यक्तिवादाचा प्रबळ समर्थक वाटतो. सामूहिक ईहेचे त्याने जे वर्णन केलेले आहे. त्याचा उपयोग लोकसत्ताक राज्यातील जनतेपेक्षा हिटलर, मुसोलिनीसारख्या राज्यकर्त्यांनी अधिक केला.

५. **राज्याचा उदय-** हॉब्ज व लॉक यांच्या सिद्धांतातील तत्वांना एकत्र आणून वेगळी कल्पना मांडणाऱ्या रूसोने सामाजिक करारातून राज्याची निर्मिती केली पण त्यास ऐतिहासिक व तार्किक आधार नाही. करार समुदाय व सत्ता यातच व्हावा लागतो पण तो व्यक्ती व समुदाय हे कराराचे पक्ष सांगतो. बार्करच्या मते, रूसो हा सर्वाधिकारवादी आहे**.** याचे कारण त्याने सर्वोच्च सत्तेवर कोणतेहे बंधन घालत नाही.

**प्र. २ रा. रूसोचा सामुहिक ईहेचा सिद्धांत स्पष्ट करा?**

रूसोची सामूहिक ईहा आधुनिक राज्यशास्त्राला लाभलेली एक महत्वाची देणगी आहे. त्यांच्या सामाजिक ईहेच्या सिद्धांताने राजकीय क्षेत्रात परस्पर विरोधी क्रांतिकारक वळण घेतले. लोकशाहीच्या समर्थकांनी या सिद्धांताचा लोकशाहीचा पाया मानते तर निरंकुश शासकांनी याच सिद्धांताच्या आधारावर मनमानी केली. निसर्गावस्थेतील व्यक्तीनी सामाजिक करार करून आपले अधिकार समाजाला दिले. व्यक्तिगत इच्छेच्या जागी सामूहिक ईहा अस्तित्वात आली. रूसोच्या मते प्रत्येक मनुष्याच्या मनात दोन प्रकारच्या इच्छा असतात. त्या इच्छा पुढील प्रमाणे

**अ) वास्तविक इच्छा-** वास्तविक इच्छेला भावनाप्रधान इच्छा असेही म्हणतात. कारण माणसात आपल्या स्वार्थासाठी अविवेकी, अदूरदर्शी, क्षणिक अशा स्वार्थी विचार निर्माण होतात. या भावनाचा वापर वैयक्तिक हित साधण्यासाठी केला जातो. समाजहिताकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. म्हणून ती समाजाला घातक ठरण्याची शक्यता असते. उदा.व्यापाऱ्याकडून होणारी भेसळ

**ब) आदर्श इच्छा-** आदर्श इच्छाला सामाजिक इच्छा असेही म्हणतात. ही इच्छा सामाजिक हिताचा सदैव विवेकशील विचार करते. निःस्वार्थ, दूरदर्शी, कल्याणकारी व स्वातंत्र्याची द्योतक असते. व्यक्तिगत हिताला गौण स्थान देऊन सामाजिक हिताला श्रेष्ठत्व दिले जाते. आदर्श इच्छा ही स्थाई स्वरूपाची इच्छा असते.

**क) सामूहिक ईहा-** सामाजातील सर्व व्यक्तीच्या आदर्श इच्छाचा समन्वय म्हणजे सामूहिक इच्छा होय. विचाराअंती एखादया निर्णय समाजहिताच्या दूरदृष्टीने घेताना जी इच्छा निर्माण होते ती सामान्य इच्छा असते. या इच्छेत स्वहितापेक्षा सामाजहित विचारात घेतले जाते. ती सर्वांची इच्छा असते व समाजकल्याण हा तिचा हेतू असतो. वेपरच्या मते, सर्वांच्या कल्याणाकरिता व्यक्त होणारी सर्व व्यक्तींची स्वहितापेक्षा समाजहितास प्राधान्य देणारी इच्छा म्हणजे रूसोची सामूहिक ईहा होय. सामूहिक इच्छेत वास्तविक इच्छा व आदर्श इच्छा या दोघांचा संयोग झालेला नसतो. तिचा समाजकल्याण हा उद्देश असतो. सामूहिक इच्छा म्हणजे बहुमताची इच्छा नव्हे. कारण ती वास्तविक असू शकते. सर्वांची इच्छा म्हणजे सामूहिक इच्छा नव्हे. बहुमत किंवा सर्वांची इच्छा आणि सामूहिक इच्छेत फरक आहे. एका व्यक्तीच्या इच्छेला सामूहिक इच्छा म्हणता येणार नाही. अर्थात इच्छा किती लोकांची आहे यापेक्षा तिचा उद्देश कोणता याला त्याने अधिक महत्व दिले आहे. सामाजिक ईहेचा उद्देश सामाजिक कल्याणाचा असतो. ती इच्छा न्यायाधिष्ठित, निष्पक्ष, विवेकी आहे.

रूसोने सामूहिक ईहेला सार्वभौम मानले. ती राज्याचा आधार आहे. सामूहिक इच्छेचे पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. कारण त्याशिवाय स्वातंत्र्याचे रक्षण करणे अवघड जाईल.

**सामूहिक ईहेची वैशिष्टये-**

१. **स्थाईत्व-** सामूहिक इच्छेला नैतिक अधिष्ठान असते. भावनिक नव्हे, ती विवेकावर आधारित असल्यामुळे सार्वजनिक कल्याण हा तिचा हेतू असतो. म्हणून ती अपरिवर्तनीय स्वरूपाची असते. ती आंतरिक स्वरूपाची असते.

२. **अप्रतिनिधिक-** रूसो प्रत्यक्ष लोकशाहीचा पुरस्कार करतो. त्याला नगरराज्य व्यवस्था अभिप्रेत असल्याने प्रातिनिधिक लोकशाही तो अमान्य करतांना सामुहिक ईहा ही प्रतिनिधीच्या वतीने व्यक्त करता येणार नाही असे सुचवितो.

३. **एकत्व-** संपूर्ण समाजाच्या भल्यासाठी इच्छा असल्याने एका समाजात एका प्रश्नावर एकच सामुदायिक इच्छा असू शकते. समाजात तिच्यामुळे राष्ट्रीय चारित्र्य निर्माण होते. सामूहिक इच्छा ही अभाज्य असते. जर ती विभक्त झाली तर सामान्य न राहता विशिष्ट वर्गाची होईल.

४. **योग्य व न्यायपूर्ण-** रूसोने मानवी इच्छामध्ये वास्तविक इच्छा व आदर्श इच्छा हे दोन प्रकार करतो. आदर्श इच्छेच्या गोळाबेरजेला सामूहिक इच्छा संबाधिते. ती न्यायपूर्ण व योग्य असते. पक्षपातीपणाला त्यात स्थान नसते.

५. **अदेयत्व-** सामुहिक इच्छेत सार्वभौमत्व निहीत असल्यामुळे ती अदेय असते. मानवाचा आत्मा व शरिर यांचा जसा संबंध असतो. तसा राज्य व सामुहिक ईहेचा संबंध असतो. सामूहिक ईहेचा त्याग करणे म्हणजे राज्य नष्ट करणे ठरेल.

६. **सामान्य ईहा सामान्य असते-** सामान्य ईहा तीन दृष्टीने सामान्य असते. सर्व नागरिकांची संमती प्राप्त असावी लागते, राज्यातील सर्व नागरिकांशी संबंधित असते, ती समाजहितैषी असावी लागते.

**सामूहिक ईहेवरिल आक्षेप-**

१. **प्रातिनिधीक शासनास विरोध-** ग्रीक नगरराज्यातील व्यवस्था रूसोला अभिप्रेत असल्यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीचा पुरस्कार करतांना दिसतो. सामूहिक ईहेच प्रतिनिधित्व देतो. ती मोठया राज्यास उपयुक्त ठरत नाही. आजच्या लोकशाही व्यवस्थेत ही भूमिका योग्य ठरत नाही.

२. **इच्छेत फरक करणे कठिण-** रूसो मानवी इच्छेचे वास्तविक व आदर्श इच्छेचे दोन प्रकार करतो. आदर्श इच्छेची गोळाबेरीज म्हणजे सामूहिक ईहा होय. परंतु वैयक्तिक व सार्वजनिक हितात संघर्ष आल्यास फरक करणे कठिण असते.

३. **व्यक्तिस्वातंत्र्य विरोधी-** सामूहिक ईहेला विरोध करण्याचा अधिकार कोणालाच देत नाही. जर विरोध होत असेल तर रूसो विरोधकाला आज्ञापालनाची सक्ती करावी असे सांगतो. त्यामुळे स्वातंत्र्य धोक्यात येईल याकडे दुर्लक्ष केले.

४. **विरोधाभास-** सामूहिक इच्छा ही एकाची, अल्पमताची, बहुमताची किंवा सर्वाची असू शकते असे म्हणतो आणि लगेच असू शकत नाही असेही सांगतो. तसेच आदर्श इच्छा कशी व कोण ठरवणार हे स्पष्ट करत नाही. परस्परविरोधी विधाने करणे हा त्यांचा स्वभाव बनलेला आहे.

५. **केवळ संकटकालीन अभिव्यक्ती-** सामान्य इच्छा ही जेव्हा राष्ट्रांवर संकट आलेले असले तेव्हा प्रकट झालेली दिसते. सर्वसाधारण परिस्थितीत वैयक्तिक स्वार्थाला उधाण आलेले असते.

६. **निरंकुश शासनास अनुकूल-** जगात राज्यकर्त्यांनी आपली सत्ता निरंकुश बनविण्यासाठी प्रयत्न केलेला असतो. आपण जे कार्य करतो ते जनहितासाठी करते. त्यामुळे व्यक्तीने त्यास विरोध करू नये असे तो सांगतो. रूसोची सामूहिक ईहा निरंकुश शासनव्यवस्थेत जन्म देतो असे म्हणतो येईल.

**टिप- रूसोचे जबाबदार सरकारविषयक विचार-** रूसोने राज्य व सरकार यात दोघांच्या फरक करण्याचा फरक करण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक करारातून जी सामूहिक ईहा निर्माण होते त्याला तो राज्य म्हणतो. राज्यातील सामूहिक ईहा कार्यान्वित करण्यासचे साधन म्हणून एका व्यक्तीकडे वा गटाकडे सत्ता दिलेली असते त्यास सरकार वा शासन म्हणतो. शासनसंस्थेला सार्वभौमकडून अधिकार मिळत असल्यामुळे शासनात बदल घडविण्याचा अधिकार असतो. शासनाला विरोध करण्याचा अधिकार जनतेला आहे. पण राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला करता येणार नाही. कारण तसे करणे म्हणजे सामाजिक करार रद्द करणे होय. रूसो राजसत्ता, महाजनसत्ता, जनसत्ता व भिन्न शासनव्यवस्था यांचा समावेश आहे. त्याने ग्रीक नगरराज्यातील प्रत्यक्ष लोकशाहीच्या शासन प्रकाराला श्रेष्ठ व उचित मानतो. प्रातिनिधिक लोकशाहीला विरोध करतो. प्रतिनिधित्व म्हणजे गुलामगिरीची स्वीकृती मानतो. निश्चित कालावधीत जनतेचे एकत्र येवून सरकार आपल्या अधिकारात वाढ करणार नाही याची दक्षता घेण्यासाठी निश्चित कालावधीत सार्वजनिक सभेचे आयोजन करून परिवर्तन घडवावीत असे रूसो सांगतो.

रूसोने जबाबदार सरकार त्या देशाच्या भौतिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा प्रभाव पडतो हे मान्य केले. शासनाची योग्यता ते कसे व कोणत्या उद्देशान कार्य करते यावर अवलंबून असल्याचे सांगतो. लोकसंख्या वाढ ही शासनाच्या प्रगतीचे लक्षण मानतो.

**रूसोच्या जबाबदार सरकारची वैशिष्टये-**

१. सरकार हे लोक संमतीवर आधारलेले असते. लोकसंमती म्हणजे बहुसंख्याकांची नव्हे सर्व लोकांची संमती आहे. अन्यथा बहुसंख्याकाकडून अन्याय होईल.

२. रूसोने जनसार्वभौमत्वाची कल्पना मांडली आहे. सर्वजण सार्वभौम सत्तेचे केंद्र आहे. लोकप्रतिनिधिच्या हाती सार्वभौम सत्ता असू नये. प्रतिनिधीनी प्रशासन केले तरी अंतिम अधिकार लोकांच्या हाती असावा.

३. रूसाने व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यातून सरकारच्या अधिकारावर मर्यादा येतात.

४. सरकार जर जबाबदारीने वागत नसेल तर शासनाला विरोध करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार तो देतो. कारण शासनाला जनतेकडून अधिकार मिळाले आहेत म्हणून त्याने जनहितासाठी कार्य केले पाहिजे.

**टिप- राज्याला विरोध करण्याचा अधिकार-** रूसोने सर्व अधिकार सामूहिक ईहेला प्रदान केले आहेत. सामूहिक ईहा ही सदैव सतत समाजहिताचा विचार करणारी आहे. ही सामूहिक ईहा समाज कल्याण हा तिचा उद्देश असल्याने ती अपरिवर्तनीय व स्थायी स्वरूपाची आहे. संपूर्ण समाजात एका प्रश्नावर एकच सामूहिक ईहा असते. कारण सामूहिक ईहा समाजकल्याणासाठी व लोकांच्या हितासाठी असते. सामाजिक करारातून जो सार्वभौम सार्वजनिक पुरूष निर्माण झाला त्याला राज्य म्हणतो. रूसो व्यक्तीला राज्याचा विरोध करण्याचा अधिकार देत नाही. कारण तसा अधिकार देणे म्हणजे सामाजिक करार रद्द करणे होय. सामाजिक करार रद्द झाल्यास समाजात अराजक निर्माण होईल. निसर्गावस्थेत विवेकाचा उदय व लोकसंख्या वाढीमुळे समाजात स्वार्थ भावना व अराजकता निर्माण झाली होती ती नष्ट करण्यासाठी

समाजातील सर्व व्यक्तींनी स्वातंत्र्याचा त्याग करून सामाजिक करार झाला. व करारातून निर्माण झालेले अधिकार सामूहिक ईहेला दिले. ही सामूहिक ईहा राज्य असल्यामुळे राज्याला विरोध करणे म्हणजे स्वत:ला विरोध करणे होय. सामूदायिक ईहा जनतेची ईहा आहे. त्यामुळे रूसो जनतेला शासनाला विरोध करण्याचा अधिकार देतो. पण राज्याला विरोध करण्याचा अधिकार देत नाही असे करणे म्हणजे सामाजिक करार रद्द करणे होईल. त्यामुळे व्यक्तीनी राज्याला विरोध करू नये.

**टिप- जनसार्वभौमत्व-** रूसाने जनतेच्या सार्वभौमत्वाचा पाया घातला आहे. सामान्य इच्छेचा एक घटक या नात्याने प्रत्येक व्यक्ती सार्वभौम सत्तेची भागीदार असते. हॉब्जने सार्वभौमसत्ता एका निरंकुश राजाकडे सोपविली तर सार्वभौम हे निरंकुश, अविभाज्य, अमर्याद मानतो. सार्वभौमत्वाचे प्रतिनिधित्व होऊ शकत नाही. ते कायदयाचे प्रमुख उगमस्थान असते. सामाजिक कराराद्वारे जो राष्ट्रपुरूष निर्माण होतो त्याचे स्वरूप नैतिक असते. त्याला स्वतंत्र इच्छा असते. राष्ट्रपुरूषाच्या आदर्श इच्छेला रूसो सामान्य मानतो. ती सर्वाची इच्छा असते व जनकल्याण हा तिचा उद्देश असतो. सामाजिक करारातून निर्माण झालेली इच्छा सार्वभौम असते. अशा प्रकारे जनता हिच सार्वभौम असल्याने आपल्याच विरोधी क्रांती करण्याचा अधिकार तो जनतेला नाकारतो. सामान्य ईहेचे पालन सर्वांनी केले पाहिजे व न केल्यास शिक्षेची तरतूद सांगतो.

रूसाने निर्माण केलेली सार्वभौम ईहा सार्वभौम आहे. त्या ईहेचे राज्यावर नियंत्रण आहे. सरकार हे राज्याचे अंग आहे. सर्व सत्ता ही लोकांच्या हाती आहे. त्यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीचा तो पुरस्कार करतो. त्याला प्रातिनिधिक लोकशाही मान्य नाही. लोकांचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधी हे प्रतिनिधित्व करू शकत नाही असे रूसोला वाटते. सार्वभौम अमर्याद, निरंकुश असले तरी सार्वभौमत्व सत्ता जनहित विरोधी कोणतेही कार्य करू नये. कायदयासमोर सर्वाना समान लेखले जावे. लोकांनी आपणास हवे ते कायदे करीत राहावे व त्यांची अंमलबजावणी सरकार व्यवस्थित करते की नाही यावर लक्ष ठेवून सरकार जनहितासाठी कायदे व कारभार करत नसेल तर सरकार बदलत राहावे. त्यासाठी प्रतिसरकारची स्थापना करावी. म्हणजे राज्यकर्त्यांना त्यांची धास्ती वाटेल. त्यामुळे राज्यकर्ते लोककल्याणाच्या दृष्टीने कायदे करून त्यांची अंमलबजावणी करून न्यायदानाचे कार्य योग्य प्रकारे करतील. सर्व व्यक्तींना समान मानून सर्वांचे हित साधण्यासाठी सार्वभौम सत्ता सामूदायिक ईहेकडे सोपविली आहे. सामूहिक ईहेत सोपविले आहे.सामूहिक इहेत सर्व जनता भागीदार असल्यामुळे अंतिम सत्ता जनतेकडे असते. अशा प्रकारे रूसोने जनसार्वभौमत्वाची कल्पना मांडलेली दिसते.

**एका वाक्यातील अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. रूसोच्या मते 'जनतेचे सार्वभौमत्व ' म्हणजे काय?

उत्तर- रूसाने जनतेच्या सार्वभौमत्वाचा पाया घातला आहे. सामान्य इच्छेचा एक घटक या नात्याने प्रत्येक व्यक्ती सार्वभौम सत्तेची भागीदार असते. सामाजिक कराराद्वारे जो राष्ट्रपुरूष निर्माण होतो त्याचे स्वरूप नैतिक असते त्याला स्वतंत्र इच्छा असते. राष्ट्रपुरूषाच्या आदर्श इच्छेला रूसो सामान्य मानतो. ती सर्वाची इच्छा असते व जनकल्याण हा तिचा उद्देश असतो. सामाजिक करारातून निर्माण झालेली इच्छा सार्वभौम असते.

२. रूसोच्या सामाजिक करार सिद्धांताची दोन वैशिष्टये लिहा.

उत्तर- सर्वांना समतेची निश्‍चिती, अधिक अधिकारांची प्राप्ती, कराराचे सातत्य, सामूहिक ईहेची निर्मिती इत्यादी सामाजिक करार सिद्धांताची वैशिष्टये आहेत.

३. रूसोने लिहिलेल्या दोन ग्रंथाची नांवे सांगा.

उत्तर- रूसोने Social Contract, Emile, The Discourses of Art and Science, The Discourses on the Origion of Inequality, An Introduction to Political Economy हे ग्रंथ लिहीले.

४. रूसोचा मनुष्य स्वभावाची वैशिष्टये दोन वाक्यात सांगा.

उत्तर- रूसोच्या मते मनुष्य हा स्वभावतः चांगला आहे पण समाजाच्या संपर्कामुळे तो दुर्गुणी बनला असे त्याचे विश्लेषण असून मानवी स्वभाव निर्मितीच्या दोन प्रेरणा कारणीभूत असतात. १) आत्मप्रेम वा स्वसंरक्षण २) सहानुभूती वा परस्पर सहकार्य

५. रूसोच्या सामुहिक ईहा वरील दोन टीका विशद करा.

उत्तर- प्रतिनिधिक शासनास विरोध, इच्छेत फरक करणे कठीण, व्यक्तिस्वातंत्र्य विरोधी इत्यादी सामूहिक इच्छेच्या संकल्पनेवर टीका केल्या जातात.

६. रूसोने इच्छेचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत.

उत्तर- रूसोने वास्तविक इच्छा आणि आदर्श इच्छा हे दोन प्रकार सांगितलेले आहेत.

७. निसर्गावस्था नष्ट होण्याची प्रमुख दोन कारणे कोणती?

उत्तर- लोकसंख्या वाढ व विवेकाचा उदय ही निसर्गावस्था नष्ट होण्याची दोन कारणे आहेत.

८. रूसोच्या जबाबदार सरकारची दोन वैशिष्टये लिहा.

उत्तर- लोकसंमती, जनसार्वभौमत्व, शासनाला विरोध करण्याचा अधिकार ही जबाबदार सरकारची वैशिष्टये सांगता येतात.